स. ग्रं. सं. ठाणें
विषय जिल्हा
सं. क्र. २१०३

आमचा महाभारतपूर्व राजकीय व सांस्कृतिक इतिहास

REFBK-0012324

डॉ. ह. रा. दिवेकर

ठिकाण
५५६५२
२०३७१.
२१०३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

पुणें विद्यापीठाच्या विद्यमानें
कै. न. चिं. केळकर स्मारक व्याख्यानमाला
पुष्प ६ वें : १९५९

आमचा महाभारतपूर्व राजकीय व सांस्कृतिक इतिहास

राष्ट्रीय ग्रंथ संग्रहालय, शास. स्वतंत्र
क्रमांक ७५६५२ दिः ..... निर्वंदा
वर्गांक ९२०३ ..... दोः दिः २०/३/६७

व्याख्याते – लेखक
डॉ. हरि रामचंद्र दिवेकर,
एम्. ए. (अलाहाबाद)
डी. लिट्. (पॅरिस)

REFBK-0012324
ग्रंथालय दा. क्र. 92328

१० जुलै १९६२] [मूल्य : १ रुपया ५० नवे पैसे

प्रकाशक :
व. ह. गोळे
कार्यवाह, पुणें विद्यापीठ
पुणें ७

☆ ☆ ☆

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव पेठ
पुणें २

☆ ☆ ☆

सर्व हक्क
विद्यापीठाधीन

☆ ☆ ☆

प्रथमावृत्ति : १० जुलै १९६२

☆ ☆ ☆

मूल्य
एक रुपया पन्नास नवे पैसे

मराठा ग्रंथ संग्रहालय, दाण. स्वतंत्र
अनुक्रम..... दि: .....
क्लास ..... नोंद दि. .....

प्रकाशकाचें निवेदन

पुणें येथें स्थापन झालेल्या कै. नरसिंह चिंतामण केळकर स्मारकनिधि–समितीच्या विश्वस्तांकडून मिळालेल्या रु. २५००० च्या देणगीचा स्वीकार पुणें विद्यापीठानें केला आणि त्या निधीच्या व्याजांतून प्रतिवर्षी, कै. केळकर यांच्या स्मृतिदिनाच्या सुमारास, "कै. केळकर स्मारक व्याख्यानमाला" घडवून आणण्याचा उपक्रम १९५४ पासून सुरू झाला. आतांपर्यंत या व्याख्यानमालेंत अनुक्रमें प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर, श्री. बाळाचार्य माधवाचार्य खुपेरकर, श्री. शं. ना. जोशी, प्रा. श्री. ना. बनहट्टी, प्रा. रा. श्री. जोग, डॉ. ह. रा. दिवेकर, प्रा. ब. ग. खापर्डे आणि प्रा. अरविंद मंगरूळकर यांचीं व्याख्यानें झालीं आहेत.

प्रा. ह. रा. दिवेकर यांनीं १९५९ च्या ऑक्टोबर महिन्यांत 'आमचा महाभारतपूर्व राजकीय व सांस्कृतिक इतिहास' या विषयावर दिलेलीं व्याख्यानें, या व्याख्यानमालेंतील 'सहावें पुष्प' म्हणून आतां प्रसिद्ध होत आहेत. अपरिहार्य कारणांनुळें प्रकाशनास झालेल्या विलंबाबद्दल विद्यापीठ दिलगीर आहे.

पुणें विद्यापीठ कार्यालय,
गणेशखिंड, पुणें ७.
१० जुलै १९६२

व. ह. गोळे,
कार्यवाह,
पुणें विद्यापीठ

अनुक्रमणिका

विषय प्रवेश	....	....	१– ११
पुरोहितवर्गाचे प्रयत्न	...	....	१२– २७
मंत्ररचनेचा आरंभ	...	....	२८– ४२
नव्या नव्या देशांचे शोध	...	...	४३– ५७
रामराज्याकडे	...	...	५८– ७२
विद्येची वाढ	....	...	७३– ८८
महाभारत	...	...	८९–१०६
विशेषनाम–सूचि	...	...	१०७–१२१

☆ ☆ ☆

आमचा
महाभारतपूर्व राजकीय व सांस्कृतिक
इतिहास

सर्ग पहिला

विषय-प्रवेश

१. प्राचीन माहिती अशी आहे कीं, आम्ही हिमालयाच्या उत्तरेकडून या देशांत उतरलों. येथें येण्यापूर्वी आमचें मूळ वसतिस्थान कोणतें होतें व तेथें आम्ही काय करीत होतों याची नीट माहिती आम्हांस नाहीं व तत्संबंधीं विचार माझ्या विषयमर्यादेंत येत नाहींत. आमचे जे लोक प्रथम या देशांत आले त्यांस पुरोहित म्हणत. पुरोहित शब्दांतील हित हें धातुसाधित 'हि' म्हणजे पाठविणें या धातूचें रूप आहे. यावरून पुरोहित म्हणजे पुढें धाडलेले. 'धा'— ठेवणें या धातूचेंहि हें रूप होत असल्यानें याचाच अर्थ पुढें ठेवलेले असाहि होऊं लागला. या व्युत्पत्तीप्रमाणें पुरोहित म्हणजे पुढें पाठविलेले, पुढें आलेले, पुढें केलेले, पुढें झालेले पुढारी किंवा नेते. अशा लोकांच्या एका वर्गानें या देशांत येऊन वस्ती केली व हळूहळू राज्य-स्थापना केली. राज्यस्थापना करण्याचा हा राजमार्गच आहे. राहण्यासाठीं जागा घ्यावयाची, हळूहळू कांहीं व्यापार करावयाचा, थोडथोडी फौज ठेवावयाची व स्वसंरक्षणार्थ ठेवलेल्या या लोकांचा उपयोग करून सत्ता बळकावयाची ही पद्धति आम्हांस अपरिचित नाहीं.

२. याप्रमाणें पहिला पुरोहितांचा जो वर्ग या देशांत आला तो वसति करणें या अर्थी असणाऱ्या 'वस्' धातूपासून झालेल्या 'वसिष्ठ' नांवानें ओळखला जाऊं लागला. नद्यांचें पाणी गोठणाऱ्या भूभागांतून इकडे आल्यावर नेहमीं पाणी असणाऱ्या सदानीरा व सतत वाहणाऱ्या सरयू नदीच्या कांठा-कांठानें या वसिष्ठवर्गानें वसति केली. या लोकांजवळ हळू हळू 'वसु' म्हणजे सांठवून ठेवण्यासारखें धन, 'वसुधा' म्हणजे तें धन धारण करणारी जमीन जमूं लागली. पुराणकार सांगतात,

वसुमध्यात्समुत्पन्नो वसुमान् वसुधाश्रयः ।
वसिष्ठ इति तत्त्वज्ञैः प्रोच्यते पूर्वसूरिभिः ॥

हा वर्ग येथें काय करूं लागला याचेंहि वर्णन पुढीलप्रमाणें आहे.

अन्नं मूलं फलं चैवमोषधीश्च प्रवर्तयन् ।
प्रजा वै जीवयामास कारुण्यादौषधेन तु ॥

म्हणजे खाण्याजोगीं फळें, खाण्याजोगे कंद व एकदा पीक देऊन मरणारीं झाडें वाढवीत या लोकांनीं आपल्या करुणायुक्त वृत्तींनीं औषधें देऊन अनेक लोकांचें भरणपोषण केलें. या लोकांचा सारा कोश जेथें जमा झाला तोच देश 'कोशल' या नांवानें प्रसिद्ध झाला. या वेळीं या लोकांस शेती, पशुपालन व वस्त्रविधा या गोष्टी अवगत होत्या. याच लोकांतील एक अत्यंत तेजस्वी 'विवस्वान्' नांवाचा एक पुरुष या पुरोहितांनीं राजा केला. या-प्रमाणें पुराणकालाच्या आरंभीं वसिष्ठ व विवस्वान् ही जोडी आपणांस दिसून येते.

३. यांतील पौरोहित्य म्हणजे नेतृत्व करणारे लोक वर्ग नांवानें ओळखले जात व राज्य चालविणारे लोक व्यक्तिनामानें प्रसिद्ध होत. वसिष्ठवर्ग याप्रमाणें वर सांगितलेली म्हणजे कृषिविद्या व औषधिविद्या हीं कामें करीत वसति वाढवीत चालला होता व यांच्याच पौरोहित्याखालीं म्हणजे नेतृत्वाखालीं विवस्वानाच्या कुलांतली संतति म्हणजे राज्यस्थापना करण्याचें कार्य वाढविणाऱ्या व्यक्ति राज्यस्थापना करीत चालल्या होत्या. विवस्वानाचें संतान म्हणजे मनु. यानें राज्यव्यवस्थेविषयीं व लोका-चरणाविषयीं कांहीं नियम घालून दिले व त्याप्रमाणें लोक चालूं लागले. कृषि व वैद्यकी यांच्या आधारें ग्राम म्हणजे लोकसमूहाची वृद्धि करावयाची

व नियम तयार करून ग्रामनियमन करावयाचें ही पद्धति नवीन ग्रामरचना करूं पाहणाऱ्या आजच्या पुरोहितांनीं म्हणजे पुढाऱ्यांनीं ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. हे नियम म्हणजेच पुढें होणाऱ्या स्मृतिग्रंथांचें पूर्वरूप.

४. या नियमांत एक असा नियम होता कीं, मिळविलेलें राज्य एकाच मुलास मिळावयाचें. त्या राज्याचे तुकडे करावयाचे नाहींत. दुसऱ्या संततीस अन्यत्र राज्यस्थापनेची मोकळीक द्यावयाची. त्याप्रमाणें मनूनें आपलें राज्य ज्येष्ठ पुत्रास दिलें व धाकटा नेदिष्ट यानें केसासारखी बारीक धार असलेल्या कैशिकी नदीपलीकडे आपल्या नवीन राज्याची स्थापना केली. या देशांत एक विशेष प्रकारचें 'शालि' धान्य थोड्याशाच प्रमाणांत उत्पन्न होतें. त्यामुळें या देशास 'वैशालि' असें नांव पडलें. अजूनहि या प्रांतांत हा विशेष प्रकारचा तांदूळ होतो. यास शिजवावें लागत नाहीं. नुसता भिजविला कीं शिजविल्याप्रमाणें तो मऊ होतो. यास अजून विसाल धान म्हणतात. मनूच्या वडील मुलानें कोसल देशांत प्रथमच इक्षुकृषि म्हणजे उसाची शेती करण्यास आरंभ करविला. यावरून त्याचें नांव 'इक्ष्वाकु' ऊस करणारा असेंच पडलें. कोसल देशच्या बाजूस आजहि उसास 'ईख'च म्हणतात. इक्ष्वाकूनें पहिली राजधानी वसविली व तिच्या संरक्षणास अशी तटबंदी केली कीं, कुणास तिच्यावर चाल करून जातां येऊं नये. म्हणूनच त्या नगरीचें नांव 'अयोध्या' असें पडलें. पण या राजे लोकांस पुरोहितवर्गास वचकूनच राहावें लागे. एकदा इक्ष्वाकूच्या वडील मुलानें पुरोहितवर्गाची आगळीक केली. त्यामुळें बापानें त्यास कांहीं वर्षें वनवासास पाठविलें. तेथें बिचाऱ्या राजपुत्रास नुसतें सशाचें मांस खाऊन राहावें लागलें. त्यावरून शशाद हेंच त्याचें नांव पडलें. दुसऱ्या मुलाकडे इक्ष्वाकूनें लक्ष्य न दिल्यामुळें त्यास 'निमि' कानाडोळा केलेला म्हणूं लागले. या मुलानें कोसल देशाच्या पूर्वेस एक स्वतंत्र राज्य स्थापलें. दिवसेंदिवस भरभराट होणाऱ्या या राज्यास 'विदेह' असें नांव पडलें. याप्रमाणें वसिष्ठवर्गाचें पौरोहित्या-खालीं कोसल, वैशाली व विदेह अशीं तीन राज्यें अस्तित्वांत आलीं.

५. मनूस जशीं इक्ष्वाकु व नेदिष्ठ अशीं दोन मुलें होतीं तसाच दिसण्यांत अतिशय सुंदर व पाहतांच मनास मोह पाडणारा असा इल नांवाचा तिसरा मुलगा होता. प्रकृतींत कधीं कधीं चमत्कारिक आकस्मिक फेरफार होतो. हिला

प्रकृतीची लहर म्हणतां येईल. प्रकृतीच्या अशाच एका लहरीपणामुळें इलांतलीं पुरुषचिह्नें नष्ट होऊन स्त्रीत्वाचीं चिह्नें प्रादुर्भूत झालीं व इलाची 'इला' मुलगी झाली. मुलग्याची मुलगी झालेली ही इला लाजेनें अर्धमेलीशी झाली व आपल्या सर्व लोकांस सोडून पश्चिमेकडे हिमालयाच्या उतरणीवर एका अज्ञात प्रांतीं राहूं लागली. हा प्रांत अजूनहि 'इलावर्त' या नांवानेंच प्रसिद्ध आहे. याच बाजूस सोम नांवाची एक वनस्पति कांहीं शहाण्या लोकांस माहीत होती. हिचा रस पिळून प्याला असतां एक प्रकारची मस्ती येत असे. हे लोक आपणांस सुतसोम म्हणजे सोम पिळणारे म्हणवीत असत. अशाच एका सोमसुत बुध पुरुषाशीं इलेची गांठ पडली व त्या बुधापासून इलेची संतति वाढली. याच बाजूस वसिष्ठासारखाच दुसरा एक पुरोहितवर्ग येऊन वसला होता. या वर्गातल्या मुख्य पुरुषानें रानांत झाडांचीं लाकडें एकमेकांवर घासलीं जाऊन पेटलेला वणवा पाहिला होता. त्यावरून त्यानें लाकडावर लाकूड घासून अग्नि उत्पन्न करण्याची कला शोधून काढली. या विद्येमुळें लोकांवर त्यांचा वचक वसला व लोक त्यांस 'भृगु' म्हणजे जाळणारे म्हणूं लागले.

६. इलेला एकंदर चार मुलें झालीं. हीं चारीं मुलें भृगुवर्गांतल्या पुरोहितांबरोबर खालीं उतरलीं. वडील पुरूरव्यानें गंगायमुना–संगमापर्यंत पोंचून या संगमाच्या उत्तरभागांत राज्य स्थापिलें. याची राजधानी नवीनच प्रतिष्ठित झालेलें प्रतिष्ठान. गंगेच्या दक्षिणेस गय गेला व त्यानें वसविलेला देश 'गय' नांवानेंच प्रसिद्धीस आला. याची राजधानी गया. आज उत्कल या नांवानें प्रसिद्ध असलेल्या प्रांताचा उत्तर भाग उत्कलानें वसविला. भृगु ब्राह्मणाची अग्निनिर्माण विद्या पुरूरवा शिकला व त्यानें एकाच अग्नीस कर्म-भेदानें तीन नांवें दिलीं. नेहमीं घरांत पुरून ठेवावयाचा तो गार्हपत्य, पाक-क्रियेसाठी उपयोगांत येणारा दक्षिणाग्नि व हवन करण्यासाठीं काढलेला तो आहवनीय. भृगु पुरोहित सोमरस काढण्याची कला शिकले व अग्निमंथन व सोमसवन अशा दोन्ही क्रिया एकत्र करून अगदीं प्रारंभींचा सोमयाग-विधि त्यांनीं निर्माण केला. या दोन्ही विधींचा हे भृगुपुरोहित अभिचार-कर्मासाठीं म्हणजे जादूटोण्यासारख्या अज्ञलोकांस आकृष्ट करणाऱ्या गोष्टींसाठीं करीत. इलेच्या चवथ्या मुलानें राज्यस्थापनेच्या भानगडींत न पडतां घोडे

माणसाळण्याची कला शोधून काढली व त्यावरून त्यास विनताश्व म्हणजे घोडे माणसाळणारा म्हणूं लागले. याप्रमाणें पूर्वीची कोसल, वैशाली व वैदेह व हीं तीन म्हणजे प्रतिष्ठान, गय व उत्कल अशीं सहा राज्यें या देशांत स्थापन झालीं.

७. पुरूरवा फार पराक्रमी पुरुष होता. याच्या वेळेपर्यंत विवाहाची विशिष्ट अशी प्रथा रूढ नव्हती. यानें प्रतिष्ठान देशाच्या वायव्य दिशेस असलेल्या गंधर्वदेशांतील 'ऊर्वशी' नांवाच्या स्त्रीशीं एका विशिष्ट पद्धतीनें विवाह केला. ही पद्धति गंधर्व देशांतून आल्यामुळें हिला गांधर्वविवाहपद्धति म्हणूं लागले. यांतलें वैशिष्ट्य असें कीं, स्त्री–पुरुषानें परस्पर लग्न ठरवावयाचें. पण त्यांत अटी स्त्रीनें घालावयाच्या. जोंपर्यंत पुरुषानें त्या अटी पाळल्या आहेत तोंपर्यंत ती स्त्री त्या पुरुषाजवळ राहील; पण अटी मोडल्या कीं, ती त्यास सोडून जाईल. ऊर्वशी व पुरूरवा यांस अयु नांवाचा एक मुलगा झाला, पण पुढें पुरूरव्याकडून अटी न पाळल्या गेल्यामुळें ऊर्वशी "अहो स्त्रियांचें सख्य टिकविणें फार कठीण असतें. त्यांचीं हृदयें लांडग्यासारखीं असतात" असें सांगून निघून गेली. पुरूरव्यानें खूप धन एकत्र केलें व पुरोहितवर्गास पुष्कळ वाटलेंहि. दुसऱ्या एका स्त्रीपासून झालेल्या आपल्या मुलास यानें 'अमावसु' म्हणजे सधन करून राज्यस्थापनेस पाठविलें. यानें प्रतिष्ठान राज्याच्या उत्तरेस गंगातीरावरच तेथील खुज्या स्त्रियांवरून नांव पडलेल्या कान्यकुब्ज देशांत सातवें राज्य स्थापन केलें. ऊर्वशी सोडून गेल्यावर पुरूरवा वेड्यासारखें वागूं लागला. पुरोहितांस दिलेलें धन परत मागूं लागला व अनेक प्रकारें त्यांस छळूं लागला. यामुळें या पुढाऱ्यांनीं त्यास राज्यावरून दूर केलें व त्याचा मुलगा ऐर्वशेय आयु यास राजा बनविलें.

८. आयूच्याच काळीं कोसल देशांत शशादाचा मुलगा राज्य करीत होता. याच्या राजधानींत एकदा एक बैल भयंकर माजला व सर्वांस त्रास देऊं लागला. शशादपुत्रानें त्याचा सामना केला. बैल समोरून अंगावर चालून आला असतां याचा हात बैलाच्या नाकपुड्यांत शिरला व नाक आंतून दाबतांच बैल कळवळूं लागला. यानें नाक तसेंच दाबून बैल खालीं बसतांच त्याच्या वशिंडावर हा चढून बसला व बैलास ताब्यांत आणलें. यावरून या शशादपुत्राचें 'ककुत्स्थ'–वशिंडावर बसणारा असें सामर्थ्यसूचक नांव

पडलें. याप्रमाणें बैलाचें मर्मस्थान सांपडल्यानें बैलाचे नाकांत वेसण घालून त्यास वश करण्याची कला निघाली. एवढा पराक्रमी ककुत्स्थ पण आयूपुढें त्याचें सामर्थ्य फिक्कें पडलें. त्यास वैशालीच्या व विदेह देशाच्या राजांसह आयूचे सामंत म्हणूनच राहावें लागलें. पुरूरव्यानें जसें गंधर्वकन्येशीं लग्न लावलें होतें, तसें आयूनें एका दानव मुलीशीं लग्न केलें व तिच्यापासून त्यास एक मुलगा झाला. दानव लोक पूर्णपणें स्वार्थी म्हणून प्रसिद्ध होते. हा गुण या जातीच्या मुलांत उतरला. हा अगदीं लहानपणापासूनच कुणालाहि न कांहीं देणारा म्हणून 'नहुष' नांवानें प्रसिद्ध झाला.

९. नहुष स्वार्थी असला तरी फार पराक्रमी होता. यानेंहि अपार संपत्ति मिळविली व राज्यांतील प्रजेस सुखी ठेवलें. यानें माणसांनीं उचलून वाहून नेण्यासारखें एक वाहन शोधून काढलें व त्यांत तो बसून मिरवूं लागला. आपलें हें वाहन पुरोहितांनीं उचलावें म्हणून त्याच्या मनांत एकदा लहर आली व पुरोहितास त्यानें तसें सांगितलें. आठ पुरोहितांनीं तें वाहन, ती शिबिका उचलली व हळूहळू ते चालूं लागले. त्यांनीं जलद चालावें म्हणून तो त्यांस टोंचूं लागला, व म्हणाला 'सर्प, सर्प'. पुरोहित तें ऐकून चिडले व पालखी खालीं टाकून नहुषास पाडून त्याचे पाय धरून त्यांनीं त्यास जमिनीवरून एखाद्या सरड्यास शेपटी धरून ओढावा तसें फरपटत नेलें. तो त्यानंतर पुरोहितांच्या वाटेस गेला नाहीं. इकडे ककुत्स्थाच्या मुलानेंहि प्रजाजनांजवळून 'हें घें; हें घे' असें सर्व घेण्याचा सपाटा चालविला, तेव्हां तेथील पुरोहितांनींहि 'घे' 'घे' म्हणून त्या वेनावर प्रहार देण्याचा सपाटा चालविला व त्यास निजधामीं पाठवून त्याचा मुलगा पृथु यास गादीवर बसविलें.

१०. पृथूनें आपल्या विस्तीर्ण देशावर बरेच दिवस राज्य केलें. याच्यांच वेळीं भृगु पुरोहितांनीं जमिनींतून धातु खणून काढण्याची व अग्नीच्या साह्यानें त्यांस पृथक् करण्याची विद्या शोधून काढिली. पृथूनें या कामीं पुरोहितांस चांगली मदत केली व भूगर्भांतून धातु शोधून काढण्याच्या या क्रियेवरून त्यास पृथ्वीचें दोहन करून तेजस्वी वस्तु काढणारा म्हणूं लागले. पण पृथूचें नांव यापेक्षां दुसऱ्या एका गोष्टीसाठीं विशेष ध्यानांत ठेविलें पाहिजे. पूर्वजांची माहिती गोळा करण्याची कल्पना याच्या मनांत आली व त्यानें कांहीं लोकांस या कामींच नेमलें. या लोकांनीं जुनी माहिती एकत्र करावी व

राजघराण्यांतील लोकांस ऐकवावी, हेंच यांचें काम. पूर्वजांचीं कृत्यें ऐकवून त्यांनीं केलेलीं वाईट कर्में टाळण्यास व चांगलीं कर्में आचरण्यास प्रेरणा देणारे म्हणून या लोकांस 'सूत' म्हणूं लागले. पृथूनें ही प्रथा पाडल्यावर इतर राज्यांतहि हिचें अनुकरण झालें. नहुषानें तर आपल्या राज्यांत या गोष्टी साभिनय दाखविण्याची पद्धति सुरू केली. या कालापासून म्हणजे या देशांत राज्यस्थापना होऊं लागून पांच–सहा पिढ्यांचे आंतच म्हणजे जवळजवळ ९५ पिढ्या महाभारताचे पूर्वी इतिहास गोळा करण्याची व तो साभिनय ऐकविण्याची प्रथा येथें रूढ झाली. आमची इतिहासाची परंपरा इतकी जुनी आहे.

११. नहुषाचें लग्न एका पितृकन्येशीं झालें होतें. पितृकन्या या साध्या शब्दाचे पुराण-कवींनीं अनेक अर्थ केले आहेत व त्यावर कितीतरी कल्पना रचिल्या आहेत. 'परोक्षप्रिया देवाः' या वेदवचनानुसार या कवींनीं साध्या प्रत्यक्ष गोष्टी परोक्ष करून टाकल्या आहेत व त्या देवांना आवडल्या तरी आम्हां मानवांना आजतरी त्या विलक्षण गूढ व दुर्बोध झाल्या आहेत. या शब्दाचा सरळ अर्थ प्रतापचंद्र रायनें आपल्या महाभारताच्या भाषांतरांत 'बापाच्या घरीं राहणारी अविवाहित मुलगी' असा केला आहे. पण प्रत्येक मुलगी लग्न होईपर्यंत बापाच्याच घरीं असते. त्यावरून लग्न न झाल्यामुळें पुष्कळ वर्षें बापाच्याच घरीं राहणारी मुलगी असाच अर्थ करणें उचित होईल. हिचें नांव विरजा. हें नांवहि असाच अर्थ सुचवितें. नहुषानें हिच्याशीं लग्न केलें व हिच्यापासून त्यास दोन मुलगे झाले. यांचीं नांवें यति व ययाति. यतीचें लग्न ककुत्स्थाच्या नातीशीं म्हणजे वेनाच्या मुलीशीं झालें. या पतिपत्नींच्या मनावर आपापल्या वडिलांची पुरोहिताकडून कशी दशा झाली हें पाहून त्या वर्गाचा चांगलाच दरारा बसलेला होता. म्हणूनच यतीनें त्या वर्गाचे अंकित राहून राजा होण्यापेक्षां स्वतःच पुरोहित होण्याचें ठरविलें. यासाठीं त्यानें राज्याचा स्वीकार न करितां तो वनांत जाऊन तपस्या करूं लागला. सुखाचें जीवन सोडून कष्टमय जीवन त्यानें स्वीकारिलें. ययाति प्रतिष्ठानचा राजा झाला.

१२. प्रतिष्ठानच्या उत्तरेस देव व दानव लोकांचें राज्य होतें. या दानव लोकांतीलच एक मुलगी नहुषाची माता असल्याचें पूर्वी सांगितलेंच आहे.

देव जातीच्या राजास इंद्र असें म्हणत. हें देवराजाचें कायमचें नांव. देव व दानव या दोन्ही राज्यांचें पौरोहित्य भृग्वंगिरस् पुरोहितांपैकीं दोन व्यक्तींनीं आपल्या विद्वत्तेनें मिळविलें होतें. देवांचा पुरोहित होता आंगिरस बृहस्पति, व दानवराज वृषपर्व्याचा पुरोहित होता भार्गव शुक्र. शुक्राचार्याचें एका इंद्रकन्येशीं लग्न झालें होतें. हिचें नांव जयन्ती. हिच्यापासून शुक्रास जी मुलगी झाली तिचें नांव देवयानी. देवयानीची आई लहानपणींच वारल्यामुळें ही शुक्राचार्यांची फार लाडकी होती. शुक्रास एक संजीवनी नांवाची अशी औषधि ठाऊक होती कीं, जिच्या योगानें युद्धांत निकामी झालेल्या सैनिकांस लवकरच पूर्ववत् करितां येत असे. मृत संजीवनी विद्या ती हीच. पण पुराण-कवींनीं याचा अगदीं वाच्यार्थ करून केवढी तरी काल्पनिक कथा उभारली! ही कला बृहस्पतीस माहीत नसल्यानें त्यानें आपल्या कच नांवाचे मुलास ही शिकण्यासाठीं शुक्राचार्यांकडे पाठविलें. जो येईल त्यास विद्या शिकवावयाची हा तर आचार्यांचा बाणाच असे. कचावर देवयानी मोहित झाली व तिनें बरेच वेळां दानवत्रासापासून कचास बांचविलें व विद्या प्राप्त करण्यास त्यास मदत केली. विद्या शिकल्यावर कच परत जाऊं लागला तेव्हां देवयानीनें आपली त्याच्याशीं लग्न करण्याची इच्छा प्रकट केली, पण कचानें तिला गुरुभगिनी मानून ती गोष्ट मान्य केली नाहीं. आज परदेशीं विद्या शिकण्यासाठीं जाणाऱ्या आमच्या तरुण विद्यार्थ्यांनीं ही गोष्ट ध्यानीं धरण्या-जोगी आहे. दानवराज वृषपर्व्यासहि शर्मिष्ठा नांवाची एक कन्या होती. ती व देवयानी मैत्रिणी होत्या. पण एकदा कांहीं कारणावरून दोघींचीं भांडणें हातघाईवर आलीं, व शर्मिष्ठा देवयानीस एका खाड्यांत लोटून निघून गेली. दैवयोगानें ययाति मृगया करीत त्या ठिकाणीं आला असतां त्यानें हिची हांक ऐकली व हांकेसरसा धावून त्यानें हिचें करग्रहण करून नुसती हिला खाड्यां-तूनच बाहेर काढिली नाहीं तर 'गृह्णाति ते सौभगत्वाय हस्तम्' म्हणून हिचें पाणिग्रहणहि केलें. देवयानीकडून शर्मिष्ठेची माहिती समजल्यावर थोड्याच दिवसांनीं यानें शर्मिष्ठेशीं लग्न केलें.

१३. देवयानी लग्न होऊन पतिगृहीं गेल्यानंतर विधुर शुक्राचार्यानें 'गो' नांवाच्या एका पितृकन्येशीं विवाह केला. हिच्यापासून यास तीन मुलगे झालेः— त्वष्टा, शण्ड आणि मर्क. त्वष्ट्यास दोन मुलें झालीं—विश्वकर्मा व

विश्वरूप. वडील मुलगा बापाबरोबरच शिल्पविद्येंत निष्णात झाला. गृहनिर्माण व इतर शिल्पकलेचे प्रवर्तक हेच पितापुत्र. विश्वरूप अनेक प्रकारचीं रूपें घेत असे. बहुरूपी असल्यामुळें यास त्रिशिरस् असेंहि म्हणत. हा शुक्राचार्यानंतर दानव–पुरोहित झाला व इंद्राकडून मारला गेला. असुरांचा पराभव झाल्यानंतर शण्ड व मर्क दोघेहि देवांकडे आले. कांहीं दिवस यांचा सन्मान झाला, पण पुढें फितुरी म्हणून देवांकडून यांस घालवून देण्यांत आलें. या गोष्टीचा उल्लेख पुढच्या वैदिक वाङ्मयांतहि आढळतो. भार्गव वंशांतल्या एका च्यवनपुत्र अप्नवानाशीं नहुषाच्या मुलीचें म्हणजे ययातीच्या बहिणीचें लग्न झालें होतें. भार्गव कुलांतले हे पुरोहित त्या कालीं प्रसिद्ध होते.

१४. ययाति फार पराक्रमी पुरुष होता. आसपासच्या राजांस अंकित करून हाहि चक्रवर्ती झाला. देव व दानव आपला प्रांत सोडून गेले. देव अगदीं पूर्वेस वैशालीपलीकडे गेले व दानव दक्षिणेस व पश्चिमेस पांगले. यांचें राज्य जें नष्ट झालें तें झालेंच. ययातीच्या कालींच क्षत्रवृद्धानें काशीचें राज्य स्थापन केलें होतें. देवयानीपासून दोन व शर्मिष्ठेपासून तीन अशीं पांच मुलें ययातीस झालीं. देवयानीच्या मुलांचीं नांवें यदु व तुर्वसु. द्रुह्यु, अनु व पूरु हीं शर्मिष्ठेचीं मुलें. याप्रमाणें ययातीचें राज्य मोठें डौलांत चाललें होतें. पराक्रम हा ययातीचा फार मोठा गुण होता. पण याच बरोबर यांत एक फार मोठा अवगुण होता–तो म्हणजे कामासक्ति. इतकीं मुलें, दोन सुंदर स्त्रिया व इतकीं वर्षें राज्योपभोग, पण हें सारें असूनहि याची कामवासना अतृप्तच राहिली होती. त्यामुळें ज्या वयांत मुलास राज्य देऊन विरक्त व्हावयाचें त्या वयांत ययातीनें आपल्या वर सांगितलेल्या पांचहि मुलांस बोलाविलें व 'आणखी कांहीं वर्षें तरुणाप्रमाणें स्त्रीसुख व राज्योपभोग घेण्याची माझी इच्छा आहे. सबब मी आणखी कांहीं दिवस राज्य करणार आहें. तुम्हांपैकीं ही सूचना कोणास मान्य आहे?' असें विचारिलें. शर्मिष्ठेचा धाकटा मुलगा 'पूरु' सोडून बाकी चौघांनींहि आपली नापसंती दाखविली. म्हणून ययातीनें 'माझें राज्य पूरूस मिळेल. तुम्हांस मिळणार नाहीं' असें सांगून त्यांस राज्याबाहेर केलें. तारुण्य स्वीकारण्याची ही साधी कथा. पण पुराणकर्वीनीं या वार्धक्यतारुण्याच्या अदलाबदलीवर किती मनोहर कल्पना बसवून तिला मनोरंजक केलें आहे, हें तज्ज्ञांस सांगावयास नकोच. याप्रमाणें पूरु

युवराज झाला व आणखी कांहीं दिवस ययातीनें सुखोपभोगांत घालविले. पण शेवटीं त्यास असेंच आढळून आलें कीं, कामोपभोगानें कामशांति न होतां ती उलट वाढतच जाते. ययातीचे हे शेवटचे विचार पुढील लेखकांनीं पुराणगाथा म्हणून पुढील शब्दांत नमूद करून ठेविले आहेत.

"न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ।
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ॥"

'पूरु' वंश चालविणारा झाला. याचे वंशज पौरव म्हणविले गेले.

१५. याप्रमाणें या पुराणेतिहासाचा वैवस्वतमनु ते ययातीपर्यंत सात पिढ्यांचा एक महत्त्वाचा कालखंड समाप्त होतो. या काळांत वसिष्ठ व भृगु असें नांव धारण करणारे दोन पुरोहितवर्ग या देशांत आले. वसिष्ठ-वर्गाच्या मागोमाग वैवस्वत किंवा इक्ष्वाकुवंशीय पुरुषांनीं येऊन कोशल, वैशाली व विदेह हीं तीन राज्यें स्थापन केलीं. भृगुवर्गाच्या साह्यानें पुरूरवा व त्याचे वंशजांनीं प्रतिष्ठान, कान्यकुब्ज व काशी या राज्यांची स्थापना केली. याशिवाय गय व उत्कल देश वसविले गेले. शेतींत सुधारणा होऊन ऊस व भात यांची शेती होऊं लागली. भूगर्भांतून धातु काढण्याची विद्या निघाली. घोडे व बैल माणसाळले गेले व गृहनिर्माणकला तदनुषंगिक गोष्टींसह निर्माण झाली. जुना इतिहास गोळा करण्याचें काम सुरू झालें व रूप आणि अभिनय याचे साह्यानें तो दाखविला जाऊं लागला. नवीं नवीं औषधें शोधिलीं गेलीं व अभिचारकर्महि थोडें थोडें होऊं लागलें. पुरूरव्यानें गांधर्वविवाह केला व त्यानेंच केलेल्या तीन अग्निभेदांचे व सोमरसाचे साह्यानें भृगु पुरोहितांनीं सोमयागासहि सुरुवात केली.

१६. शेवटीं एक सूचना देऊन हा प्रथम सर्ग पुरा करूं. या इतिहासांत जेव्हां अमुक एक कला किंवा विद्या निघाली असें म्हटलें आहे तेव्हां त्यापूर्वी ती गोष्ट अस्तित्वांत नव्हतीच असें म्हणावयाचा उद्देश नाहीं. पण ती अस्तित्वांत असल्याचा पुरावा सांपडलेला नाहीं. तसा एखादा प्रबळ पुरावा सांपडल्यास त्या गोष्टीचा उत्पत्तिकाल आणखी पूर्वी जाऊं शकेल. जेथें जेथें एखाद्या गोष्टीचा प्रथम उल्लेख सांपडला तेथें तेथें त्याहून प्राचीन प्रमाण न सांपडल्यामुळें ती गोष्ट त्या सुमारास नवीनच अस्तित्वांत आली असावी व म्हणूनच तिचा उल्लेख आवर्जून केला असावा असें गृहीत

धरलें आहे. एवढें लक्षांत ठेविलें म्हणजे या इतिहासावर उगाच घेतले जाणारे आक्षेप नाहींसे होतील.

१७. मागील सर्व निवेचनावरून स्पष्ट होईल कीं, आम्ही मानव या देशांत प्रथम कसे आलों व आमची वाढ कसकशी झाली. वैवस्वतमनूपासून ययातीपर्यंतच्या या सात पिढ्यांचे कालांत किंवा महाभारतापूर्वी शंभर तें चौऱ्याण्णव पिढ्यांचे कालांत आम्हीं या विषयांत किंवा देशांत प्रवेश केला. त्याचप्रमाणें आपणहि या महाभारतपूर्व राजकीय व सांस्कृतिक इतिहासांत या प्रकरणानें प्रवेश केला व म्हणूनच या सर्गास विषय-प्रवेश असें द्वयर्थी नांव दिलें गेलें.

☆ ☆ ☆

सर्ग दुसरा

पुरोहितवर्गाचे प्रयत्न

१. गेल्या सर्गांत आपण वैवस्वतमनूपासून ययातीपर्यंतच्या सात पिढ्यांचा म्हणजे महाभारतपूर्व शंभर ते चौऱ्याण्णव पिढ्यांच्या कालांतला इतिहास पाहिला. त्यांत आपणांस असें आठळून आलें कीं, वसिष्ठ व भृगु या दोन पुरोहितवर्गांनीं पुढें येऊन विद्या व कला यांची जोपासना करीत जनहित केलें व आपले पाय स्थिर रोवले आणि त्यामागून निरनिराळ्या पराक्रमी पुरुषांनीं या देशांत सहा राज्यांची स्थापना केली. या सर्गांत यापुढील इतिहास पाहावयाचा आहे.

२. या वेळीं असा साधारण नियमच होता कीं, नवीन स्थापिलेलें राज्य संस्थापकानें एकाच मुलास द्यावयाचें व इतर मुलांस अन्यत्र पराक्रम करून राज्यसंस्थापनेसाठीं मोकळें सोडावयाचें. राज्यें स्थापन करण्याचा क्रम मात्र तोच. आधीं पुरोहितांनीं पुढें जाऊन जम बसवावयाचा व मागून पराक्रमी पुरुषांनीं येऊन राज्यसंस्थापना करावयाची. याप्रमाणें ययातीचें राज्य जेव्हां पुरूस मिळालें, तेव्हां राज्याबाहेर पडलेल्या त्याच्या चारी भावांनीं प्रतिष्ठानच्या बाहेर आपापलीं राज्यें स्थापन करण्याचा प्रयत्न केला. नैर्ऋत्येस वेत्रवतीकांठीं यदूनें आपलें राज्य स्थापन केलें. आग्नेय दिशेस शोण नदीपर्यंतच्या भागावर तुर्वसूचें आधिपत्य स्थापित झालें. वायव्येकडे द्रुह्य वाढूं लागला व गंगायमुनेच्या अंतरवेदींत पण प्रतिष्ठान राज्याच्या उत्तरेस अनूनें आपलें आसन जमविलें. याप्रमाणें त्याण्णव पिढ्या महाभारतापूर्वी, पूर्वीचीं सहा–कोशल, वैशाली विदेह हीं तीन व प्रतिष्ठान, कान्यकुब्ज व काशी

हीं तीन मिळून आणि वर सांगितलेलीं चार अशीं दहा राज्यें या देशांत चाललीं होतीं. पहिलीं सहा स्थिर झालीं असल्यानें मर्यादित होतीं; विद्या, कला व ज्ञान यांची तेथें वृद्धि होत होती. पण ययातीच्या इतर चार मुलांचीं राज्यें वर्धिष्णु होतीं. त्यांच्या विस्तारास भरपूर वाव होता. पुढचा इतिहास समजण्यासाठीं ही गोष्ट नीट ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे.

३. यदूला दोन मुलें होतीं – क्रोष्टु व सहस्रजित्. वडीलपणाच्या हक्कानें क्रोष्टूला यदुराज्य मिळालें. याची सेना शूर असल्यानें याच्या ताब्यांत असलेल्या देशास शूरसेन असेंच नांव पडलें. सहस्रजित् आणखी नैर्ऋत्येकडे वाढला व उंच असलेल्या माळावरील मालव देशांत त्यानें आपला जम बसविला. तुर्वसूचे वंशज शोणच्या कांठाकांठानें थोडे दक्षिणेकडे वळले व कारूष देशीं त्यांनीं आपलें ठाणें बसविलें. अनूच्या वंशजास गंगायमुनेमधील उत्तरेकडचा सुपीक प्रांत सांपडला व तोच त्यांनीं नीट सांभाळला. द्रुह्यूचे वंशज आणखी वायव्येकडे वळले व पंचनद देशांत शिरून त्यांनीं आपलें राज्य जमविण्याची खटपट केली. पण त्यांस तेथें एका निराळ्याच पुरोहितवर्गाशीं सामना करावा लागला.

४. द्रुह्यूचे वंशज स्वभावतःच द्रोही होते. लोकांस आपलेंसें करून त्यांवर सत्ता चालविण्याऐवजीं हे जुलूम जबरदस्तीनें सत्ता स्थापूं पाहात. त्यामुळें लोकांत असंतोष पसरे. या असंतोषाचा फायदा या नव्या पुरोहितवर्गानें घेतला. त्यांनीं असा विचार केला कीं, सत्ता एकाच व्यक्तीच्या हातीं असल्यास ती व्यक्ति चांगली असेल तर ठीक. पण तीच जर चांगली नसेल तर पिशाचाचे हातीं कोलीत अशी स्थिति होते. तेव्हां कोणत्याहि एकाच पराक्रमी पुरुषास सत्ताधीश करण्यापेक्षां त्या सत्तेचें विभाजन करून लोकांतल्याच कांहीं चांगल्या लोकांच्या हातीं ती मर्यादित रूपानें दिल्यास लोकांचें अधिक हित होण्याचा संभव आहे. या वर्गानें ही कल्पना लोकांत पसरवून लोकजागृति करण्याचा व द्रुह्युवंशजांचा विरोध करण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें खटपट सुरू केली.

५. या वर्गाच्या प्रमुख व्यक्तीचें नांव 'अत्रि'. द्रुह्युवंशजांस दोनच पुरोहितवर्ग परिचित होते–वसिष्ठ व भृगु. या दोन्ही वर्गांची राजविषयक कल्पना निराळी होती. त्यांस वैराज्याची म्हणजे राजा नसताना अराजक

राज्याची कल्पनाच नव्हती. सर्वत्र द्रुह्युवंशजांनीं जेव्हां या वर्गप्रमुखास पृच्छा केली कीं, "तुम्ही आहांत तरी कोण? वसिष्ठ कीं भृगु?" तेव्हां या प्रमुख व्यक्तीनें मोठें मजेचें उत्तर दिलें. इतिहास गोळा करणाऱ्यांनीं तें विलक्षण असल्यामुळें नमूद करून ठेवलें. पुढील कवींच्या भाषेंत तें असें आहे–'अहं तृतीय इत्यस्मि तस्मात् अत्रिः प्रकीर्तितः' तो म्हणाला–मी नाहीं पहिला वसिष्ठ किंवा दुसरा भृगु. मी तिसरा आहें. पण माझ्याशिवाय तिसरा कोणी नाहीं म्हणून मी अत्रि या नांवानें ओळखिला जातों. हा वर्ग हिमालयाकडून आलेल्या वर्गाहून भिन्न असून हा वायव्य दिशेनें आलेला होता व म्हणूनच तो आपणांस या दोहोंहून वेगळा मानीत असे.

६. राजा असलेल्या देशांत राजसत्ता उलथून पाडावयाची म्हणजे सोपें नव्हे. असा प्रयत्न करणाऱ्यांस सत्ताधारी लोकांकडून सर्वच प्रकारचे त्रास सहन करावे लागतात, आणि हे सारेच त्रास अत्रिवर्ग पुरोहितांना सहन करावे लागले. ते बांधून ठेवले गेले, त्यांचीं घरेंदारें जाळलीं गेलीं व या लोकांसहि जिवंत जाळण्याचे प्रयत्न झाले. या गोष्टी पुढील अत्रिवर्गांतील सूक्तकारांनींच नव्हे तर इतर सूक्तकारांनींहि नमूद करून ठेविल्या आहेत. अत्रिपुरोहितांस कष्ट सहन करावे लागले खरे, पण शेवटीं द्रुह्युवंशजांस आणखी पश्चिमेकडे व वायव्येकडे पळून जावें लागलें व पंचनद देशांत लोकसत्ताक राज्यपद्धति झालीच झाली. नवी गोष्ट फार लवकर पसरते. त्याप्रमाणें माळव्यांतील सहस्रजित्च्या वंशजांची सत्ताहि भृगु पुरोहितांनीं उधळून लाविली व तेथेंहि असेंच स्वराज्य संस्थापित झालें. पुढील सूक्तकारांनीं या स्वराज्यासच 'बहुपाथ्य स्वराज्य' असें म्हटलें आहे. या गोष्टीस पांचचार पिढ्यांचा काळ लोटला. म्हणूनच या कालांत द्रुह्य व सहस्रजित्चे वंशावळींत राजे लोकांचीं नांवें सांपडत नाहींत.

७. पंचनद व मालव देशांत या गोष्टी होत असतांना इकडे कोसल देशांत राज्यशासन वसिष्ठवर्गाच्या मदतीनें सुव्यवस्थित चाललें होतें. विनताश्वानें घोडे माणसाळण्याची कला शोधून काढल्याचें पूर्वी सांगितलेंच आहे. बैलाच्या नाकांत जशी वेसण तसा घोड्याच्या तोंडांत लगाम देऊन त्यावर स्वारी करण्याचा प्रयोग सुरू झाला. हा प्रयोग करणारा कोसलराज आपणास मोठ्या ऐटीनें विष्टराश्व म्हणजे घोड्यावर आसन ठोकणारा

म्हणवूं लागला. एकांगी म्हणजे नुसत्या पाईक शिपायांनीं युक्त सैन्यांत घोडेस्वार ठेवले जाऊन सेना द्यनीकिनी झाली. घोडदळांमुळें एकदम शत्रूवर तुटून पडणें व पराभव झाला असतां वायुवेगानें पळून जाणें दोन्ही गोष्टी सुकर झाल्या. घोडदळाची वाढ कोसल देशांतच विशेषेंकरून झाली. या गोष्टीस विष्टराश्वानंतर अकरा राजांपैकीं आठांचीं नांवें अश्वयुक्त आहेत हें सबल प्रमाण आहे. विष्टराश्वाच्या नातवाचें नांव युवनाश्व–तरुण घोडेवाला. हें नांव पुढेंहि रूढार्थानें आल्यामुळें यास आपण प्रथम युवनाश्व म्हणूं. याचा मुलगा श्रावस्त. यानें श्रावस्ती नगरी वसवली. श्रावस्ताचा मुलगा बृहदश्व–मोठे घोडे ठेवणारा. बृहदश्वाच्या मुलाचें नांव कुवलाश्व–पृथ्वीस घोड्यानें झांकणारा–म्हणजे घोडयांची प्रचंड फौज ठेवणारा. या पांच-सात पिढ्यांचे कालांत देशांत राजकीय दृष्टीनें एक प्रकारची शिथिलता आली होती. नोंद करून ठेवण्यासारखी विशेष राजकीय घटना घडली नाहीं.

८. पंचनद व मालव देशांत लोकशासित राज्यें चाललींच होतीं. या राज्यपद्धतींत असा एक दोष येतो कीं, सारे अधिकारी चांगले असले तर ठीक. पण जर का यांच्यांत अवगुण शिरले तर कुणाहि एकाची पुरी भीति नसल्यामुळें या राज्यांत बजबजपुरी माजते. प्रसंग आला असतां एकाचीच आज्ञा शिरोधार्य मानण्याची संवय सुटल्यानें भरदिशीं सारे लोक ऐकमत्यानें वागत नाहींत. मालव लोकसत्तेवर लवकरच असा एक प्रसंग आला व ती निर्बल ठरली. मालवाच्या पश्चिमेकडून धुंधु नांवाचे लोक वावटळीसारखे माळव्यांत शिरले. हल्ला करितांना हे लोक धुंधुं असें ओरडत असत. लूटमार करावयास आलेल्या टोळीचा मालव लोकसत्तेस हा पहिलाच अनुभव. घाबरून शासकवर्ग प्रतिष्ठानाकडे धावला. त्या पाठीमागें इतर लोक व मागून टोळधाडीसारखे धावणारे धुंधु. पौरव राज्यांत त्यावेळी पुरूचा सातवा वंशज राज्य करीत होता. यानें मालवांस अभय दिल्यानें हा अभयद म्हणविला गेला. पण धुंधूचें वर्णन ऐकून यास आपण त्यांस पुरेसे पडणार नाहीं असें वाटल्यानें त्यानें कोसलराज कुवलाश्वाजवळ मदत मागितली. अशी मदत मागण्याचाहि हा ऐतिहासिक पहिलाच प्रसंग. कुवलाश्वानें आपल्या घोडदळासह वायुगतीनें येऊन धुंधूवर हल्ला केला व त्यांस पूर्णपणें पिटाळून लाविलें. या पराक्रमानें कुवलाश्व धुंधुमार या नांवानें प्रसिद्ध झाला.

'धुंधु' शब्दहि याच वेळीं रूढ झाला. अभयदास तर तो इतका आवडला की त्यानें आपल्या मुलाचें नांव धुंधुच ठेविलें.

९. हे धुंधु कोठून आले व कुठें गेले याबद्दल आमच्या इतिहासांत कांहींच पत्ता लागत नाहीं. हे आले तसे नुसते नामशेष होऊन गेले; पण यांच्या मान्यानें मालवलोकसत्ता मात्र खिळखिळी झाली. हें पाहून सहस्रजित्चा एक वंशज पुढें झाला व 'धुंधु' सारखे 'है हे' 'है हे' असे रणशब्द करूं लागला. यावरून याचें नांवच 'हैहय' पडलें. याचे वंशजहि आपणांस हैहयच म्हणवीत. यानें मालव लोकसत्ता नष्ट केली व आपलें एकतंत्री राज्य तेथें स्थापित केलें. इकडे कोसल राज्यांत ज्याप्रमाणें अश्वधन वाढत होतें तसेंच पौरव राज्यांत गोधनाची वाढ होत होती. या दोन्ही धनांची देवाण–घेवाणहि चालत असे. पौरव राजांनींहि सैन्यांत घोडदळ ठेवण्यास आरंभ केला. हा राजा आपणांस रौद्राश्व म्हणवूं लागला. यादव राजांनींहि गोधन वाढविण्यास आरंभ केला व पौरव बहुगव राजाप्रमाणें एकानें 'रुशद्गु' तेजस्वी गाई ठेवणारा असें नांव धारण केलें. एकंदरींत ययातीनंतरच्या दहाबारा पिढ्यांचा हा काल धुंधूंची स्वारी सोडली तर बराच शांततेंत गेला.

१०. मालव देशांतून जरी लोकसत्तेचें उच्चाटन झालें तरी पंचनद देशांत ती उत्तम प्रकारें चालली होती. याचें सारें श्रेय अत्रि पुढाऱ्यांसच द्यावयास हवें. यांनीं दुसरें कुठलेंहि काम न करतां राजकारणाकडेच सारें लक्ष पुरविलें व लोकशासन दृढपणें चालविलें. वर सांगितलेल्या शांततेच्या कालाचे शेवटीं हीं शासनसूत्रें प्रभाकर आत्रेय नांवाच्या पुढाऱ्याचे हातीं होतीं. याचेच वेळीं पौरव रौद्राश्वानें आपल्या घोडदलाच्या सामर्थ्यावर विसंबून पंचनदावर स्वारी केली. पण प्रभाकर आत्रेयापुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं. लोकसत्ता इतकी समर्थ व सुसज्ज होती कीं, तिच्या फौजेपुढें रौद्राश्वाच्या घोडदळासहि माघार घ्यावी लागली व प्रभाकर आत्रेयापुढें खालीं मान घालूनच रौद्राश्वास परतावें लागलें. घोडदळावर विसंबून रौद्राश्वाच्या मुलीहि स्वारीबरोबर होत्या. त्यांनीं परत न जातां प्रभाकराशीं लग्न करून तेथेंच राहावयाचें ठरविलें. या मुलींपासून प्रभाकरास जी संतति झाली ती स्वस्त्यात्रेय नांवानें प्रसिद्ध झाली. यांनीं जिकडे तिकडे आपल्या राज्यांत सुखसमृद्धि

वाढविली व सर्वत्र 'स्वस्ति' असें लोक बोलूं लागले.

११. पण बदल हा कालाचा धर्मच आहे. तो केव्हांहि सारखा राहात नाहीं. युद्धानंतर शांतता व शांततेनंतर युद्ध हें रहाटगाडगें सारखें फिरतच असतें. त्याप्रमाणें वैवस्वतमनूनंतर विसाव्या पिढींत किंवा ऐशी पिढ्या महाभारतापूर्वी यादववंशांत एक पराक्रमी राजा झाला. याच्या वेळीं रथाचें एक नवीन वाहन निघालें. राजास हें वाहन फार पसंत पडलें. त्यानें एक, दोन, तीन व चार असे घोडे या वाहनास जुंपून पाहिले व या वाहनाचा सैन्यांत समावेश केला. घोड्यावर स्वार अगदीं उघडा पडत असे, पण रथांत असलेला वीर त्यापेक्षां अधिक सुरक्षित राही. त्यामुळें रथ एक सैन्याचें मुख्य अंग झालें व द्व्यनीकिनी सेना त्र्यनीकिनी झाली. गृहनिर्माणकलेंत जेवढें कुशलतेचें सुतारकाम लागे, त्यापेक्षां कितीतरी अधिक कौशल्य, रथ निर्माण करतांना सुतारास दाखवावें लागे. त्यामुळें कुशलतेचें उपमानभूतच सुतार झाला. पुढील सूक्तकार कवींनीं आपल्यास याचीच उपमा घेतली आहे. या राजाचेंहि नांव त्यामुळें चित्ररथ असेंच प्रसिद्ध झालें. कुठलेंहि नवें साधन निर्माण झालें कीं, त्याच्या जोरावर कांहीं दिवस सैन्य विजयी होतच जातें. त्यास अनुसरूनच चित्ररथाचा मुलगा शशबिंदु यानें कांहीं लढाया जिंकल्या व गेल्या बारा पिढ्यांत जें चक्रवर्तिपद कोणीं प्राप्त केलें नव्हतें तें प्राप्त केलें. याच्या भीतीनें हैहय आणखी नैर्ऋत्येस सरकले व नर्मदा उतरून तापीतीरीं पोंचले.

१२. याच सुमारास कोसलेश्वर प्रसेनजित् यानेंहि कांहीं विजय मिळविले व पूर्वेकडील राजांस अंकित करण्याचा सपाटा चालविला. पौरव रौद्राश्वाचा अतिनार नांवाचा नातु प्रसेनजित्च्या वेळीं पौरव राजा होता. प्रसेनजित्नें यास जिंकून आपला सामंत केलें. अतिनारानें आपली गौरी मुलगी प्रसेनजित्च्या युवनाश्व नांवाच्या मुलास दिली. हा युवनाश्व द्वितीय. या द्वितीय युवनाश्वास गौरीपासून जो मुलगा झाला त्याचें नांव मांधाता. हा फार महत्त्वाकांक्षी होता. आनव, काशी, कान्यकुब्ज इत्यादि देशच्या राजांस यानें अंकित तर केलेंच, पण पौरव अतिनार व त्याचा मुलगा तंशु यांच्या मृत्यूनंतर पौरव राज्यावर दौहित्र या नात्यानें वारसा सांगून तें राज्य कोसल राज्यांतच मिळवून टाकिलें. एखादें राज्य जिंकून पूर्णपणें गिळंकृत करण्याचें

हें पहिलेंच उदाहरण. यामुळें मांधात्याच्या राज्याचा विस्तार फार मोठा झाला. आमच्या वेळीं इंग्रजी इतिहास सांगतांना शिक्षक असें सांगत कीं, इंग्रजी राज्यावर सूर्य कधीं मावळत नसे. म्हणजे इंग्रजी राज्याच्या कुठल्या तरी भागावर दिवस हा असेच, आणि आमच्यासारखे फाजील विद्यार्थी— म्हणजेच इंग्रजी राज्याच्या कुठल्या तरी भागावर अंधार असणारच— असें म्हणत असूं. तशीच प्रसिद्धि त्या काळीं मांधात्याची होती. ही प्रसिद्धीची जुनी गाथा पुराणकवींच्या भाषेंत पुढीलप्रमाणें आहे.

यावत्सूर्य उदयति यावच्च प्रतितिष्ठति ।
सर्वं तत् यौवनाश्वस्य मांधातुः क्षेत्रमुच्यते ॥

राज्यविस्तारामुळें हा नुसता चक्रवर्तीच नाहीं तर सम्राट् म्हणविला गेला. पण याची महत्त्वाकांक्षा एवढ्यानेंहि पुरी झाली नाहीं. राज्यमदांत येऊन यानें पौरव रौद्रश्वाप्रमाणेंच पंचनद देशच्या लोकशासित राज्यावर स्वारी केली. पण 'मला' 'मला' असें म्हणणारा हा मांधाता त्या स्वारींत मारला गेला. एवढा पृथ्वीपति सम्राट् पण आपल्या हातांत जेथील हातभरहि भूमि नाहीं अशा ठिकाणीं रिकाम्या हातानें ही भूमि सोडून गेला. ही गोष्ट ध्यानीं आणूनच एका आधुनिक कवीनें मांधात्याचें व इतर महत्त्वाकांक्षी राजांचीं उदाहरणें देऊन 'नैकेनापि समंगता वसुमती' असें विधान केलें आहे. ही पृथ्वी कोणाबरोबर गेली नाहीं व कोणाबरोबर जाणारहि नाहीं !

१३. मांधाता मारला गेला, पण याच्याशीं लढण्यांत पंचनद लोकसत्तेची सारी शक्ति खर्ची पडून ती सत्ता अगदीं निर्बल झाली. ही संधि साधून द्रुह्यु वंशांतल्या अंगार नामक पुरुषानें पंचनदांतली ही सत्ता नाहींशी करून आपलें एकतंत्री राज्य स्थापन केलें. याप्रमाणें पंचनद देशांत अत्रि पुरोहितांनीं स्थापन केलेलें व चौदा पिढ्या उत्तम रीतीनें चाललेलें लोकसत्ताक राज्य अंगारानें अंगारवत् करून टाकिलें. कालाचा महिमा असाच आहे ! एकसूत्री राज्यांत आतां आपला निभाव लागणें कठीण समजून आत्रेयवर्गाचे लोक पंचनददेश सोडून पळाले व दक्षिणेस माळव्यांत येऊन भृगुपुरोहितांबरोबर इतर पौरोहित्य कर्मे करीत राहिले. यानंतर अत्रिवर्गानें राजकीय उलाढालींत भाग घेतला नाहीं.

१४. मांधात्याचा मोठा मुलगा पुरुकुत्स. यानें आपल्या फौजा नर्मदा-तीरावरील नाग लोकांनीं आपल्या शत्रूविरुद्ध मदत मागितल्यामुळें नर्मदेवर नेल्या व नागशत्रूंचा नाश केला. नागराजानें आपली नर्मदा नांवाची मुलगी पुरुकुत्सास अर्पण केली. पुरुकुत्साचा धाकटा भाऊ मुचकुंद या स्वारींत फौजे-बरोबर होता. तो नर्मदातीरींच राहिला व विंध्य आणि ऋक्ष (हल्लींचा सातपुडा) पर्वत जेथें अगदीं जवळ जवळ येतात असें एक स्थान निवडून नर्मदेनें कंबरपट्ट्याप्रमाणें वेढलेल्या एका डोंगरावर त्यानें एक नगरी वसविली व तिला आपला पिता मांधाता याचें नांव दिलें. नागांचें दैवत शंकर याची स्थापना प्रथम येथें झाली. तेंच हल्लींचें ॐ कारमांधाता. शंकराच्या बारा ज्योतिर्लिंगांतलें हेंच पहिलें. याच मुचकुंदानें पुरिका नांवाची दुसरी लहान नगरी वसविली व तेथेंच राज्य करण्यास आरंभ केला. हें छोटेसें राज्य फार दिवस चाललें नाहीं. हैहयाच्या पहिल्याच फटकाऱ्यांत हें पुढें नाहींसें झालें.

१५. मांधात्यानंतर कोसल देशाचीहि शक्ति क्षीण झाली व त्यानें मांडलिक केलेले राजे हळूहळू डोकें वर काढूं लागले. मांधात्याचा नातु त्रसदस्यूच्या समकालीन राजांचीं नांवें या गोष्टीची सूचक आहेत. विदेशचा महावीर्य, आपल्या रथांमुळें शत्रूंच्या मनांत भीति उत्पन्न करणारा भीमरथ, मुचकुंदाचें राज्य नष्ट करून त्या दोन्ही नगरींची माहिष्मती नांवाची विशाल राजधानी आणि साहंजी (सध्यांची सांची) वसविणारा हैहय कुलांतला महिष्मन्त, द्रुह्युवंशीय अंगाराचा गांधार देशापर्यंत पोंचलेला गांधार हे सारेच पुरुकुत्स-पुत्र त्रसदस्यूपेक्षां बलशाली होते. पण या सर्वांत बलिष्ठ होता कान्यकुब्ज देशचा जह्नु. यानें आपल्या पराक्रमानें त्रसदस्यूस अंकित केलें व त्याच्या बहिणीशीं लग्न केलें. गंगानदीच्या कांठाकांठानें हा उत्तरेकडे वाढला व त्या वेळचा चक्रवर्ती म्हणविला गेला. पण जह्नूची प्रसिद्धि त्याच्या चक्रवर्तित्वापेक्षां पुराणेतिहासांत दुसऱ्याच एका गोष्टीविषयीं आहे. ऐतिहासिक साध्या कथेकर पुराणकवींनीं आपल्या आकाशांत भरारी मारणाऱ्या कल्पनेनें असंभाव्य पण श्रद्धावर्धक आणि मनोरंजक असें कथानक उभारून या कथेस विकृत करून टाकिलें आहे. ही कथा पुढीलप्रमाणें.

१६. एकदा जह्नूनें गंगेच्या तीरावर एक याग करावयाचा विचार

केला. सारी सामग्री गोळा झाली. पण गंगेस एकएकीं पूर येऊन ही सारी यज्ञसामग्री वाहून गेली. राजास राग येऊन रागाचे भरांत तो गंगेस पुढील अर्थाचें वाक्य म्हणाला :–

अस्य गंगेऽवलेपस्य सद्यःफलमवाप्नुहि ।
एतत्ते विफलं सर्वं पीतमंभः करोम्यहम् ।।

अर्थात् " हे गंगे, ही जी तुला मस्ती चढली आहे हिचें लगेच प्रायश्चित्त देण्यासाठीं हें तुझें सारें फुकट चाललेलें पाणी मी पीत (प्यालेलें) करून टाकतों. " गंगेला पुन्हा इतका पूर येऊन कांठावरल्या वस्तु वाहून जाऊं नयेत यास्तव जर तें फुकट जाणारें पाणी प्यालेलें करावयाचें असेल तर तें शेतांस पाजणारेंच व्हावयास पाहिजे हें अगदीं उघड आहे. पण पुढील पुराणकर्वीनीं ' पीतं करोमि 'चा ' पिबामि ' असा अर्थ करून जह्नूनें गंगा पिऊन टाकल्याची कथा प्रचलित केली. बरें एकदा जह्नूनें गंगा पिऊन टाकिली म्हणजे पुन्हा पूर येणार नाहीं असेंहि नाहीं व तें फुकट वाहून जाणारें पाणी सफल झालें असेंहि नाहीं. तेव्हां जह्नु राजानें वर कुठें तरी बांध बांधून त्यांतून कालवे काढिले व तें फुकट वाहात जाणारें पाणी शेतांस पाजून सफल केलें असाच अर्थ घेतला पाहिजे. असा अर्थ घेतला म्हणजे या राजानें कालवे काढून जी कृषि त्याचे वेळेपर्यंत ' देव-मातृका' म्हणजे नुसत्या पर्जन्यदेवावरच अवलंबून होती, तीस 'अदेवमातृका' म्हणजे नुसत्या पावसावरच अवलंबून न राहणारी केली असेंच सिद्ध होतें. या राजानें गंगेचे अनेक कालवे काढून शेतीस पाणी पाजलें व घरांत जसें मुलीस खेळवावें तसें गंगेस खेळविलें व यामुळेंच गंगेला जह्नुकन्या जाह्नवी म्हणूं लागले. या काळांतली म्हणजे सत्याहत्तर पिढ्या महाभारतपूर्वकालां-तली ही फार महत्त्वाची गोष्ट होती.

१७. चक्रवर्ती जह्नूनें गंगेच्या कांठाकांठानें जरी थोडें राज्य वाढविलें असलें तरी जह्नूनंतर कान्यकुब्ज राजाचें महत्त्व फारसें राहिलें नाहीं व त्याचा परिणामहि इतर राज्यांवर फारसा झाला नाहीं. राजकीय दृष्टीनें जरी जह्नूचें महत्त्व उरलें नाहीं तरी त्यानें सुरू केलेली अदेवमातृका शेतीची पद्धति मात्र सर्वत्र पसरली. मांधात्यानंतर जी परिस्थिति उत्पन्न झाली, तिच्यांत खरे पुढें आले तीन वंश – हैहय, आनव व द्रह्युवंशज. पैकीं हैहय मालव

देशांत समृद्ध झाले. माहिष्मती स्थापणाऱ्या महिष्मंताचा मुलगा भद्रश्रेण्य हैहयांनीं धुंधूचें अनुकरण नुसतें नांव धारण करण्यांतच केलें नाहीं तर त्यांच्या लूटमारीचेहि धडे गिरविण्यास आरंभ केला. मांधात्यानें वाटेंतलें पौरवराज्य नष्ट केल्यानें हैहयांस वाटेंत अडविण्यास कोणीच राहिला नाहीं व भद्रश्रेण्य हैहयानें सरळ काशीवर स्वारी केली व काशी जिंकून हा चक्रवर्ती झाला. पण हा अल्पवयांतच मेल्यानें काशीच्या प्रथम दिवोदास राजानें भद्रश्रेण्याच्या मुलांस मारून आपलें राज्य परत घेतलें. भद्रश्रेण्याच्या मुलांत वांचला एकच. याचें नांव दुर्दम.

१८. या भागांतली ही धावपळ या थराला पोंचली होती कीं, दक्षिणेकडील दण्डकारण्यांत जे राक्षस म्हणविले जाणारे लोक होते त्यांचा एक सेनापति क्षेमक दण्डकारण्यांतून वर उत्तरेस आला व दिवोदासास पळवून त्यानें काशी आपल्या ताब्यांत घेतली. दिवोदासानें गंगा-गोमती संगमावर अवीतरी (सध्यांची भितरी) नांवाची नगरी वसविली व तेथेंच तो राहूं लागला. दुर्दम हैहयानें पुन्हा काशीवर स्वारी करून क्षेमकास मारिलें, पण त्यानें काशी राजधानी न करितां छावणीच्या रूपांत ठेविली. क्षेमक मारलेला समजतांच राक्षसराज रावणानें या भागावर चढाई केली व काशीस कोणी राजा नाहीं असें पाहून त्यानें कोसल देशावर चाल करून त्रसदस्यूचा पौत्र अनरण्य यास ठार केलें व लूट करून तो परत गेला. रावण हें एका व्यक्तीचें विशेषनाम नसून राजा या अर्थी सामान्यनाम आहे. हा दाक्षिणात्य भाषेंतील शब्द आहे. आजहि तमिळ भाषेंतल्या विद्यमान 'इरैवण' या राजवाचक शब्दाशीं तो जुळतच आहे.

१९. अनुवंशांतील आनवराजेहि याच वेळीं विशेष प्रसिद्धीस आले. यांत दोन नांवें ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत. पहिला महाशाल यानें मोठमोठ्या इमारती बांधविल्या व वास्तुकलेची चांगलीच प्रगति केली. याचाच मुलगा महामना. यानें गंगा-यमुना उतरून पंचनद देशावर चढाई केली व थेट वितस्ता (झेलम) नदी पावेतोंचा प्रांत आक्रमण केला. इतिहासकार यास नुसता चक्रवर्ती न म्हणतां सप्तद्वीपाधिप असें म्हणतात. द्वीप शब्दाचा अर्थ दोन्ही बाजूंस पाणी असलेला अंतर्वेदि देश. हा अर्थ घेतला तर असें दिसून येईल कीं, गोमती, गंगा, यमुना, सरस्वती आणि

पंचनदांतल्या सिंधु सोडून चार नद्या अशा आठ नद्यांमधील सप्तद्वीपांवर याचें आधिपत्य होतें. महामनास उशीनर व तितिक्षु अशीं दोन मुलें होतीं. उशीनर शतुद्रु (सतलज) व विपाशा (ब्रियास) यांच्या संगमापासून पुढें वाढला व यौधेय व अंबष्ठ या दोन गणांवर विजय मिळवून त्यानें त्यांस आपलें अंकित केलें. या प्रांतास पुढें नवराष्ट्र नांव पडलें. कुमिला ही या नवराष्ट्राची राजधानी. उशीनराचा मुलगा शिबि. यानें शिविदेश व शिविपुर ही वसाहत केली. हाहि चक्रवर्ती होता. न्यायदानाबद्दल हा प्रसिद्ध होता. श्येन-कपोत कथेंत कपोतास वांचविण्यासाठीं यानें आपलें मांस कपोताच्या भारंभार कापून दिलें होतें. यानें पश्चिमेकडील देश जिंकून आपल्या मुलांस वांटून दिले. यावरून असें दिसतें कीं, एकाच मुलास राज्य मिळण्याऐवजीं राज्याचे वांटे होऊं लागले होते. आनवांची दुसरी शाखा तितिक्षूच्या आधिपत्याखालीं अनेक संकटें सोसून या प्रांतांतून जी निघाली ती थेट पूर्वेकडे गेली व कोसल, विदेह, वैशाली या राज्यांपलीकडे त्यांनीं आपलें पौरस्त्य राज्य स्थापन केलें. या आनवांच्या आक्रमणानें द्रुह्युवंशज आणखी वायव्येकडे गेले व गांधारापलीकडील म्लेच्छ देशांत जाऊन राहिले. तेथेंच यांचे संबंध होऊन म्लेच्छांची व यांची सळमिसळ झाली.

२०. हैहय लोक एकाच प्रांतीं स्थिर झाले नाहींत. काठेवाड ते काशीपर्यंत यांचे गण लूटमार करीत फिरत व लूट आणून भार्गवपुरोहितांजवळ ठेवीत. हे पुरोहितहि ही संपत्ति जपून ठेवीत आणि लागेल तेव्हां हैहयराजांस देत. दुर्दमानंतर तीनचार पिढ्या यांचा हा स्वाऱ्यांचा क्रम चालू राहिला. यांच्या हल्ल्यांपुढें साऱ्यांचा थरकांप होत असे. यांच्या स्वाऱ्यांची हकीगत वाचीत असतां मराठ्यांच्या स्वाऱ्यांची आठवण झाल्याशिवाय राहात नाहीं. टोळधाडीसारखी यांची धाड यावयाची व लूट करून निघून जावयाची. दुर्दमाच्या प्रपौत्राचें नांव कृतवीर्य. हाहि स्वाऱ्या करण्यांत भारी पटाईत होता. यानें खूप संपत्ति लुटून आणली व भार्गवपुरोहितांजवळ ठेविली. हेतु हा कीं, परत कोणीं आपल्यावर स्वारी केली तरी आपण आणलेली लूट लुटली जाऊं नये. कृतवीर्य मेला तेव्हां त्याचा मुलगा अर्जुन लहान होता. कृतवीर्याच्या भाऊबंदांनीं भार्गववर्गाजवळ धन मागितलें; पण त्या भाऊबंदांवर भरंवसा नसल्यानें भृगुपुरोहितांनीं द्रव्य देणें नाकारलें. सारे हैहय

क्रुद्ध झाले व भार्गववर्गास मारमारून पिटाळण्याचा व धन लुटून घेण्याचा त्यांनीं सपाटा चालविला.

२१. हैहयांच्या त्रासानें भार्गवपुरोहित पळूं लागले. अशा स्थितींतच एका भृगु पुरोहित पत्नीस विंध्यवनांत एक मुलगा झाला. प्रसूतिसमयीं धड वस्त्रहि जवळ नसल्यामुळें ती उर्वी म्हणजे जमिनीवरच प्रसूत झाली. म्हणून या मुलास और्व म्हणूं लागले. हा मुलगा एकदा एक लाकूड वांकवीत असतां याच्या हातांतून निसटून तें उडालें. याचें कारण शोधीत या बुद्धिवान् मुलानें धनुष्यविद्या शोधून काढली व वांकड्या लाकडास वांकवून तो दुसरें लाकूड वांकविणाऱ्या साधनाच्या साह्यानें दूर फेंकूं लागला. वांकडें लाकूड म्हणजे धनु, व दूर फेंकलें जाऊन दुसऱ्यास क्षत करणारा तो शर. और्वास या विद्येंत प्रावीण्य मिळालें व ही धनुर्विद्या त्यानें आपल्या ऋचीक नांवाच्या मुलास चांगल्या रीतीनें शिकविली. स्वतःच्या दुर्दशेस हैहय कारण असल्यामुळें हैहयांविषयीं द्वेष याचे मनांत होताच. या विद्येच्या साह्यानें त्यानें हैहयांवर सूड उगवावयाचा निश्चय केला व हवें तें करून हा विचार ऋचीकाचे मनांतहि दृढ केला. इकडे कार्तवीर्य अर्जुनहि मोठा झाला होता. याचाहि भार्गवावर रोष होताच. यानेंहि हैहयांची परंपराच चालू ठेविली, पण नर्मदातीरीं त्यांस स्थिर केलें. याच्या माऱ्यांनीं कान्यकुब्ज, काशी व कोसल देश जर्जर झाले होते. त्यामुळें वसिष्ठ पुरोहितहि कोसल देशांतून निघाले व हिमालयाच्या पायथ्याशीं आश्रम बांधून राहिले. कार्तवीर्य अर्जुन लूटमार करतांना भृगुपुरोहितांबरोबर सर्वच पुरोहितवर्गास लुटूं लागला. यांत यानें वसिष्ठांचेहि आश्रम उद्ध्वस्त केले. त्यामुळें वसिष्ठहि खवळले व भृगुपुरोहितांबरोबर हैहयनाश करण्याची मसलत करूं लागले.

२२. भृगु व वसिष्ठ वर्गाचे पुरोहितलोक जरी हैहयाविरुद्ध खटपटी करीत होते, तरी अत्रिवर्गानें या पुरोहिताचा पक्ष घेतला नाहीं. उलट हैहयांस त्यांची मदतच होत असे. यांतीलच एक अत्रि नर्मदातीरीं आश्रम करून होता. याच्या स्त्रीचें नांव अनसूया. नांवाप्रमाणेंच हिच्या मनांत कोणाचबद्दल वाईट विचार येत नसत. ही सर्वांचेंच मनःपूर्वक आदरातिथ्य करी. हिच्या आश्रमांत सर्वांस आश्रय मिळे. हैहयांनीं हिचा पाहुणचार अनेक वेळ घेतला होता. अनसूयेस तीन मुलगे झाले. यांतील वडील दत्त आत्रेय. हा

योगमार्गप्रवर्तक झाला. इंद्रियांचा जय कसा करावा याचा यानें कसून अभ्यास केला व त्यांत प्रावीण्य प्राप्त केलें. दुसरा मुलगा सोम. यानें भृगुब्राह्मणांच्या सोमयागपद्धतींत थोडी सुधारणा करून सोमयागपद्धति निश्चित केली. तिसरा दुर्वासादत्त जितका शांत तितकाच हा क्रोधी. रागाच्या भरांत याचें वस्त्रांकडेहि दुर्लक्ष्य असल्यानें यास दुर्वासा हें नांव पडलें. दत्ताची कार्तवीर्यार्जुनावर विशेष कृपा होती. हैहय तर दत्तास देवासारखेच मानीत व अर्जुनाचीहि दत्तावर मोठी भक्ति होती. यानें नर्मदातीरीं सोमाचे देखरेखीखालीं एक सोमयाग केला व त्याच सुमारास तेथें चढाई करून आलेल्या एका रावणास कैद करून कांहीं दिवस माहिष्मतींत डांबून ठेविलें. या अर्जुनाच्या हातचा प्रसाद हजारों लोकांस मिळाला असल्यामुळें यास सहस्रबाहु असेंहि नांव मिळालें होतें. शिबीनंतरचा चक्रवर्ती हाच. याचा काल वैवस्वतमनूच्या तिसाव्या पिढीचा किंवा सत्तर पिढ्या महाभारतापूर्वीचा.

२३. धनुर्विद्याप्रवर्तक और्वाचा ऋचीक मुलगा या विद्येंत पारंगत झाल्यावर विंध्यवन सोडून निघाला व कोसल देशांत जाऊन त्यानें ही विद्या तेथील राजांस शिकविली आणि त्यापासून हा अश्वविद्या शिकला. या अनरण्य पुत्रानें धनुर्विद्येंत आणखी सुधारणा केली. लाकडाऐवजीं यानें लोखंडी कांबीचें धनुष्य बनविलें व मग दोन विरुद्धवक्र तुकडे जोडून त्रिवक्र धनुष्य तयार केलें. यावरून यास त्रिधन्वन् असें नांव पडलें. कोसल देशांतून ऋचीक कान्यकुब्जांत गेला व तेथील कुशिक पुत्र कुशाश्व व त्याचा मुलगा गाधि या दोघांसहि त्यानें धनुर्विद्याप्रवीण केलें. नंतर ऋचीकानें गाधिकन्या सत्यवतीशीं लग्न करावयाचा विचार केला व आपला तसा मानस गाधीस कळविला. गाधीनें मुलीच्या बदल्यांत कांहीं धन मागितलें. या वेळीं भृगु व वसिष्ठ यांच्यांत हैहयद्वेषामुळें मैत्रीच होती. वसिष्ठाच्या रदबदलीनें आपल्या धनुर्विद्याशिक्षकास त्रिधन्व्यानें कांहीं घोडे दिले व ते कुशाश्वास देऊन ऋचीकानें सत्यवती मिळविली. पशु वा धन घेऊन मुलगी देण्याचें हें पहिलेंच उदाहरण. आर्ष विवाह पद्धति—कमींत कमी गोमिथुन तरी घेऊन मुलगी देण्याची पद्धति येथूनच सुरू झाली. ऋचीकास सत्यवतीपासून जो मुलगा झाला त्याचें नांव जमदग्नि.

२४. जमदग्नि धनुर्विद्या व अश्वविद्या दोहोंतहि निपुण होता. त्या वेळच्या

मराठा ग्रंथ संग्रहालय, दादर. स्वीकृत
क्रमांक ८५८५२ दिः ...निर्बंध...
क्रमांक ...२००३... दिः २०/३/०५

भार्गव व वसिष्ठ पुरोहितांत पूर्वजांची स्मृति जागृत ठेवण्यासाठीं श्रद्धापूर्वक दान पूर्वजांच्या नांवानें करण्याचा श्राद्धविधि यानें प्रस्तृत केला. हेतु उघड होता कीं, हैहयांकडून मारल्या गेलेल्या पूर्वजांचें स्मरण होऊन हैहयांविषयीं अप्रीति उत्पन्न व्हावी. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धांत अनेक इंग्रजांची कत्तल झाली होती. तत्कालीन शासकांनीं या साऱ्यांचीं नांवें शिलाखंडावर कोरून ज्या कानपूरच्या विहिरींत त्यांचीं प्रेतें टाकण्यांत आलीं होतीं तिच्या भिंतीवर ते दगड बसविले होते. भारतीय माणसास ही विहीर सहसा दाखवीत नसत, पण भारतांत आलेला कोणीहि इंग्रज कानपूरला गेला कीं, त्यास तेथें अवश्य नेत. उद्देश एवढाच कीं, आमच्याबद्दल इंग्रजांचे मनांत अप्रीति उत्पन्न व्हावी. ऋचीक व जमदग्नि यांनीं पुरोहितवर्गाची फार मोठी संघटना केली. सारे भृगु व वसिष्ठ संघटित झाले. राजेलोकांची मदत असावी म्हणून ऋचीकानें जसें कान्यकुब्ज कुलांतील सत्यवतीशीं लग्न केलें, त्याचप्रमाणें जमदग्नीनेंहि कोसल कुलांतील रेणुकेशीं लग्न करून कोसल देशाचीहि सहानुभूति मिळविली. या रेणुकेस जो मुलगा झाला त्याचें आनंद देणारा म्हणून नांव ठेविलें राम; पण हा खांद्यावर जी कुऱ्हाड लाकडें तोडावयास म्हणून नेई तिचाच उपयोग शस्त्रासारखा करूं लागल्यामुळें हा प्रसिद्ध झाला परशुराम या नांवानें.

२५. संघटनेचें सारें कार्य व्हावयाचें जमदग्नीच्या आश्रमांत. खांद्यावर कुऱ्हाड टाकून परशुराम चोहोंकडे हिंडावयाचा व परिस्थितीचें निरीक्षण करावयाचा. हैहयांविरुद्ध द्वेषाग्नि धुमसत ठेवावयाचें काम या दोघाहि पितापुत्रांनीं उत्तम रीतीनें केलें. कार्तवीर्य अर्जुनास ही बातमी समजली व एक दिवस तो जमदग्नीच्या आश्रमांत आला. जमदग्नि आश्रमांत नव्हता. भार्गवांबद्दलचा द्वेष याचेहि मनांत होताच. त्याच द्वेषमुळें त्वेष येऊन यानें रेणुकेचें धर्षण करण्याचा प्रयत्न केला व जमदग्नि येत आहे असें पाहून हा निघून गेला. जमदग्नीस ही गोष्ट कळतांच तो संतप्त झाला व परशुराम येतांच त्यास ही गोष्ट सांगून त्याकडून रेणुकेस ठार मारविलें. रेणुका मेली खरी, पण या अर्जुनाच्या अत्याचारानें सारेच पुरोहित चिडून उठले, व परशुरामाच्या नेतृत्वाखालीं या पुरोहितवर्गानीं निरनिराळ्या एकवीस ठिकाणीं हैहयांचा पराभव केला. हैहयांकडे धनुर्विद्या नसल्यानें जवळ आल्याशिवाय

शत्रूवर प्रहार करितां येणें अशक्य होतें, पण धनुर्विद्येमुळें शत्रु दूर असतांच प्रहार करितां येई. पुरोहितवर्गानें केलेलें हें प्रथमच महायुद्ध होतें. कोशल देशच्या व कान्यकुब्ज देशच्या राजांची थोडी मदत व धनुर्विद्या शिकलेल्या विंध्यवासी लोकांचेंहि थोडें साह्य होतें; पण खरा भाग यांत पुरोहितवर्गाचाच होता. या लढायांत फार लोक मारले गेले. पुराणेतिहासकालांतलें हें पहिलें महायुद्ध. दुसरें रामाच्या वेळचें व तिसरें कौरव-पांडवांचें. तिन्ही युद्धांस एक एक स्त्रीच मुख्यतः कारण झाली व म्हणूनच पुढच्या एका कवीनें असें म्हटलें कीं—

कृते तु रेणुकाकृत्या त्रेतायां जानकी तथा ।
द्वापारे द्रौपदी कृत्या कलौ कृत्या गृहे गृहे ॥

चौथ्या चरणांत विनोदाचा बराच भाग आहे, हें सांगावयास नकोच. या महायुद्धांत अर्जुनाचे लोकांकडून जमदग्नि व परशुरामाचे हातून कार्तवीर्यार्जुन मारला गेला. हैहयांचें भय एकदम नाहींसें झालें व परशुरामाची सत्ता फार वाढली.

२६. युद्धाच्या त्वेषांत मनुष्य कितीहि अत्याचार करो, तो स्वभावतः अहिंसक व शांतिप्रिय आहे. परशुरामाचीहि अशीच स्थिति झाली. एवढ्या जबरदस्त प्राणहानीमुळें त्यास उद्वेग प्राप्त झाला व त्यानें प्रायश्चित्तार्थ एक याग करावयाचें ठरविलें. पण पौरोहित्य कोणास द्यावयाचें? भृगु व वसिष्ठ वर्गाचे पुरोहित युद्ध करून स्वतःच दूषित झालेले. अत्रिवर्ग हैहयाचा सहाय्यक असल्यानें परशुरामाच्या दृष्टीनें अपात्र. अशा वेळीं इतिहासांत एक नवाच पुरोहितवर्ग आलेला आढळतो. हा हिमालयांतूनहि आलेला नव्हता व वायव्येकडूनहि आला नव्हता. हा थेट पश्चिमेकडून सिंधमध्यें येऊन आनर्तांत आला होता. याच्या मुख्याचें नांव कश्यप. हा पुढें आला व यानें पौरोहित्य कर्म करावयाचें स्वीकारलें. म्हणून परशुरामानें याच्याकरवीं याग करविला व जिंकलेला सारा प्रदेश कश्यपास समर्पण केला. पुरोहितवर्ग राज्य करीतच नसे. कश्यपानें तो सर्व प्रदेश पूर्वी ज्यांचा होता त्यांसच देऊन टाकला व या भांडणाचें मूळ ज्याच्या मनांत होतें व जें पुढें मागें फोंफावण्याची भीति होती तें मूळच दूर करण्यासाठीं परशुरामास सह्यपर्वताचे पश्चिमेस पाठवून दिलें. परशुराम सह्य व समुद्राचे

मधल्या भागांत जाऊन राहिला. हा सारा भाग आजहि परशुरामक्षेत्र या नांवानेंच प्रसिद्ध आहे.

२७. परशुरामाचा काल वैवस्वतमनूनंतर तीस पिढ्यांनीं पुढें. महाभारताचें युद्ध यानंतर सत्तर पिढ्यांचा काल गेल्यावर झालें. पुरूपासून परशुरामापर्यंतच्या या पंचवीस पिढ्यांचे इतिहासांत पुरोहितांचे प्रयत्नच ठळकपणें दिसत असल्यामुळें 'प्राधान्येन व्यपदेशा भवन्ति' या न्यायानें या दुसऱ्या सर्गास पुरोहितवर्गाचे प्रयत्न असें नांव दिलें आहे.

☆ ☆ ☆

सर्ग तिसरा

मंत्ररचनेचा आरंभ

१. गेल्या सर्गाचे शेवटीं आपण पाहिलें कीं, जामदग्न्य परशुरामानें पुरोहितवर्गाची संघटना करून कार्तवीर्य अर्जुनाचा व तत्पक्षीय राजांचा निरनिराळ्या एकवीस ठिकाणीं पराभव केला. पुढें एवढ्या मोठ्या हिंसेनें अनुतप्त होऊन नवीनच आलेल्या कश्यप पुरोहिताकडून एक याग करवून आपण मिळविलेलें सर्वस्व त्यास अर्पण केलें. कश्यपानेंहि पुन्हा पूर्वीच्याच वंशांतील लोकांस सत्ता समर्पण केली व भांडणाचें बीज समूळ उपटून काढण्यासाठीं परशुरामास सह्यापलीकडे पाठवून दिलें. ही गोष्ट घडली तेव्हां इक्ष्वाकूपासून तीस पिढ्या लोटल्या होत्या. आतां पुढील इतिहासाकडे दृष्टिक्षेप करूं.

२. या वेळीं यमुना नदीच्या पूर्व भागीं कोसल, विदेह, वैशाली व त्यापलीकडे आनवांचें पौरस्त्य राज्य अशीं चार राज्यें होतीं. यमुनेच्या दक्षिणेस व पश्चिमेस हैहय व यादव यांची सत्ता चालत होती व गंगायमुनेच्या अंतरीप देशांत कान्यकुब्ज राजे राज्य करीत होते. या तीस पिढ्यांचे कालांत पुरोहितांचे मात्र चारच वर्ग होते—वसिष्ठ, भृगु, अत्रि व कश्यप. आजहि शेवटल्या तीन गोत्रांतले म्हणविणाऱ्यांत कांहीं विशेष गोष्टी आढळून येतात. कोणाहि ब्राह्मण म्हणविणारास आपलें गोत्र माहीत नसलें तर 'गोत्रस्य त्वपरिज्ञाने काश्यपं गोत्रमुच्यते' या नियमाप्रमाणें तो काश्यप गोत्राचा समजला जातो. यावरून असें म्हणतां येईल कीं, कुठल्याहि पुरोहितास या वर्गांत दाखल होतां येत असे. अत्रि गोत्रांत समजणाऱ्या आजच्या ब्राह्मणासहि आपलें गोत्र सोडून इतर

कुठल्याहि गोत्रांतल्या मुलीशीं विवाह करितां येतो. 'अत्रि व सर्वांशीं मैत्री' ही म्हण विवाह जुळविणाऱ्यांत प्रसिद्धच आहे. भृगुवर्ग पुढें अंगिरस् पुरोहिताच्या माहात्म्यामुळें भृग्वंगिरस् म्हणविला जाऊं लागला. या गोत्रांतल्या यजमानास अग्न्याधानाचे वेळीं 'भृगूणां त्वांगिरसां व्रतपते व्रतमादधामि' असें म्हणावें लागतें. इतरांस त्याच प्रसंगीं 'आदित्यानां त्वां व्रतपते' असें म्हटलें असतां चालतें. याशिवाय या गोत्रांतल्या म्हणविणाऱ्या ब्राह्मणलोकांस विवाहाचे वेळीं एक समान प्रवर ऋषि आड येत नाहीं. सप्रवर विवाहाच्या दोषासाठीं दोन प्रवरऋषि तेच असावे लागतात. ब्राह्मण म्हणविणाऱ्यांत ही परंपरा अजूनपावेतों रूढ आहे. असो.

३. परशुराम गेल्यानंतरचा कांहीं काळ शांततेंत गेला. पुरोहितांच्या पराक्रमानें व विशेषतः त्यांच्या त्यागवृत्तीनें या वर्गाबद्दल सर्वत्र आदर असे. या शांततेच्या काळांत यांची आश्रमसंख्या वाढली व त्यांत ज्ञानप्राप्ति व ज्ञानदान हीं कर्मे चालूं लागलीं. कृषि, पशुपालन, रोगनिवारण या कामांनींहि हे पुरोहित लोकप्रिय झाले. याशिवाय लोकांचीं मानसिक दुःखें दूर करण्यासाठीं प्रार्थना, उपासना व यज्ञयागादि कर्महि हेच करीत. पण या प्रसंगीं हे काय म्हणत असत याची माहिती मात्र बिलकुल उपलब्ध नाहीं. गद्य भाषेंत देवांचीं नांवें घेऊन प्रार्थना करीत असतील किंवा आहुति देत असतील असें वाटतें. कारण आज जे छंदोबद्ध मंत्र या कर्मांचे वेळीं म्हटले जातात ते त्या वेळीं नव्हते, नव्हे छंदोबद्ध मंत्ररचनेस तेव्हां आरंभहि झाला नव्हता, हें पुढें स्पष्ट केलें जाणारच आहे. राजे लोक जें द्रव्य यांस देत तें जपून ठेवणें व राष्ट्रसंकटाचे वेळीं तें उपयोगांत आणणें यांजकडेच असे. राजे लोक अन्याय करूं लागले तर हे राजाश्रित नसल्यानें स्पष्टपणें त्यांची कानउघाडणी करण्याचें कामहि सडेतोडपणें हेच करूं शकत. सारांश, राजा व प्रजा यांस जोडणाऱ्या दुव्याचें काम हा वर्ग करीत असे.

४. या कालांत हा वर्ग अत्यंत सुसंघटित होता. पण ध्यानांत ठेवण्यासारखी ही गोष्ट आहे कीं, यांची एखादी 'जाति' नव्हती, म्हणजे पुरोहिताचा मुलगा म्हणून तो पुरोहित होत नसे. शरीरबल किंवा बुद्धिबल हें साधारणपणें प्रत्येक व्यक्तींत असतेंच, पण पुढें प्रत्येक मनुष्य आपलें कर्तव्य आपल्या रुचीप्रमाणें ठरवी. ज्ञानप्राप्ति हें ध्येय पुढें ठेवून त्यासाठीं कष्टमय

जीवन जगण्यास जे तयार होत ते पुरोहित होत. हें जीवन सुखाचें नसल्यानें थोडेच लोक हें स्वीकारीत. आपल्या बाहुबलाचा उपयोग करूं पाहणारे सैनिक होत. यांस आपल्या पराक्रमानें राजा होण्याचा मार्ग मोकळा असे. पण तरीहि नेहमीं हातावर शिर घेऊन राहावें लागत असल्यामुळें ही संख्याहि मर्यादितच असे. पण पुरोहितांपेक्षां ती अधिक असे. दोन्हीं प्रकारचीं कामें न करितां सामान्यपणें जीवन घालवूं इच्छिणारे सामान्य प्रजाजन म्हणून राहात. कुठल्या तरी देशांत शिरून राहिल्यामुळें यांस 'विश्' असें म्हणत. कुठल्याहि वर्गांत राहिले तरी रोटी व्यवहार व बेटीव्यवहार यास मनाई नसे. पुरोहित किंवा सैनिक झाल्यावरहि एखाद्यास आपला जीवनक्रम बदलावासा वाटला तरी बदलतां येत असे. पण सैनिक वर्गांत राहणाऱ्यांचें चित्त लवकर प्रक्षुब्ध होई. युद्धानंतर सुखांत राहिल्यामुळें मन स्वार्थप्रवण होई. हा स्वभाव बदलणें कठीण असल्यामुळें सैनिक झालेला बहुधा पुरोहितवर्गांत येऊं इच्छित नसे. शिवाय पुरोहितवर्गास विद्यार्जन करावें लागे. कष्ट सहन करण्यास व त्याग करण्यास तयार राहावें लागे आणि स्वार्थापेक्षां परार्थाची लोक-कल्याणाची चिंता वाहावी लागे. हैहयांच्या वेळीं यांस कसे त्रास सहन करावे लागले, या स्थानाहून त्या स्थानीं कसें पळत फिरावें लागलें हें आपण पाहिलेंच. पराक्रम करून युद्धें जिंकलीं तरी लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, यापैकीं कोणीहि राज्यपद स्वीकारलें नाहीं. या साऱ्या गोष्टींमुळें पुरोहितवर्गाची व सैनिकवर्गाची किंवा राजांची जेव्हां जेव्हां तुलना होई तेव्हां तेव्हां मान मात्र पुरोहितांसच दिला जाई. सैनिकांपैकीं एखाद्यास पुरोहितवर्गांत शिरण्याची इच्छा झाली तरी ती पुरी करणें कठीण होतें. पण याच काळीं हा प्रयोग यशस्वीपणें करून एक व्यक्ति निर्माण झाली व तिनें आपल्या जीवनानें समाज-रचनेंत फार मोठा बदल करून टाकला. ही व्यक्ति म्हणजे विश्वामित्र.

५. सत्तर पिढ्या महाभारतापूर्वी हा विश्वामित्र झाला. परशुरामाची आजी ही गाधीची मुलगी हें आपणांस माहीत आहे. या गाधीचाच मुलगा विश्वामित्र. गाधीच्याच वेळीं कोसल देशांत त्रय्यारुण नांवाचा राजा राज्य करीत होता. यास एक मुलगा झाला. बापानें मोठ्या आवडीनें मुलाचें नांव ठेवलें सत्यव्रत. पण मुलगा असा निघाला कीं, त्यानें आपलें नांव अन्वर्थक न करितां अनर्थक केलें. लोकांस छळण्याचा व बापाचें न

ऐकण्याचें तर यानें जणू कांहीं व्रतच घेतलें होतें. हैहयनाशानंतर, ज्या वसिष्ठाचा आश्रम कृतवीर्यपुत्र अर्जुनानें जाळला होता तो आपवनांवाचा वसिष्ठ, परत कोसल देशांत येऊन राहूं लागला. याच्या मुलाचें नांव देवराज वसिष्ठ. जेव्हां सत्यव्रतानें प्रजाजनांतल्या एका स्त्रीचें धर्षण केलें तेव्हां देवराजानें सत्यव्रतास नगराबाहेर घालवून देण्याचा सल्ला त्र्यारुणास दिला. त्र्यारुणानें देवराज वसिष्ठाच्या सांगण्याप्रमाणें सत्यव्रतास राज्याबाहेर घालवून दिलें. सत्यव्रत कोसल राज्याच्या बाहेर पण कान्यकुब्ज राज्याच्या सीमेवर पारध करून जीवन व्यतीत करूं लागला.

६. गाधिपुत्र कान्यकुब्जराज विश्वामित्राचें बापानें ठेवलेलें नांव विश्वरथ. याच्या मनांत आपला राजवर्ग सोडून पुरोहितवर्गांत शिरण्याची तीव्र इच्छा उत्पन्न झाली. कारण अगदीं क्षुल्लक होतें, पण त्याचा परिणाम मात्र फार मोठा झाला. एकदा विश्वरथ मृगया करीत कोसल देशांत शिरला व यास देवराज वसिष्ठाच्या आश्रमांत पाहुणचार घेण्याचा प्रसंग आला. पुरोहितांच्या साध्या राहणींतहि वसिष्ठाच्या गोधनामुळें राजवैभवांतहि अप्राप्य अशा कांहीं गोष्टी त्यास अनायासें प्राप्त झाल्यामुळें विश्वरथाच्या मनांत राज्य सोडून पुरोहित होण्याची इच्छा झाली ती इच्छा इतकी प्रबल होती कीं, घरीं येतांच त्यानें राज्यत्यागाचा निश्चय केला व बायकामुलांस सोडून तो वनांत तपस्या करण्यास म्हणजे कष्ट होतील या प्रकारें राहण्यास निघून गेला. थोड्याच दिवसांत देशांत भयंकर दुष्काळ पडला. पुराणेतिहासांत उल्लिखित असा हा पहिलाच दुष्काळ. लागोपाठ कांहीं वर्षें पाऊस मुळींच पडला नाहीं. मोठ-मोठ्यांस आपला निर्वाह करणें कठीण पडूं लागलें. या दुष्काळामुळेंच दोन वाईट प्रथा कांहीं कालपर्यंत या देशांत रूढ झाल्या, त्या म्हणजे नरविक्रय व नरबलि. पोष्यवर्गाचें पोट भरणें पालकास कठीण झालें म्हणजेच तो पोष्यास विकावयास किंवा रुष्ट देवतेस संतुष्ट करण्यासाठीं त्याचा बलि देण्यास तयार होतो. दुष्काळामुळें विश्वरथाच्या स्त्रीस आपलें व आपल्या गालव नांवाच्या लहानग्याचें पोट भरणें कठीण पडूं लागलें व ती मुलास विकावयास निघाली. सत्यव्रतास दया आली व त्यानें त्या मातापुत्रांचा चरितार्थ चालविण्याची जबाबदारी पत्करून तीस त्या पुत्रविक्रयाच्या कर्मापासून पराबृत्त केलें. हा पारध करी व त्या मांसावर तिघांचेंहि पोट भरी. अशाच एका प्रसंगीं यानें वसिष्ठाची एक

गाय मारली व त्या मांसावर आपलें व विश्वरथाच्या स्त्रीपुत्राचें क्षुधाशमन केलें. याच दुष्काळांत विश्वरथासहि एका श्वपचाच्या घरून कुत्र्याची तंगडी चोरून न्यावी लागली होती व त्यानें हटकल्यावर यानें त्यास, 'ओरड, बेडूक डरांव डरांव करूं लागले तरी बैल पाणी पिणें सोडीत नाहीं' अशा अर्थाचें 'पिबन्त्येवोदकं गावो मण्डूकेषु रुवत्स्वपि' असें उत्तर दिलें होतें. पौराणिक वाङ्मयांत हें उत्तर प्रसिद्ध आहे.

७. दुष्काळ संपला. विश्वरथ तपस्या करून परत आला व कान्यकुब्ज देशांत असणाऱ्या पुरोहितवर्गांत राहूं लागला. सत्यव्रतानें आपल्या स्त्रीपुत्राचें दुष्काळांत पालन केलें ही गोष्ट विश्वरथास समजली. सत्यव्रताविषयीं त्याच्या मनांत कृतज्ञताबुद्धि उपजली, पण परत प्रत्युपकार कसा करावा हें उमगेना. शेवटीं त्यानें देवराजाकडे जाऊन सत्यव्रताची शिफारस करून त्यास राज्यप्राप्ति करवून देण्याचें ठरविलें व देवराज वसिष्ठाजवळ तशी रदबदली केली. वसिष्ठ सत्यव्रतास त्रिशंकु म्हणूं लागला होता: कारण पित्राज्ञेचा अवमान, परस्त्रीचें धर्षण व गोमांसभक्षण अशीं शंकूसारखीं सलणारीं तीन कुकर्में याच्या हातून घडलीं होतीं. त्यामुळें वसिष्ठ प्रथम विश्वरथाचें म्हणणें मान्य करीना. पण विश्वरथाचा फारच आग्रह पाहून त्यानें कोसल देशाच्या प्रजेस समजावून सत्यव्रत त्रिशंकूस कोसल देशाचें राज्यपद दिलें.

८. इतकें सारें झालें तरी सत्यव्रत त्रिशंकूच्या मनांत देवराज वसिष्ठाविषयीं सद्भावना निर्माण झाली नाहीं. या जोडीपैकीं तो विश्वरथासच अधिक मान देई, आणि तें साहजिक नव्हतें असें कोण म्हणेल? एकानें त्यास राज्यावरून दूर केलें होतें व दुसऱ्यानें त्यास तें मिळवून दिलें होतें. यामुळें त्याचा ओढा विश्वरथाकडे साहजिकपणेंच अधिक होता. एकदा त्रिशंकूनें एक याग करावयाचें ठरविलें व त्याविषयीं विचारण्यास तो वसिष्ठाकडे गेला. वसिष्ठानें 'नाहीं' सांगितलें तेव्हां विश्वामित्राकडे गेला. त्यानें पुन्हा त्यास वसिष्ठाकडे पाठविलें. दोघांमध्यें कांहीं दिवस तो असाच लोंबकळत राहिला. शेवटीं विश्वामित्रास त्यानें मुख्य पुरोहिताचें काम द्यावयाचें ठरविलें. वसिष्ठास बाजूस सारून आपलें पुरोहितत्व सिद्ध करण्याची सुसंधि उपयोगांत आणण्याचें विश्वरथानें ठरविलें. यागाची तयारी सुरू झाली. पण मुख्य पौरोहित्य कान्यकुब्जांतील विश्वरथास मिळालेलें पाहून कोसलांतला वसिष्ठवर्ग

संतापला व सर्व समाजापुढें मुख्य पौरोहित्याची आपली पात्रता सिद्ध करण्यास विश्वरथास आव्हान दिलें. विश्वरथ थोडी तपस्या करून नुकताच पुरोहित झालेला. एखादी विद्या किंवा कलाहि त्यानें शोधून काढिली नव्हती. लोकहिताचीं मोठालीं कामेंहि केलीं नव्हतीं, मोठासा त्यागहि केला नव्हता. त्यामुळें मुख्य पौरोहित्याची पात्रता त्यास सिद्ध करतां आली नाहीं व लाजेनें खालींच मान घालावी लागली. दुःखतप्त होऊन विश्वरथानें स्त्री-पुत्रासह मध्यदेशाचा त्याग केला व पश्चिमेकडे पारियात्र पर्वतावरील अर्बुद शिखराजवळच्या पुष्करक्षेत्रीं निघून गेला व पुन्हा तपःसाधना करूं लागला.

९. विश्वरथाच्या मनांत एकसारखा एकच विचार वावरत होता. काय केल्यानें पौरोहित्य सिद्ध करितां येईल? हे पुरोहित तरी काय करतात? बुद्धिच चालवितात ना? पण या बुद्धीचा तरी प्रेरक कोण? जो त्यांच्या बुद्धीस प्रेरणा देतो त्याचीच उपासना, त्याचेंच ध्यान आम्ही तरी करितों ना? दिवसरात्र हाच विचार, हेंच चिंतन. असें चाललें असतां एक दिवस काय चमत्कार घडला तो पाहा. सकाळची सूर्योदयाची वेळ. पुष्कर सरोवरांत स्नान करून विश्वरथ पूर्वाभिमुख होऊन परमेश्वराचें ध्यान करीत व वरील विचार घोळीत बसला होता. इतक्यांत तोच विचार पुढील शब्दांचें रूप घेऊन त्याचे मुखांतून बाहेर पडला :—

" तत्सवितुर्वरेणियं,
भर्गो देवस्य धीमहि,
धियो यो नः प्रचोदयात् "

शब्द रूपानें हे विचार बाहेर पडत असतां विश्वरथास असें आढळून आलें कीं, हें वाक्य आपण नेहमीं बोलतों त्याहून निराळ्या प्रकारचें आहे. गद्याचा क्रम यांत बदलला आहे व आठ आठ अक्षरांचे याचे तीन समान भाग झाले आहेत. अक्षरसंख्येनें बद्ध असें हें वाक्य स्फुरल्यामुळें विश्वरथास एक नवी दृष्टि प्राप्त झाली व हा आदर्श पुढें ठेवून अशा प्रकारची अक्षर-बद्ध रचना तो करूं लागला. हेंच गाणें गाणाऱ्याचा उद्धार करणारी म्हणून ही रचना 'गायत्री' नांवानें प्रसिद्ध झाली व विश्वरथ अशी आणखी रचना करूं लागला. 'मा निषाद' इत्यादि श्लोकानें जसा पुढें वाल्मीकि मुश्लोक झाला तसाच या सांख्यायन सगोत्रा म्हणजे अक्षरसंख्येनें बद्ध

असलेल्या जातीच्या रचनेनें विश्वरथ प्रसिद्धि पावला. जो विश्वरथ कोसल समेंतून निघतांना 'विश्व अमित्र' सारे शत्रु असें समजूं लागला होता त्यास ही नवी दृष्टि लाभल्यानें त्याचा न्यूनग्रंथि दूर झाला व विश्वा म्हणजे चोहोंकडे त्यास मित्रच मित्र दिसूं लागल्यामुळें त्याचें रथ हें राजवाचक नांव सुटून तो विश्वामित्र म्हणूनच प्रसिद्ध झाला. तो स्वतःच अशी रचना करून राहिला नाहीं तर तो उघड असें सांगूं लागला कीं

युवा सुवासाः परिवीत आगात्
स उश्रेयान् भवति जायमानः ।
तं धीरासः कवय उन्नयंति
स्वाध्यो मनसा देवयंतः ।

'जो तरुण चांगलीं वस्त्रें धारण करून येईल तो नवाच जन्मास येऊन अधिक चांगला होईल. एकसारखा विचार करणारे व मनानें ईश्वरास शरण गेलेले बुद्धिवान् शहाणे लोक त्यास उन्नत करतील. याप्रमाणें जाहीर करून जे तरुण विश्वामित्राकडे येत त्यास तो गायत्रीची दीक्षा देई व तसे छंद रचण्यास शिकवी. याप्रमाणें त्यानें आपला एक विश्वामित्रवर्ग नवाच निर्माण केला. या वर्गास ब्रह्म म्हणजे मंत्र रचण्याची विद्या येणारे म्हणून ब्राह्मण म्हणूं लागला. इतकें केल्यावर विश्वामित्रानें देवराज वसिष्ठाकडे जाऊन ही मंत्र-रचना त्यास दाखविली. ही काव्यकला अशीच होती कीं, तिचें महत्त्व सर्वांसच पटलें. वसिष्ठ, भृगु, अत्रि व कश्यप या सर्वच पुरोहितांनीं विश्वामित्राचा सन्मान केला व त्यानें सुचविलेला दीक्षाविधि मान्य करून या विधीनें नवा ब्राह्मणजन्म घेण्यास व ही विद्या शिकण्यास संमति दिली. ब्राह्मण होण्यासाठीं गायत्री मंत्राची दीक्षा आवश्यक झाली. त्या वेळेपर्यंत पुरोहित कोण हें ठरविण्यासाठीं कांहीं निश्चित लक्षण नव्हतें. आतां हा दीक्षाविधि निघाल्या-नंतर तें लक्षण निश्चित झालें व गायत्री मंत्राच्या उपदेशाशिवाय ब्राह्मण होणें अशक्य झालें. हें मंत्रात्मक काव्य करील तोच ब्राह्मण, ही कल्पना रूढ झाली. पुढारी होते ते कवि झाले.

१०. यानंतरचीं कांहीं वर्षें शांततेंत गेलीं. नवीन नवीन गोष्टी शांततेच्या काळांतच निर्माण होतात. याच काळांत यादवांच्या देशांत लोकरी वस्त्रें विणण्याची कला निघाली व तिला ज्या राजानें उत्तेजन दिलें तो लोकरी

आसनांवर बसणारा म्हणून कंबलबर्ही या नांवानें प्रसिद्ध झाला. वैशाली राज्यांत डोंगरी भाग अधिक असल्यानें गुहा निर्माण करण्याची कला निघाली. खनित्र व खनीनेत्र हीं नांवें याचींच द्योतक आहेत. धातूंचा उपयोगहि अधिक होऊं लागला. शस्त्राच्या प्रहारांपासून वांचविण्यासाठीं धातूंचीं चिलखतें तयार होऊं लागलीं. एका राजानें सोन्याचें कवच केल्यानें त्याचें नांव रुक्मकवच असें पडलें ही गोष्टहि यादवराज्यांतच घडली. मंत्ररचना तर या कालांत खूपच झाली. गायत्री छंदावरून निरनिराळ्या अक्षरसंख्येनें बद्ध असे नवे नवे छंद निर्माण झाले व निरनिराळ्या देवतांचीं स्तोत्रें निर्माण झालीं. या सूक्तरचनेपूर्वी यज्ञांत एकच ऋत्विज अध्वर्यु म्हणून असे व तो गद्य भाषेंतच देवांस हविर्भाग समर्पण करी. आतां देवांचीं स्तोत्रें निर्माण झाल्यावर होता नांवाचा एक आणखी ऋत्विज निर्माण झाला. ज्या देवतेस हविर्भाग द्यावयाचा त्याचें सूक्त होत्यानें म्हणून त्या देवतेचें आवाहन करावयाचें व नंतर ती देवता आली असें समजून अध्वर्यूनें हविर्भागाची आहुति अग्नींत टाकावयाची अशी प्रथा सुरू झाली. लोकरी वस्त्राचा सोमरस गाळण्यास्तव याच वेळेपासून उपयोग होऊं लागला व दोन ऋत्विजांनीं युक्त असा एक विशिष्ट सोमयागविधि निर्माण झाला. सत्यव्रत त्रिशंकूनें असा एक सोमयाग केला व त्यांत वसिष्ठानें अध्वर्यूचें व विश्वामित्रानें होत्याचें काम केलें. याप्रमाणें वसिष्ठ, विश्वामित्र व त्रिशंकु तिघांचीहि दिलजमाई झाली व सारें सुरळीत चालूं लागलें.

११. त्रिशंकूचा मुलगा हरिश्चंद्र. नामधारी सत्यव्रताचा हा मुलगा मात्र खरोखरच सत्यव्रत होता. याच्या सत्यव्रताची विश्वामित्रानें कसून परीक्षा घेतली, पण तिच्यांत हा पूर्णपणें उत्तीर्ण झाला. मागें दुष्काळाचे समयीं रूढ झालेल्या नरविक्रय व नरबलि या दोन्ही प्रथा याच्या वेळेपावेतों चांगल्याच रूढ झाल्या होत्या. हरिश्चंद्रास पुष्कळ दिवस मुलगा झाला नाहीं. यासाठीं यानें वरुणदेवतेस असा नवस केला कीं, मुलगा झाला तर त्याचा बलि वरुणास द्यावयाचा. पुढें यास मुलगा झाला. त्याचें नांव रोहित. बरींच वर्षें कांहींना कांहीं सबबीवर यानें मुलाचा बलि देण्याचें टाळलें. पण पुढें जलोदर झाल्यावर हा नरबलीचा यज्ञ करण्याचें त्यानें

ठरविलें. रोहितास ही बातमी समजतांच तो पळून गेला. राजपुत्रापेक्षां ब्राह्मणपुत्र चांगला या समजुतीनें अजीगर्त नांवाच्या भृगुवर्गांतल्या एका ब्राह्मणाच्या शुनःशेप नांवाच्या मधल्या मुलास त्यानें विकत घेतलें. शुनःशेप अत्यंत बुद्धिवान् व शीघ्रकवि होता. बलि देण्याच्या खुंट्यास पशूसारखा यास बांधला असतां यानें मुक्ततेसाठीं ऋत्विजांची प्रार्थना केली. देवांस तुझा बलि द्यावयाचा आहे, सबब देवांची प्रार्थना कर असें म्हटल्यावर यानें निरनिराळ्या देवांचीं इतकीं सुंदर सूक्तें केलीं कीं, ऋत्विजांनीं या सूक्तांवर मुग्ध होऊन यास मुक्त केलें. शुनःशेप स्वतः तर मुक्त झालाच, पण त्याचे बरोबरच नरमेधहि समाप्त झाला. सुटकेनंतर त्यानें वडिलांकडे जाण्याचें नाकारलें. विश्वामित्रानें त्याचा स्वीकार केला व आपल्या वर्गांत यास प्रमुख करावयाचें ठरविलें. पण कांहींनीं या गोष्टीस विरोध दर्शविला. विश्वामित्र आपणांस कौशिक म्हणवीत असे. शुनःशेपाचें वाईट नांव बदलून विश्वामित्रानें त्यास देवरात-देवांनीं दिलेला—म्हटलें आणि देवरात व त्यास मान्यता देणारे कौशिक-वर्गांतले म्हणविले गेले. विरोध करणारे सारे विश्वामित्रवर्गांतले म्हटले जाऊं लागले. विश्वामित्रवर्गाचे याप्रमाणें प्रथम दोन व नंतर पुष्कळ वर्ग झाले. या काळीं खूप मंत्ररचना झाली. हा शांततेचा काळ सुमारें तीन पिढ्या टिकला.

१२. पुन्हा मनु पालटला. हैहय लोक पुन्हा प्रबल झाले. लांबवर स्वाऱ्या करूं लागल्यामुळें हे आपणांस आतां तालजंघ म्हणवीत. आनर्तापासून यमुने-पावेतों यांनीं आपले पांच गट करून लहान लहान राज्यें स्थापिलीं. एक गण आनर्तांत पोंचला. भार्गव च्यवनाचा आश्रम त्या देशांत होता. एकदा तेथल्या शर्याति राजाच्या कन्येनें या ऋषीची थट्टा केली. च्यवन संतापला व शर्यातिकुलाचा नाश करण्याचा प्रयत्न करूं लागला. त्यानें आपसांत भांडणें उत्पन्न केलीं. च्यवनाचा कोप शांत करण्यासाठीं त्या सुकन्येनें या वृद्धास वरलें. च्यवनानें कांहीं औषधींचें सेवन करून शक्ति प्राप्त केली. च्यवनास एक मुलगी झाली, जिचें नैध्रव काश्यपाशीं लग्न झालें. आनर्तांत आलेल्या गणानें शार्यातांचा नाश केला व तो स्वतःच आपणांस त्या नांवानें म्हणवूं लागला. तालजंघ हैहयांचा दुसरा गण वीतिहोत्र. हा माहिष्मतीच्या आसपास ठाणें देऊन होता. तिसरा आवंत. यांनीं अवंतीची स्थापना केली व

माहिष्मतीच्या ओंकारेश्वरासारखें महाकाल हें शंकराचें स्थान स्थापिलें. या दोन्ही ज्योतिर्लिंगांचा परस्पर संबंध अजूनहि आहे. एकाचें दर्शन घेतल्याशिवाय दुसऱ्याचें दर्शन सफल समजलें जात नाहीं. भोज नांवाचा गण चौथा. हा वेत्रवतीच्या कांठाकांठानें वसला होता. पांचव्याचें नांव तुंडिकेर. हा थेट यमुनेपर्यंत पसरला होता. याप्रमाणें जम बसल्यावर यांनीं पुन्हा पूर्वेच्या राज्यावर हल्ले करण्यास प्रारंभ केला. पहिल्याच सपाट्यांत काशीचा हर्यश्व यांनीं ठार केला. अयोध्येच्या राजाचा पराभव केला व विदेह राजास पळवून लाविलें. ही आक्रमक लाट आणखीहि पुढें वाढली असती, पण वैशालीच्या करंधम राजानें ही थोपवून धरली व तालजंघ परत फिरले.

१३. मागें आपण पाहिलेंच आहे कीं, राजा शिबीच्या वेळीं आनवांच्या माऱ्यामुळें द्रुह्यवंशज गांधाराकडे पळून गेले व येथील म्लेच्छ-यवनादि लोकांतच मिसळले. आतां हैहय स्वाऱ्यांची खबर लागतांच त्या म्लेच्छादि लोकांच्या साहाय्यानें या अर्धम्लेच्छ द्रुह्युवंशजांनींहि परत या देशांत प्रवेश केला व आनवांचें राज्य हिसकून घेतलें. यांच्या भीतीनें यादव जे पळाले ते थेट नर्मदा व तापी उतरले आणि तापीच्या दक्षिणेस जो दर्भमय देश होता तो विदर्भ करून वसविला व तेथें राज्य करूं लागले. हैहयांची व म्लेच्छयुक्त द्रुह्यूंची जी दुसरी स्वारी झाली तिच्यांत काशिराज हर्यश्वाचा मुलगा सुदेवहि मारला गेला. कोसल देशचा बाहु नांवाचा राजा राज्य सोडून पळाला व काशी आणि कोशल देश या अर्धम्लेच्छांच्या ताब्यांत गेले. कोशल देशांतला कोश लुटला गेला. ज्या करंधमानें पूर्वी हैहयांस परतविलें होतें त्याचा अविक्षित् नांवाचा मुलगा हैहयांच्या तावडींत सांपडला. पण अविक्षित्पित्यानें अविक्षित् + पित्यानें पुन्हा हैहयांचा पराभव करून अविक्षित्ला सोडवून आणलें. त्यानंतर हे आक्रमक लोक वैशालीच्या वाटेस न जातां वैशालीच्या पश्चिमेस धुमाकूळ घालूं लागले.

१४. या कालीं या देशांत शांतता होती. फक्त वैशाली राज्यांत जो अविक्षित् 'आदौ बद्धः पुनर्मुक्तः' झाला होता त्याचा पुत्र मरुत्त फार पराक्रमी निघाला. यानें हैहयांचे हल्ले तर परतविलेच, पण वैशालीच्या ईशान्य दिशेस देवजातींतील मरुत् लोकांचें राज्य होतें तेंहि जिंकलें. तेथील

मरुत् लोकांस आपल्या घरीं पाकगृहांत सेवक म्हणून ठेविलें व त्यांच्या साऱ्या देवांस म्हणजे मुख्यांस आपले मांडलिक केलें. नोकर ठेवण्याइतकी पाकशास्त्राची उन्नति प्रथम पुराणेतिहासांत येथेंच उल्लिखित आहे. या मरुत्ताच्या कीर्तीची गाथा मंत्ररचना करणारांनीं गाऊन ठेविली आहे. आजहि ती, ब्राह्मण मंत्रपुष्पाच्या वेळीं जीं वाक्यें म्हणतात त्यांत गोंविलेली आहे. ती पुढीलप्रमाणें–

'तदप्येष श्लोको भवति–
मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन् गृहे।
आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासदः ॥ इति.'

'या बाबतींत असाहि श्लोक प्रसिद्ध आहे कीं अविक्षित्पुत्र मरुत्ताच्या घरीं मरुत् लोक वाढप्याचें काम करून राहात व त्या मनोरथ पूर्ण करणाऱ्याचे येथें सारे देव सभेत वसणारे असत.' या पराक्रमी मरुत्तानें द्रह्यूंसहि पळवून लाविलें व वैशालींत जसे यज्ञ केले तसा एक यज्ञ यमुनातीरींहि केला.

१५. करंधम, अविक्षित् व मरुत्त या तीन राजांचे वेळीं वैशालींत यज्ञसंस्थेची चांगलीच वाढ झाली. देवांच्या स्तोत्रसूक्तांशिवाय इतर मंत्रहि याच वेळीं बरेच रचिले गेले. करंधमाच्या पुरोहिताचें नांव अथर्वन्. हा आपणांस देवपुरोहित आंगिरसच्या वर्गातला म्हणवी. यज्ञासाठीं काष्ठमंथन करून जो अग्नि काढवयाचा असे त्या वेळीं म्हणावयाचे मंत्र अथर्व्यानें रचिले. याशिवाय यज्ञाखेरीज जीं अनेक कर्में होत असत त्यासाठींहि यानें बरेच मंत्र रचिले. अथर्ववेदाचा आरंभ हाच. यांत अनेक कष्टनिवारणाचे किंवा अभिचारकर्माचे मंत्र आहेत. या अथर्वन्चा मुलगा उशिज्. हा अविक्षित्चा पुरोहित होता. उशिज्ला तीन मुलें झालीं – उचथ्य, बृहस्पति व संवर्त. उचथ्याच्या स्त्रीचें नांव ममता. हिला उचथ्यापासून जो मुलगा झाला त्याचें नांव दीर्घतमस्. हा लहानपणापासूनच आंधळा होता. उचथ्य अल्पायुषी निघाला. तो मेल्यावर ममता जेव्हां जीव देण्यास निघाली तेव्हां बृहस्पतीनें तिला परावृत्त केलें व तिच्याशीं स्वतःच विवाह केला. ब्राह्मणवर्गातला ज्ञात असलेला हाच प्रथम पुनर्विवाह. या विवाहापासून ममतेला जो पुत्र झाला त्याचें नांव भरद्वाज. आविक्षित मरुत्तानें आपल्या यज्ञांत पौरोहित्य कर्म करण्यास भरद्वाजासच निमंत्रिलें होतें. पण या विधवाविवाहामुळें म्हणा किंवा

अन्य कांहीं कारणानें म्हणा, त्यानें तें निमंत्रण नाकारलें. तेव्हां मरुत्तांच्या यज्ञांत पौरोहित्य कर्म संवर्तानें केलें. याच्या पौरोहितकर्मावर फार संतुष्ट होऊन मरुत्तानें आपली मुलगी संवर्तास दिली. दैव विवाहाचें नमूद असलेलें हें पहिलेंच उदाहरण. या आंगिरस ब्राह्मणांनींहि खूप मंत्ररचना केली.

१६. हळू हळू वैशालीच्या पश्चिमेकडील लोकहि उठले. काशीचे राजे काशी सोडून गंगा-गोमती-संगमावरील अवीतरी नगरींत राहात होते हें मागें सांगितलेंच आहे. जो सुदेव पूर्वीच्या स्वाऱ्यांत मारला गेला होता त्याचा नातू प्रतर्दन यानें हैहयांस सामना दिला व हैहयांच्या वीतिहोत्र गणाचा पराभव केला. या गणाचा मुख्य त्या वेळीं वीतहव्य नांवाचा होता. हा पळाला व प्रतर्दनानें याचा पाठलाग केला. एका भृगुकुलोत्पन्न ब्राह्मणानें हा आपल्या वर्गातला आहे असें सांगून त्याचे प्राण वांचविले व तो वीतहव्य पुढें ब्राह्मणच झाला. याचाच मुलगा गृत्समद. याची मंत्ररचना प्रसिद्धच आहे. प्रतर्दनानें हैहयांस पळविलें तरी त्यास काशी सोडवितां आली नाहीं. अनरण्यास मारून रावण परत गेल्यावेळेपासून ती राक्षस या नरभक्षक जातीच्याच ताब्यांत होती. या राक्षसांची ही एक संस्कृति होती. हे कृषि करीत नसत. हे मांसाहारी असून वेळेवर नरमांसहि खात. बाकी यांचीं दण्डकारण्याच्या दक्षिणेस वसतिस्थानें होतीं, दुर्ग होते, भाषा होती, शस्त्रास्त्रें होतीं. नाग लोकांप्रमाणेंच हेहि शिवास मानीत असत. पण यांच्या नरमांसभक्षणानें काशीस महाश्मशान हें नांव पडलें. यादवहि थोडा वेळ परावृत् नांवाचे राजाच्या वेळीं परत आले. पण यांस परावृत्चा मुलगा ज्यामघ याच्या वेळीं पुन्हा खालीं पळून जावें लागलें, तेव्हांपासून मात्र ते विदर्भातच राज्य करीत राहिले.

१७. कोसल देशाच्या बाहुनामक राजास कोसल देश सोडून पळून जावें लागलें हें पूर्वी आलेंच आहे. बाहु पळाला तेव्हां त्याची गरोदर स्त्री त्याच्या बरोबरच होती. ही गर्भवती झाली तेव्हां हिच्या सवतींनीं हिला विष घातलें होतें. बाहूस व त्याच्या या विषपीडित गरोदर स्त्रीस विंध्यवनांतच आश्रम करून राहिलेल्या और्व नांवाच्या एका भार्गव ब्राह्मणास आश्रय दिला. बाहूचा अंत त्याच आश्रमांत झाला व नंतर बाहूच्या स्त्री-मुलगा होऊन तीहि त्या आश्रमांतच मेली. मुलावरहि विषाचा थोडा

फार परिणाम दिसत असल्यामुळें और्वानें याचें नांव सगर असें ठेविलें. धनुर्विद्या शोधून काढणाऱ्या और्वाहून हा और्व निराळा होता, हें सांगावयास नकोच. लाकडावर लाकूड घासून जसा अग्नि उत्पन्न होतो तसाच दगडावर विशिष्ट प्रकारचा दगड आपटला तरीहि अग्नि निघतो हें यास कळल्यामुळें याला और्वाग्नि असेंच म्हणत असत. पण या और्वाग्नीनें दुसरा जो एक शोध लावला त्यामुळें तर याचें हें नांव अधिकच प्रसिद्ध झालें. एकदा दगडावर दगड आपटीत असतां एकदम स्फोट झाला व दगड दूर फेंकला गेला. और्वाग्नीनें याचें कारण शोधण्याचा प्रयत्न केला. शोधाअंतीं त्यास अशीं दोन द्रव्यें सांपडलीं कीं, ज्यांच्या संयोगानें एक नवीन प्रकारचें मिश्र-द्रव्य होई व या मिश्रद्रव्यास अग्निस्पर्श झाला असतां स्फोट होऊन त्या द्रव्यावर ठेविलेली वस्तु दूर फेंकली जाई. हीच पूर्वीची बंदुकीची दारू. हिच्या उपयोगानें त्या और्वानें जें आयुध शोधून काढलें त्याचेंच नांव अग्न्यस्त्र. अग्न्यस्त्र म्हणजे अग्नीच्या साह्यानें जड पदार्थ दूर फेंकणारें आयुध. और्वाग्नीनें ही अग्न्यस्त्रविद्या सगरास शिकविली व तिच्यांत त्यास पारंगत केलें.

१८. हें आयुध हातीं येतांच सगर मोठाच प्रबल झाला. धनुष्यबाणां-पेक्षांहि हें अग्न्यस्त्र अधिक प्रभावी होतें. सगरानें विंध्यवासी लोकांची फौज जमविली व हैहयांचा बीमोड करावयाचें ठरविलें. हैहय पूर्वेकडे जरी स्वाऱ्या करीत तरी यांचें मुख्य ठिकाण नर्मदातीरींच होतें. सगरानें येथेंच त्यांचा पराभव करून त्यांचे पायच तोडून टाकले. नर्मदेकडून तो उत्तरेकडे वाढत गेला व आपला कोसल देश जिंकून चक्रवर्ती झाला. बाहु पळून गेला असतांना वसिष्ठवर्गातला आपव म्हणून जो मुख्य होता तो वैशालींत जाऊन राहिला होता. तेथें त्यानें अथर्वमंत्रांचा इतका संग्रह केला कीं, त्यास अथर्व-निधिच म्हणूं लागले. हा आपव ज्या आपवाचा आश्रम अर्जुनानें जाळला होता त्याचाच वंशज होता. सगर नसतांना द्रुह्युवंशज म्लेच्छासह कोसल देशांत राहात होते. यांच्यांत कांहीं जुने संस्कार कायम असल्यानें कांहीं वसिष्ठवर्गातले ब्राह्मण त्यांचें पौरोहित्यकर्म करीत असत. सगर आल्यावर अथर्वनिधि आपवहि कोसल देशांत आला व सगराचा पुरोहित झाला. सगराची इच्छा या म्लेच्छांस कोसलाबाहेर हांकलून द्यावयाची होती. पण वसिष्ठांनीं रदबदली केल्यामुळें सगरानें त्यांस राहूं दिलें. त्यांतले जे सुसंस्कृत

होते त्यांस आपल्या सामान्य विशांत मिळविले व जे अगदींच असंस्कृत होते त्यांस सेवा करण्यासाठीं म्हणून ठेवून घेतलें. हेच पुढें शूद्र झाले. याप्रमाणें सगरकालीं चार वर्ण समाजांत झाले. पण यांच्या जाती झाल्या नाहींत. योग्यतेप्रमाणें एका वर्णांतून दुसऱ्या वर्णांत जातां येत असे.

१९. विदर्भांत असलेल्या यादवांनीं सगरानें केलेला हैहयांचा पुरा बीमोड केलेला पाहून सगरास विदर्भदेशांत बोलाविलें व त्यांच्या विदर्भ नांवाच्या राजानें आपली केशिनी नांवाची कन्या सगरास अर्पण केली. सगरानें लग्नानंतर आपल्या कुलास अनुरूप असें तिचें प्रभावती हें नांव ठेविलें. लग्नानंतर मुलीचें नांव बदलल्याचा प्रथम उल्लेख येथेंच सांपडतो. सगरानें पुष्कळच वर्षें राज्य केलें. हा दीर्घायु होता. याच्याच वेळीं वसिष्ठानें अश्वमेध यज्ञाची कल्पना काढिली व इतर पुरोहित ब्राह्मणांच्या सल्ल्यानें त्याचा विधि निश्चित केला. या विधीप्रमाणें सगर राजाकडून अश्वमेध करावयाचें ठरलें. मुख्य विधि वसिष्ठानें निश्चित केल्यामुळें या सर्व विधींवर देखरेख करण्यासाठीं एक ऋत्विज नेमावयाचें ठरलें. या ऋत्विजास ब्रह्मा म्हणत. याप्रमाणें अध्वर्यु व होता या ऋत्विजांत या तिसऱ्या ऋत्विजाची भर पडली. अथर्वनिधि वसिष्ठानें ब्रह्मा या ऋत्विजाचें काम स्वीकारलें व तेव्हांपासून ब्रह्मा हा वसिष्ठवर्गातलाच असावा अशी प्रथा सुरू झाली. सगराच्या या यज्ञांत वसिष्ठवर्गांतील ब्रह्मा, विश्वामित्रवर्गांतील होता व भृग्वंगिरसवर्गांतील अध्वर्यु असे तीन ऋत्विज होते.

२०. एवढी तयारी केली तरी सगराचा अश्वमेधयज्ञ पुरा झाला नाहीं. अश्वमेधासाठीं अगदीं पांढरा पण कान काळे असलेला श्यामकर्ण घोडा शोधला गेला व विधिपूर्वक त्याच्या रक्षणासाठीं वीर देऊन त्यास मोकळा सोडला. हा पूर्वेकडे वळला व पुढें दक्षिणेकडे वळून एका विस्तीर्ण जलाशयापर्यंत गेला व त्या जलाशयांतच लुप्त झाला. रक्षक परत फिरले व अश्वमेध अपुराच राहिला. सगराच्या अश्वामुळें ज्या जलाशयाचा शोध लागला त्यास सागर म्हणूं लागले. अश्वमेध पुरा न झाल्यानें सगरानें इतर कांहीं यज्ञ केले. याचे वेळीं यज्ञसंस्था पुष्कळच वाढली व यज्ञाचे बरेचसे प्रकारहि निर्माण झाले. वेदमंत्र निर्माण झाल्यावर ज्या धर्मास वैदिक धर्म म्हणूं लागले होते त्याचीं दोन अंगें मुख्य होतीं. यज्ञव्यवस्था व वर्णव्यवस्था हीं

तीं दोन अंगें होत. या दोन्ही अंगांची बरीचशी निश्चित योजना सगराचे राज्यकालीं झाली म्हणून या सगरकालाचें पुराणेतिहासांत फार महत्त्व आहे. हा काल वैवस्वतमनूनंतर एकेचाळिसाव्या पिढीचा किंवा एकूणसाठ पिढ्या महाभारतापूर्वीचा होता.

२१. आतां सगराच्या कालांत इतर राज्यांची काय स्थिति होती तें पाहून हा सर्ग समाप्त करूं. कोसल देशाच्या पूर्वेस विदेह, वैशाली व त्या पलीकडे पौरस्त्य आनवांचें राज्य होतें. या आनवांत त्या वेळीं बलि नांवाचा राजा राज्य करीत होता. वैशालींत मरुत्ताचा मुलगा नरिष्यंत गादीवर होता व विदेह देशाचा अधिपति प्रतींधक म्हणून होता. विदेह देशाचें या पुराणेतिहासकालांत एक मोठें वैशिष्ट्य दिसून येतें, आणि तें हें कीं, या देशानें राजकीय इतिहासांतल्या घडामोडींत बिलकुल भाग घेतला नाहीं. या साऱ्या वंशांत एकहि चक्रवर्ती झाला नाहीं, पण असें असूनहि यानें आपलें अस्तित्वहि मिटूं दिलें नाहीं. कोसलास लागून असलेलें कान्यकुब्ज राज्य विश्वामित्रानें सोडल्यावर कसेंबसें चाललें व तेंहि फक्त दोन-तीन पिढ्याच. पुढें तें नामशेषच झालें. पश्चिमेस गेलेल्या द्रुह्युवंशजांची स्थिति आपण पाहिलीच. ते कोसलांतच समाविष्ट झाले. वायव्य आनव म्लेच्छाकडूनच नाहींसे झाले होते. तुर्वसूचें कारूष देशांतलें राज्यहि अप्रसिद्धच राहिलें व सगरकालीं तें लुप्तच झालें. हैहयांचा तर पुराच बींमोड सगरानें केला होता. काशीच्या लहानशा राज्यावर प्रतर्दन राज्य करूं लागला होता. राक्षस काशी सोडून निघून गेले होते. सारांश, कोशलाच्या पश्चिमेस सगरकालीं एकहि राज्य नव्हतें व या विस्तीर्ण प्रदेशावर सगराचीच सत्ता होती.

या नऊदहा पिढ्यांचे कालांत मंत्ररचनेस आरंभ होऊन ती बऱ्याच उन्नत दशेस पोंचली.

☆ ☆ ☆

सर्ग चौथा

नव्या नव्या देशांचे शोध

१. सम्राट् सगराच्या कालीं राजकीय परिस्थिति काय होती ती आपण पाहिली. आतां पुढचा इतिहास पाहूं. पौरस्त्य आनवांचा सगरकालीं बलि नांवाचा राजा होता हें मागें सांगितलेंच आहे. त्याच्या राज्यांत एक महत्त्वाची गोष्ट घडली व ती म्हणजे एका ब्राह्मणाचें तेथें पोंचणें. गोष्ट पुढीलप्रमाणें आहे.

२. उचथ्य ममतेचा जन्मांध मुलगा दीर्घतमस् नांवाचा होता ही गोष्टहि आपल्या ध्यानांत आहेच. हा आंधळा मुलगा रूपानें अप्रतिम व बुद्धीनें अद्वितीय होता. स्त्रिया याच्यावर भाळत व याजकडे येत. याचा सावत्रभाऊ म्हणजे आईस चुलत्यापासून झालेला मुलगा भरद्वाज. या भरद्वाजाची स्त्रीच नव्हे तर इतरहि अनेक आश्रमस्त्रिया यावर लुब्ध होऊन बिघडल्या. हा अंध असल्यामुळें यास फारसा दोषहि देतां येत नसे. पण आश्रमांत त्या ऋषींनीं कंटाळून या आंधळ्या दीर्घतमस्ला एका नावेंत घालून ती नाव गंगेंत सोडून दिली. वाहात वाहात ती नाव बलीच्या राज्यांत किनाऱ्याला लागली. बलीस समजल्यावर त्यानें आदरानें यास आपल्या येथें नेऊन याची उत्तम बडदास्त ठेविली. तेथल्या राण्याहि याजवर भुलल्या व यापासून बलीस पांच मुलांचा बाप होण्याचें श्रेय मिळालें. बलीनंतर गंगेच्या कांठाकांठानें खालीं उतरत या पांचांनीं जे देश वसविले त्यांचीं नांवें यावरूनच अंग, पुण्ड्र, वंग, सुह्म व कलिंग अशीं पडलीं. विस्तीर्ण व खोल गंगेच्या किनारीं व समुद्राजवळ हे देश असल्यानें येथें नौकानयनाचें शास्त्र

वाढलें. वेदांत उल्लेखिलेल्या शतारिव, शतस्पया अशा अच्छिद्रा व पारायिष्णु नावा येथेंच झाल्या. यांपैकीं अंग व पुंड्र हे गंगातटीं वसलेले देश होते. वंग हा गंगेच्या मुखाजवळ गंगासागरापर्यंत पसरला होता. वंगाच्या पश्चिमेस सुह्म व महेंद्रपर्वत आणि समुद्राच्यामध्यें कलिंग देश होता. दीर्घतमस् उतारवयाचा झाल्यावर एका राजदासीशीं यानें विवाह केला. या विवाहापासून जो मुलगा झाला त्याचें नांव कक्षीवान्. या मुलास दीर्घतमसनें मंत्ररचना शिकविली व तोंपावेतों गोळा झालेला इतिहासहि यास अवगत करविला. याच्या पशुतुल्य आचरणानें

गवांधर्मात् दीर्घतमा गोतमः समपद्यत !

हा गोतम नांवानें प्रसिद्ध झाला आणि याचे वंशज गौतम म्हणविले गेले. भरद्वाजाचीं मुलें आपणांस भारद्वाज म्हणवूं लागलीं व आंगिरसाच्या आंगिरस, भारद्वज व गौतम या तीन शाखा प्रसिद्ध झाल्या. दीर्घतमसचा उल्लेख पुढील तीन पिढ्यांत येत असल्यामुळें हाहि दीर्घजीवी होता असेंच म्हटलें पाहिजे.

३. सगर अत्यंत दूरदर्शी होता. आपण एवढें श्रम करून मिळविलेलें राज्य पुढें कसें चालेल याची यास नेहमीं काळजी वाटत असे. मंत्ररचनेची आवड त्या काळीं इतकी वाढली होती कीं, थोडीशी बुद्धि असलेला मनुष्यहि मंत्ररचना करण्यासाठीं ब्राह्मणवर्गात शिरे. त्यामुळें या राजवर्गात नुसती शारीरिक शक्ति असलेलेच लोक राहात. याचा राज्यविस्तार करण्यास जरी उपयोग झाला तरी राज्यव्यवस्था चांगल्या प्रकारें या कमी बुद्धीच्या लोकांस करितां येत नसे. सगराचा मुलगा तर 'बडे बापका बेटा' च होता. कारण कांहीं असो पण बहुधा असें पाहण्यांत येतें कीं, फार मोठ्या बापाचा मुलगा मोठा निघत नाहीं. सगराचा मुलगाहि यास अपवाद ठरला नाहीं. हा अत्यंत मूर्ख होता. पण सगराच्या मोठेपणामुळें लोक यास नुसता 'असमंजस' म्हणत. यास राज्य सांभाळतां येणार नाहीं म्हणून सगरानें यास युवराज न करितां याच्या मुलास म्हणजे अंशुमानास यौवराज्य दिलें. पण याचे हातूनहि एवढें विशाल साम्राज्य सांभाळलें जाईल असें त्यास वाटेना. म्हणून यानें आपल्या राज्याचें विभाजन करावयाचें ठरविलें.

४. कोसल देशाच्या पूर्वेतिहासावरून यास कळून आलें होतें कीं, मांधा-

त्यानें जें प्रतिष्ठानचें राज्य कोसल राज्यांत मिळविलें तें चांगलें झालें नाहीं. कोसल देशाची दक्षिणेची व पश्चिमेची बाजू अगदीं उघडी पडली व त्यामुळें आक्रमकांस सरळ कोसल देशावरच आक्रमण करतां येऊं लागलें. तेव्हां पूर्वीचें प्रतिष्ठान राज्य पुनः प्रतिष्ठित करावें असें याच्या मनानें घेतलें व यासाठीं प्रतिष्ठानाचा अभिमान असलेल्या पौरव कुलांतले लोक हा शोधूं लागला. शोधाअंतीं कारूपाच्या विलीन झालेल्या तुर्वसु-वंशजांचे बरोबर राहणारा एक पौरव तरुण यास सांपडला. याचें नांव दुष्यंत. सगराच्या परीक्षेस हा तरुण उतरला व यानें पूर्वीचें प्रतिष्ठान राज्य कोसल देशांतून निराळें करून त्या राज्यावरील आधिपत्यावर दुष्यंत नेमल्याची घोषणा केली. याप्रमाणें बीस पिढ्या नष्ट झलेलें पौरव राज्य सागराच्या उदारहृदयामुळें व दूरदर्शी धोरणामुळें पुन्हा अस्तित्वांत आलें. दुष्यंतहि खरोखरच मोठा धोरणी निघाला. त्यानें आपली राजधानी प्रतिष्ठानाहून काढून आणखी बर यमुनाकांठीं स्थापिली व राज्य उत्तम प्रकारें चालवि-ण्यास सुरुवात केली.

५. याच वेळीं एक नवीनच ब्राह्मणवर्ग निर्माण झाला. कोसलराज बाहु जेव्हां देश सोडून पळाला होता व कोसलांत म्लेच्छ-प्राबल्य माजलें होतें त्या वेळीं वसिष्ठकुलांतला एक ब्राह्मण इतर वसिष्ठांबरोबरच कोसलाबाहेर पडला होता. याचें नांव मित्रावरुण. मित्र व वरुण या दोन देवांचीं यानें सूक्तें रचल्यामुळें यास हें नांव पडलें होतें. याला अज्ञात देश पाहण्याची इच्छा झाली व हा विंध्याच्या उत्तरेस वनांत जाऊन पोंचला. याची पत्नीहि याजबरोबर होती. वनांतच तिला एक मुलगा झाला. प्रसूति-कालीं दुसरें कांहीं नसल्यामुळें एका मडक्याच्या खालच्या फुटक्या भागां-तच या मुलाचा जन्म झाला. म्हणून याचें नांव कुंभयोनि किंवा घटयोनि पडलें. यासहि बापाचाच नाद होता. यानें

पदा विंध्यं समाक्रामदाचामद्दक्षिणोदधिम्।

पायींच विंध्य पार करून दक्षिणसमुद्राचें आचमन केलें. या साध्या कथे-वर पुराणकवीनें आपल्या भरारी मारणाऱ्या कल्पनेनें घटयोनि जन्म, विंध्याचें सूर्यमंडलापर्यंत वाढत जाणें, त्यानें या ऋषीपुढें मस्तक नमविणें व याचें सारा समुद्र पिऊन टाकणें यांनीं युक्त अशी मनोहर पण तर्कास न पटणारी

कथा रचली. हा बरेच अज्ञात देश पाहून परत आला तेव्हां अगम ठिकाणांहून आलेला म्हणून यास अगस्त्य असें नांव पडलें. अनेक ठिकाणचें ज्ञान प्राप्त करून आलेल्या ऋषीस विदर्भ राजानें आपली दुसरी मुलगी सगराची मेहुणी लोपामुद्रा दिली. या जोडीनें लग्नानंतरहि खूप भ्रमण केलें व शेवटीं काशीच्या दुसऱ्या बाजूस गंगातीरीं आश्रम करून ते राहिले. काशी सोडून राक्षस गेल्याचें मागें सांगितलेंच आहे. काशिराज प्रतर्दनपुत्र वत्सानें उरल्यासुरल्या राक्षसांस ठोकून काढलें व काशी राक्षसमुक्त केली. दुष्यंतानें प्रतिष्ठान सोडून जेव्हां राजधानी वर नेली तेव्हां वत्सानें दुष्यंताजवळून प्रतिष्ठान मागून घेतलें व त्यास आपल्या काशी राज्यांत मिळविलें. याप्रमाणें गंगा-गोमती-संगमापासून गंगा-यमुना-संगमापर्यंतचा जो देश तो वत्स राजाच्या मागें वत्स देश म्हणून प्रसिद्ध झाला. याची राजधानी मात्र काशी न राहतां कौशांबी झाली. वत्साचा मुलगा अलर्क. यावर लोपामुद्रेची कृपा होती. यानेंहि वत्सराज्य चांगल्या प्रकारें चालविलें.

६. जामदग्न्य परशुरामाच्या वेळीं कश्यपवर्ग या देशांत आलेला आपणांस माहीतच आहे. यांतलाच एक ब्राह्मण अनात्मवादी असल्यानें इतर ब्राह्मण त्यास कमी मान देत असत. हा और्वाग्नीचा शिष्य. याचाच मुलगा कण्व कश्यप. याला एकदा आपल्या आश्रमाजवळ एक नवजात मुलगी सांपडली. हिचा पिता होता विश्वामित्रकुलांतला व माता होती मेनका नांवाची परभृतिका. दोघांची गांठ पडली. कांहीं दिवस चैन केली व मुलगी झाली तेव्हां दोघेहि तिला कण्वाश्रमाजवळ सोडून आपापल्या कामास निघून गेले. आपल्या मुलीस जन्म देतांच सोडून जाणाऱ्या मातेचें हें पहिलेंच ऐतिहासिक उदाहरण. मुलीभोंवतीं जमलेल्या शकुंतांच्या म्हणजे पक्ष्यांच्या किलबिलाटानें लक्ष्य वेधलें म्हणून कण्वानें तिचें नांव शकुंतला ठेवलें. मुलगी आश्रमांतच मोठी झाली. एकदा दुष्यंत राजा मृगया करीत कण्वाश्रमांत आला. त्याच्या नजरेस शकुंतला पडली व आपल्या मुलास राजा करावें या अटीवर हिनें दुष्यंताशीं गांधर्वविवाह केला. थोड्या दिवसांनीं 'तुला लवकर नेण्यासाठीं माणसें पाठवितों' असें सांगून राजा निघून गेला. शकुंतलेस दिवस गेले व योग्य वेळीं मुलगा झाला. राजाकडून कोणी नेण्यास आलें नाहीं हें पाहून मुलासह कांहीं दिवसांनीं कण्वानें शकुंतलेस दुष्यंताचे

राजधानींत पाठविलें. पण राजानें गांधर्वविवाहाविषयीं अथवा त्या मुलाच्या पितृत्वाविषयीं साफ कानांवर हात ठेविले. शकुंतला संतापली व राजास हवें तसें बोलूं लागली. तेव्हां तिचा सात्त्विक संताप व मुलाचें दुष्यंताशीं उघड उघड दिसत असलेलें साम्य पाहून आकाशवाणीनें म्हणजे एकच कोणी बोलत आहे असें न समजतां आकाशापावतों पोंचेल एवढ्या उच्च रवानें जनतेनें, 'भरस्व पुत्रं दुष्यंत' 'राजा आपल्या मुलाचा सांभाळ कर,' असें सांगितलें. राजानें मग तसें केलें. हाच सर्वदमन भरत.

७. दुष्यंताचा हा मुलगाच पुढें राजा झाला. यानें आपल्या पराक्रमानें सारेच राजे आपले मांडलिक केले. जें प्रतिष्ठान सगराकडून दुष्यंतास मिळालें होतें व जें दुष्यंतानें वत्सराजास दिलें होतें त्याच्या पश्चिमेचा सारा देश भरताचे ताब्यांत होता.

हिमवद्विंध्ययोर्मध्ये यत्प्राग्विनशनादपि ।
प्रत्यगेव प्रयागाच्च भारतः संप्रकीर्तितः ॥

हिमाचल व विंध्याचल यांचे मध्यें विनशनाचे म्हणजे सरस्वती नदीचे वाळूच्या मैदानांत, नष्ट होण्याचे ठिकाणाचे पूर्वेस व प्रयागाचे म्हणजे गंगायमुना-संगमाचे पश्चिमेस असलेला देश भारत म्हणजे भरताचा म्हणविला गेला. याच भारताचें वाढत गेलेलें व वर्धिष्णुरूप म्हणजे आमचें भरतखंड, भरतवर्ष किंवा भारत. यास नांव देणारा सम्राट् भरत. भरतानें आपणांस राज्याभिषेक करविला. यासाठीं दीर्घतमस् ऋषि स्वतः निमंत्रित केला गेला होता व त्यानेंच मंत्रपूर्वक राज्याभिषेक करून भरतास चक्रवर्ती सम्राट् अशी पदवी दिली. कोसल देशचा दिलीप, विदेह देशचा कीर्तिरथ व वैशाली देशाचा राष्ट्रवर्धन हे राजे या अभिषेक समारंभास उपस्थित होते. भरतहि दीर्घायुषी होता. याच्या वेळीं देशभर शांति व समृद्धि नांदत होती.

८. शांति व समृद्धि असली म्हणजे यज्ञासारख्या गोष्टी केल्या जातात. भरतकालीं यज्ञाचे अनेक प्रकार नवे नवे निघूं लागले. भरद्वाज म्हणजे बृहस्पति व ममतेचा पुत्र यानें अग्नि ज्या वेदीवर ठेवावयाचा तिचें चयन कसें करावें यावद्दलचे विधि व मंत्र निर्माण केले. या वेदींस विटा कशा असाव्या, त्यांचे आकार कसकसे असावे, त्यांचे किती थर द्यावे इत्यादि सूक्ष्म गोष्टींचाहि विचार होऊं लागला व यज्ञविधि दिवसेंदिवस

अधिकाधिक गुंतागुंतीचा बनूं लागला. या भरद्वाजाचा मुलगा शंयु यानें तर एक नवीनच यज्ञपद्धति काढली होती व त्यामुळें या यज्ञपद्धतींतील अग्नीस च शंयु असें नांव पडलें. एवढा मोठा मान या बृहस्पतिपौत्र भारद्वाज शंयूस लोक देत असत. 'तच्छंयो रावृणीमहे' या मंत्रांतला शंयु शब्द याच यज्ञाग्नीचा वाचक आहे. पण हा शंयु अल्पायुषी निघाला. शंयूच्या स्त्रीचें नांव सत्या होतें व मुलाचें नांव होतें विदथिन् भारद्वाज. याचें ऐतिहासिक दृष्टीनें फार निराळें महत्त्व आहे. शंयूच्या यज्ञपद्धतीनें जेवढी क्रांति केली त्यापेक्षां या शंयुपुत्रानें समाजांत फार मोठी क्रांति घडवून आणली. त्याची हकीगत पुढीलप्रमाणें.

९. त्या वेळच्या इतिहासाकडे पाहिलें तर असें दिसून येतें कीं, मोठ-मोठ्या राजांस आपल्या मागें या मोठ्या राज्याचें कसें होईल, प्रजेस सुख कसें मिळेल व तें धुळीस मिळेल कीं काय याची फार काळजी वाटत होती. कारण एकच होतें. देशांतली बुद्धि सारी मंत्ररचनेकडे, यज्ञवृद्धीकडे व अशाच नुसत्या पारमार्थिक गोष्टींकडे खर्च होत होती. पुरोहित पुढारी न राहतां कवि होऊं लागले होते. राजेलोकहि त्या मानानें कमी महत्त्वाकांक्षी व अधिक सुखलोलुप होत चालले होते. या काळजींतून सुटण्यासाठीं सगरानें शोधून काढिलेला मार्ग म्हणजे राज्याचे तुकडे करून त्याचें लहान राज्य करावयाचें व ते लहान विभाग योग्य व्यक्तींच्या हवालीं करावयाचे. पण अशा विभाजनानें काम भागणारें नव्हतें. सगराप्रमाणेंच भरतहि आपल्या संततीवर संतुष्ट नव्हता. यास तीन राण्या होत्या व प्रत्येकीपासून तीन तीन अशीं नऊ मुलें होतीं. पण त्यांपैकीं एकहि त्याच्या भारताचें राज्य चालविण्यास त्यास योग्य वाटत नव्हता. विभजनपद्धतिहि त्यास संमत नव्हती. म्हणून त्यानें असा विचार केला कीं, एखाद्या योग्य बुद्धिवान् ब्राह्मणास जर राजा केलें तर त्याच्या बुद्धीचा उपयोग राज्यसंचालनाकडे होईल व त्यामुळें ब्राह्मणांच्या बुद्धीस एक निराळें क्षेत्र मिळेल. त्यानें आपल्या मंत्रिमंडळापुढें हा विचार मांडला. पण त्यांनीं तें मान्य न करतां उत्तम संततीसाठीं यज्ञ करण्याची सल्ला दिली. एवढ्यावरूनहि राज्यसंचालकांच्या बुद्धीची कल्पना सहज करतां येण्यासारखी आहे. यानें यज्ञ केले होतेच व आणखीहि कांहीं केले. पण मनासारखा मुलगा न झाल्यामुळें यानें ब्राह्मणवर्गास एकत्रित

करून ही कल्पना त्यांचे पुढेंहि ठेवली. पण कोणीहि ब्राह्मण राजा होण्यास म्हणजे ब्राह्मणापेक्षां कमी संमानित होण्यास तयार होईना. शेवटीं विदथिन् भरद्वाजानें ही गोष्ट मान्य केली, पण ती एका अटीवर कीं, तो व त्याची संतति उभयवर्णाची मानली जावी. ब्राह्मणांनीं ही अट मान्य केली व विदथिन् भारद्वाज विधिपूर्वक भरताचा राज्याधिकारी वारस ठरला. पुराणेतिहासकार सांगतात कीं,

भारद्वाजः स विदथी ब्राह्मण्यात्क्षत्रियोऽभवत्।
द्व्यामुष्यायण नामासौ स्मृतो द्विपितरस्तथा ॥

परंतु विदथीच्या भाग्यांत राजपदाचा उपभोग लिहिला नव्हता. भरत इतके दिवस जगला कीं, विदथीच्या समोरच स्वर्गास गेला. पुढें विदथिपुत्र वितथास भरतानें राज्याभिषेक करविला. भरतापासून राज्याभिषेकाचा प्रघातच पडला. या राज्याभिषेकानंतर भरतहि मेला व पौरव-राज्यावर वितथ हा राजा झाला. वितथ व त्याचे वंशज उभयवर्णाचे म्हणवीत. म्हणून ते क्षत्रोपेत ब्राह्मण याच नांवानें प्रसिद्ध झाले.

१०. ब्राह्मण-समाजांत झालेली ही दुसरी क्रांति. पहिली क्रांति विश्वामित्राचे काळीं झाली. तोंपावेतों ब्राह्मण्याची किंवा पौरोहित्याची एकच कसोटी होती—तपस्या—म्हणजे इंद्रियनिग्रह व कष्ट सहन करणें. त्याबरोबर नवीन विद्यांचे आविष्कार, जनहितार्थ हव्या त्या गोष्टीचा त्याग इत्यादि गोष्टी जरी आवश्यक मानिल्या जात होत्या तरी मुख्य भर तपस्येवरच असे. म्हणूनच पुरोहित होण्यासाठीं यति—ययातीचा भाऊ व स्वतः विश्वामित्राहि प्रथम तप करण्यासाठीं गृहत्याग करून गेले. विश्वामित्रानें मुख्य पौरोहित्य करण्याचा हट्ट धरला नसता तर कांहीं दिवसांनीं कान्यकुब्ज देशांतील पुरोहितांप्रमाणें इतर पुरोहितांकडून त्यास मान्यता मिळाली असती, पण त्यानें लगेच मोठेपणाची हांव धरली व म्हणून वसिष्ठवर्गास त्याला विरोध करावा लागला. विश्वामित्रानें मंत्ररचनेची किंवा आजच्या भाषेंत बोलावयाचें असल्यास काव्य करण्याची कला शोधून काढली व त्याजबरोबर जो दीक्षाविधि निर्माण केला त्यामुळें ब्राह्मण होणें सोपें झालें. मंत्ररचनेवरच सर्व भर दिला गेल्यामुळें ब्राह्मण थोडे खालच्या थरावर उतरले.

११. या मंत्ररचनेच्या कलेमुळें वाढ झाली असेल तर ती प्रतिभेची—

उत्कट कोटिकल्पनेची. ज्या देवांचीं सूक्तें रचावयाचीं त्यांचीं रूपें प्रत्यक्ष नसल्यामुळें ज्या ऋषीस जसें वाटलें तसें त्यानें त्या देवाचें वर्णन केलें. वरें, त्याच्या कल्पनेचा पडताळा पाहण्याचें कांहीं साधन नसल्यामुळें तिला खोटें म्हणणेंहि कठीण पडूं लागलें. त्यामुळें प्रत्यक्ष प्रमाणापेक्षां शब्द-प्रामाण्यावरच सारा भार आला व वास्तवतेपासून आम्ही अधिकाधिक दूर जाऊं लागलों. क्रियाकलाप वाढूं लागला व सारभूत तत्त्व मागें पडूं लागलें. छंदोमयी वाणी गद्यवाणीपेक्षां निराळी झाली व प्रकृतीप्रमाणें बोलली जाणारी लौकिक भाषा थोडी कठीण व सामान्य लोकांस अगम होत चालली. तिच्यावर छांदस संस्कार झाले व वैदिक संस्कृत म्हणून तिचें नांव पडलें. मंत्ररचना नव्हती तोंपावेतों जें काय करावयाचें तदर्थक शब्द वापरून कुणासहि यजन करितां येत असे. पण देवाच्या आवाहनाकरितां मंत्रप्रयोग सुरू झाल्यामुळें ते मंत्र म्हणणारांचा एक विशिष्ट वर्ग तयार झाला व यजनकर्म या वर्गाचाच विशेष अधिकार बनला. प्रत्येक बुद्धिवान् मनुष्य मंत्ररचनेच्या मागें लागला व इतर कामासाठीं याच लोकांची वाण भासूं लागली. ही दूर करण्यासाठीं बुद्धिवान् पुरुषांस दुसरें प्रलोभन दाखविणें आवश्यक होतें व हाच हेतु धरून भरतानें ब्राह्मणास राजा करण्याचें ठरविलें.

१२. सत्ता व बुद्धि यांची सांगड घालण्याचा भरताचा प्रमुख हेतु होता. तो कितपत सफल झाला हें सांगणें कठीण आहे. पण भरताच्या योजनेचा एक लाभ अवश्य झाला. विदथिन् भारद्वाजास दिलेल्या सवलतींमुळें वाटेल तर क्षत्रिय होऊन राज्य करावें व वाटलें तर ब्राह्मण होऊन कवि व्हावें ही मुभा प्रथम त्याच्या वंशांतील लोकांस व पुढें इतरांसहि राहिली व त्यामुळें ब्राह्मणांत शिरूं पाहणारा एक प्रकारचा कडवेपणा दूर झाला. क्षत्रियांस हीन लेखण्याची जी प्रवृत्ति बळावूं पाहात होती, ती कमी झाली. ब्राह्मण व क्षत्रिय अधिकाधिक जवळ आले व समाजांत त्यांचेमध्यें पडूं पाहणारी खोल दरी भरून निघाली. या सामाजिक क्रांतीचा आतां फार विचार न करितां ऐतिहासिक गोष्टींकडे वळूं.

१३. भारताच्या राज्याभिषेक-समारंभांत कोसल देशाचा दिलीप उपस्थित असल्याचें मागें सांगितलेंच आहे. हा दिलीप पहिला. याचा मुलगा भगीरथ. हाहि मोठा उद्योगी पुरुष होता. अगस्त्यानें जसें विंध्यपर्वताच्या दक्षिणचे

क्रमांक ५५५५२ दिः ..... निवेदन
क्रमांक ...२२०३... नोंद दिः ...२०/५१

देश पाहिले तसे या राजानें गंगेच्या उगमापर्यंतचा भाग शोधून काढला. अगस्त्याच्या कार्यापेक्षां हें काम निराळ्या प्रकारचें होतें व यास भगीरथासारखा साधनसंपन्न राजाच हवा होता. सगराच्या अश्वमेधाचे वेळीं कोसल देशचे वीरपुरुष सागरापर्यंत पोंचलेच होते. भगीरथ उलट दिशेनें शोधीत गेला. याला प्रथम गंगा विष्णुपद नांवाच्या डोंगरांतून बाहेर पडतांना दिसली. विष्णुपद हें गिरिशिखराचें नांव. दिल्लीस आज असलेल्या कुतुबमीनारजवळील लोहस्तंभावर जो चंद्र नांवाच्या राजाचा लेख आहे त्यांतहि हें नांव आलेलें आहे. 'प्रांशुर्विष्णुपदेगिरौ भगवतो विष्णोर्ध्वजः स्थापितः' अशी ओळ त्या लेखांत आहेच. हा भगीरथानें पाहिलेला विष्णुपद म्हणजेच आजची 'हरिकी पेढ़ी' – हरिद्वार. वर शोधतां शोधतां यानें ब्रह्मकमंडलु नांवाच्या सरोवरांतून हिला निघतांना पाहिलें व अगदीं शेवटीं शिवजटेसारख्या हिमालयावरून ओघळणाऱ्या हिमनद्यांतून गुप्त असलेली व पुढें एका लहानशा धारेच्या रूपानें प्रकट झालेली पाहिली. हीच साधी कथा पुराणकवींनीं आपल्या प्रतिभेनें फार मनोहर रीतीनें सांगितली आहे. यानें केलेले प्रयत्न पराकोटीचे होते व म्हणूनच आजहि पराकाष्ठेच्या प्रयत्नाला भगीरथ प्रयत्न असें म्हणतात. जह्नूच्या राज्यांत हवीतशी खेळविलेली गंगा जशी जाह्नवी म्हणून जह्नूच्या नांवानें प्रसिद्धीस आली तशीच भगीरथाच्या प्रयत्नानें पाहिलेली गंगा ही भागीरथी नांवानें प्रसिद्ध झाली.

१४. भरतानंतर पौरव राज्य वितथास मिळालें. याचा मुलगा भूमन्यु. यास पांच मुलें झालीं. वडील मुलगा जो गादीवर बसला त्याचें नांव बृहत्क्षत्र. दुसऱ्या चारांनीं ब्राह्मणधर्म स्वीकारला. यांचे सारे वंशज 'क्षत्रोपेत द्विज' म्हणविले जात. यांतील पहिल्याचें नांव शुनहोत्र. ऋग्वेदांत ज्याचीं अनेक सूक्तें ग्रथित आहेत तो गृत्समद या शुनहोत्राचा पुत्र. याचा मुलगा शौनक. पुराणेतिहासकार यास चातुर्वर्ण्यप्रवर्तक म्हणतात. यावरून असें वाटतें कीं, ब्रह्मक्षत्रांप्रमाणेंच देशांत शांतता व समृद्धता वाढत असतां सामान्य विशांतून म्हणजे प्रजेंतून कृषि, पशुपालन व वाणिज्य या कर्मांस अनुसरणारे आपणांस वैश्य म्हणवूं लागले. ब्राह्मणांच्या दीक्षाविधीस पाहून यांनींहि आपला निराळा दीक्षाविधि निर्माण केला व हे दीक्षित तीनहि वर्ण द्विज या नांवानें प्रसिद्ध झाले व दीक्षा न घेतां सामान्य कर्मे करीत राहणारे शूद्र झाले.

ग्रं. क्र. 923

ही प्रवृत्ति सुरू करण्यास शौनकानें मदत केल्यामुळें तो चातुर्वर्ण्यप्रवर्तक झाला. पण तरीहि एका वर्णांतून दुसऱ्या वर्णांत जाण्यास अनुमति असे. शुनहोत्राचा धाकटा भाऊ गर्ग. गार्ग्य ब्राह्मण याच गोत्रांतले म्हणजे समूहांतले. तिसरा भाऊ अमहीयु. याचा मुलगा उरुक्षय सूक्तकार होता व उरुक्षयाचा मुलगा कपि गोत्रर्षि झाला. या गोत्रांतले ब्राह्मण कापेय. चौथ्या भावाचें नांव नर. याचा मुलगा संकृति. संकृतीस दोन मुलगे झाले. एकाचें नांव गौरिवीति. यानें सूक्तरचना केली. दुसरा रंतिदेव. यानें क्षात्रधर्माचा स्वीकार केला, दशपुर नांवाचें नगर वसविलें व दशार्णा नदीवर अनेक यज्ञ केले. यज्ञांत मारल्या गेलेल्या पशूंचीं कातडीं याच नदींत धुतलीं जाऊन तीं कमावितीं जाण्याची कला निघाली. यामुळें या नदीस चर्मण्वती हें नांव मिळालें. रंतिदेवाचें राज्य फार दिवस चाललें नाहीं. याचे वंशज पुन्हा ब्राह्मणधर्मानें राहूं लागले. याप्रमाणें वितथाचे वंशज कधीं ब्राह्मण तर कधीं क्षत्रिय असे आपापल्या गुणकर्मामुळें होत राहिले. या क्षत्रोपेत ब्राह्मणांचीं नवीन नवीन गोत्रेंहि होत गेलीं.

१५. दश हा शब्द या वेळीं फार लोकप्रिय झाला होता असें दिसतें. देश दशार्ण, नदी दशार्णा, नगर दशपुर. याचप्रमाणें यदुवंशांतल्या एका राजाचें नांव होतें दशार्ह. यानेंहि बरेच यज्ञ केले व ब्राह्मणांस खूप दानें दिलीं. हाहि वंशकर्ता होऊन गेला. म्हणजे यदूचे यादव यानंतर आपणांस दाशार्ह म्हणवूं लागले. इकडे अयोध्येंत अंबरीष नांवाचा राजा झाला. हा भगीरथाचा नातू. भगीरथपुत्र श्रुतानें अनेक सूक्तकारांचीं सूक्तें ऐकण्यास त्यांस बोलाविलें व अनेक सूक्तें यानें ऐकिलीं, त्यावरून याचें नांवच श्रुत असें प्रसिद्ध झालें. क्षत्रियांची विजिगीषा या काळीं कमी झाली. ऐषआराम वाढला. खाण्यापिण्यास मुबलक मिळूं लागलें. त्यामुळें अपचनासारखे विकार थोडेथोडे बळावूं लागले. यावर उपाय म्हणून अंबरीषानें पक्षांत एक दिवस उपवास करण्याची प्रथा सुरू केली. यानें ज्या दिवशीं पहिला उपवास केला ती एकादशी तिथि असल्यामुळें एकादशी व्रत सुरू झालें. अंबरीष सूक्तकारहि होता. भारद्वाज कुलांतील ऋजिष्वन् नामक ऋषीसह यानें केलेलें सूक्त ऋग्वेदांत ग्रथित आहे. शारीरिक विकार दूर करण्याचे प्रयत्न या काळीं बरेच झालेले दिसतात. अंबरीषानें उपवासचिकित्सा सुरू केली तर याचाच

मुलगा सिंधुद्वीप यानें जलचिकित्सा आरंभिली. पाण्यानें व पाण्याच्या योग्य सेवनानें सर्व रोग दूर होऊं शकतात. पाण्यांत शिवतम रस आहेत व त्याच्या सेवनानें गाईमुळें जशीं वासरें पुष्ट होतात तशीं माणसेंहि नुसत्या जलसेवनानें पुष्ट होऊं शकतात हा सिद्धान्त सिंधुद्वीपानें मांडला. जलानें शरीरशुद्धि करणारें 'आपोहिष्ठा' सूक्त याच सिंधुद्वीप अंबरीषाचें आहे. सिंधुद्वीप राजा नव्हता. राजा झाला होता. अंबरीषाचा दुसरा मुलगा युवनाश्व. याचा मुलगा, हारीत ब्राह्मणांस प्रसिद्धि देणारा हरित. या वेळेपासून कोसल वंशांतहि क्षत्रोपेत ब्राह्मण होऊं लागले व यांचींहि गोत्रें म्हणजे वर्ग झाले.

१६. दाशार्ह यादवांचीं अनेक लहान लहान राज्यें झालीं. यांची मुख्य शाखा शूरसेन देशांत होती. दुसरी होती विदर्भात, पण विदर्भ व शूरसेन या देशांचे मध्यें यांच्या दोन शाखा आणखी प्रसिद्ध झाल्या. यांतील एक विदिशेंत राज्य करीत होती. विदिशा हें प्राचीन नांव मधल्या काळांत अपभ्रष्ट होत होत विडिशा, विडशा, भिडशा, भिलसा या क्रमानें भेलसा झालें होतें. पण भारत स्वतंत्र झाल्यावर ज्या कांहीं नांवांचें पुनरुज्जीवन झालें त्यांत तें पुन्हा विदिशा या नांवानेंच आज प्रसिद्ध आहे. विदिशा हें नांव पडण्याचें कारण हें नगर अगदीं कर्कवृत्ताजवळ आहे, त्यामुळें सूर्याचें दक्षिण संक्रमण ठरविण्याचा काल व त्यावरून विशिष्ट दिशा ठरविण्यास याचा उपयोग होतो, हें होय. या नांवावरून व मागें उल्लेखिलेल्या दशशब्दाच्या लोकप्रियतेवरून त्या वेळीं ज्योतिर्गणिताची कल्पना येऊं लागली होती, हें अनुमान सहज करतां येण्याजोगें आहे. त्यांतच कांहीं तत्कालीन अत्रि ब्राह्मणांच्या सूक्तांतील ग्रहणाच्या उल्लेखाची भर घातली म्हणजे तें अनुमान अधिक दृढ होतें.

१७. यादवांची दुसरी लहान शाखा निषध देशांत होती. येथें त्या काळीं नळ नांवाचा राजा राज्य करीत होता. विदर्भाच्या भीमरथ नांवाच्या राजाची मुलगी दमयंती हिनें नळास स्वयंवर पद्धतीनें वरिलें होतें. शांततेच्या दिवसांत जबरीनें किंवा भीतीनें मुलींचीं लग्नें करावयाचे दिवस संपून आतां राजपुत्रांस बोलावून त्यांतून हवा असेल तो निवडून त्याच्याशीं लग्न करावयाचें स्वातंत्र्य मुलीस दिलें जाऊं लागलें होतें. यांचेंच प्रमाण स्वयंवरपद्धति हें होय. शांततेमुळें समाजांत ही जशी एक महत्त्वाची बाब रूढ झाली तशीच एका वाईट गोष्टीचीहि सुरुवात याच काळीं झाली. ती म्हणजे अक्षक्रीडेसारख्या

बैठ्या खेळांची निर्मिति. मनुष्यास जोंपावेतों महत्त्वाचीं कामें असतात, तोंपावेतों बैठे खेळ निर्माण होत नाहींत. पण जेव्हां कामें नसल्यानें वेळ जात नाहीं तेव्हां असले बैठे खेळ अस्तित्वांत येतात. मग शरीरबलानें दुसऱ्याच्या गोष्टी प्राप्त करण्याचें रूपांतर पण लावून त्या हरण करण्यांत होतें. उद्योग किंवा स्वपराक्रम याऐवजीं पडेल त्या डावावर म्हणजे दैवावरच जय किंवा अपजय अवलंबून राहतो व उद्योगवादाची जागा दैववाद घेतो. मग अशा क्रीडेचे व पणाचेहि नियम ठरले जातात. युद्धाच्या आह्वानाप्रमाणें अक्षक्रीडेंत किंवा द्यूतांत 'अहूतो न निवर्तेत' असे नियमहि अस्तित्वांत येतात.

१८. नलदमयंतीचा इतिहास या समाजांतील दोन्ही गोष्टी ठळकपणें दाखवितो. दमयंती नळास दिली गेली नव्हती तर जमलेल्या अनेक राजपुत्रांची माहिती समजून घेऊन रूपानें व गुणांनीं युक्त अशा नळास त्यांतून वर म्हणून तिनें स्वतःच निवडलें होतें. दोघांचीहि कालक्रमणा अत्यंत सुखानें चालली होती, पण या अक्षक्रीडेच्या आह्वानानेंच नळास द्यूतांत आपलें सर्वस्व हारविण्यास भाग पाडलें. शेवटीं दोघांसहि वनवास पत्करावा लागला. नळदमयंतीची कथा इतकी प्रसिद्ध आहे व अनेक कवींनीं ती इतक्या रसाळपणें वर्णिली आहे कीं, तिचें वर्णन म्हणजे चर्वित चर्वणच होणार आहे. सबब ती सांगत न बसतां फक्त एका दुसऱ्या सामाजिक प्रथेचा उल्लेख करणेंच योग्य ठरेल. नळापासून वियुक्त झाल्यावरहि दमयंतीनें नळप्राप्ति करून घेतली तीहि पुनः स्वयंवराच्याच मिषानें. यावरून हें स्पष्ट दिसतें कीं, पुन्हा पति करण्यासाठीं पहिला पति मृतच व्हावा लागत नसे. तो नष्ट अथवा परागंदा झाला व त्याचा कांहीं विवक्षित काळपावेतों पत्ता न लागला तरी स्त्रियांस हा अधिकार दिला जात असे, व तोहि गौण म्हणून नव्हे तर तो राजरोस पूर्वीप्रमाणेंच स्वयंवर करून. हे अधिकार स्त्रियांना देणें जसें त्या वेळच्या समाजाच्या चित्तौदार्याचें लक्षण आहे, तसेंच पण द्यूतासारखे बैठे खेळ व त्यांतील जयापजयावर मनुष्याचें जीवन अवलंबून ठेवणें हें समाजाच्या शिथिलावस्थेचें द्योतक आहे.

१९. नळावर निषध देशांत हा प्रसंग आला तेव्हां अयोध्येंत सिंधुद्वीपाचा पौत्र ऋतुपर्ण राज्य करीत होता. अंबरीष व सिंधुद्वीपाच्या वेळीं

शरीरविकार दूर करण्याच्या ज्या चिकित्सा निघाल्या त्यामुळें म्हणा किंवा इतर कांहीं कारणांमुळें म्हणा, सिंधुद्वीपाचा मुलगा पुष्कळ वर्षें जगला. इतका कीं लोक त्याला अयुतायु म्हणूं लागले होते. आपल्या दीर्घायुष्यांत इतर पराक्रम करण्यांत लक्ष न घालवितां यानें अक्षविद्येंत चांगलीच प्रगति केली होती. अक्षविद्येंतल्या साऱ्या खुब्या यास माहीत होत्या व त्या यानें आपला मुलगा ऋतुपर्ण यास शिकविल्या होत्या. नळ जेव्हां ऋतुपर्णाबरोबर दमयंतीच्या पुनः स्वयंवरास आला तेव्हां दमयंतीनें त्याला ओळखलें. ऋतुपर्णास नळाची हकीगत समजल्यावर त्यानें नळास अक्षविद्या शिकविली व नळाजवळून अश्वविद्या व पाकविद्या शिकून घेतली. नळ पाकशास्त्रांत निपुण होता. एखादा राजा पाकशास्त्रांत निपुण असणें हेंहि बराच वेळ रिकामा असण्याचेंच लक्षण आहे हें सांगणें नकोच. दोघांनींहि आपापल्या विद्यांची देवाणघेवाण केली व त्या अक्षविद्येच्या बळावर नळानें आपलें सर्वस्व पुन्हा जिंकून घेतलें.

२०. रथाची कल्पना चित्ररथ यादवानें काढल्याचें पूर्वी आलेंच आहे. नळाचा सासरा भीमरथ हें नांवहि पूर्वी आलेंच आहे. पण याचे तीन वंशज आपणांस रथवर, दशरथ व एकादशरथ म्हणवितात. यावरून रथ-विद्येंत कांहीं सुधारणा यांनीं केल्या असें मानावयास हरकत नाहीं. पण याच वेळीं पौरव बृहत्क्षत्राचा नातू एका अन्य वन्य पशूस माणसाळण्याचा प्रयत्न करीत होता. हा पशु म्हणजे हत्ती. याच्या राज्यांत हत्ती माणसाळला गेला व पहिली स्वारी हत्तीवर करण्याचा मान यास मिळाला म्हणून यास हस्तिन् असेंच नांव पडलें. हत्तीसारखा प्रचण्ड पशु आपलासा करून या भरतवंशज हस्तीनें बुद्धिबलापेक्षां श्रेष्ठ आहे असें सिद्धच करून दिलें व भरतानें बुद्धिवान् पुरुषास राजा करून जी बुद्धि मंत्ररचनेंतून काढून राज्य-व्यवस्थेकडे वळविली ती थोडी तरी सार्थकीं लागली असें म्हटलें पाहिजे. हत्तीवरील राजाची स्वारी म्हणजे खरोखरच केवढें भव्य दर्शन आहे, हें सांगावयास नकोच. त्या वेळच्या एका सूक्तकार कवीनें तर आपल्या इष्ट देवतेचें आवाहन करतांना 'याहि राजेवाम वाँ इभेन' त्यास हत्तीवर बसून जाणाऱ्या राजाची उपमाच दिली आहे. या हस्ती राजानेंच हस्तिनापुर वसवून दुष्यंतानें जी राजधानी यमुनाकांठीं प्रतिष्ठानापासून उत्तरेकडे नेली

होती, ती हस्तिनापुरीं आणली. यावरून असें ठाम सांगतां येतें कीं, आमचें हस्तिनापुर महाभारतापूर्वी जवळजवळ पन्नास पिढ्या वसलेलें आहे. पत्ति, अश्व आणि रथ यांच्या पंक्तीला फौजेंत चौथें अंग म्हणून हत्तीचा समावेश झाला व रथामुळें व्यूनीकिनी झालेली सेना चतुरंगिणी झाली.

२१. हस्तिन् हा मोठा पराक्रमी होता. हत्तीच्या जोरावर कांहीं विजय मिळवून हाहि चक्रवर्ती झाला. याला अजमीढ व द्विमीढ नांवाचे याचे दोन मुलगे होते. कोशलाच्या व पौरव राज्याचे मध्येंच यानें पश्चिमेस एक नवें राज्य स्थापिलें. हें महाभारतकालापर्यंत टिकलें. अजमीढानंतर पौरव राज्याचे तीन वांटे झाले. हस्तिनापुराप्रमाणें अहिच्छत्रा व कांपिल्य अशीं दोन शहरें या राज्यांत आणखी वसलीं होतीं. प्रत्येक वांट्यांत एक नगर याप्रमारणें हे तीन वांटे अजमीढाच्या तीन मुलांनीं वांटून घेतले. अजमीढास एक घोर नांवाचा आणखी मुलगा होता. यानें ब्राह्मणधर्म स्वीकारला. याचा गुरु आंगिरस् कुलांतला असल्यानें हा आपणास घोर आंगिरस म्हणवीत असे. याचाच मुलगा कण्व आंगिरस. हा गोत्रकार ऋषि होता. शकुंतलेचा पालक कण्व काश्यप होता. या कण्वासच एक भाऊ होता. त्याचें नांव प्रगाथ. यानें एकदा कण्वपत्नीस भ्रष्ट केलें. पण पुढें पश्चात्ताप-दग्ध होऊन यानें भाऊ-भावजयीस पिता-मातेप्रमाणें मानलें व आपणास कण्व-पुत्र काण्व म्हणूं लागला. पण कण्वाचा औरस पुत्र होता मेधातिथि. प्रगाथाचे वंशज जेव्हां आपणांस काण्व म्हणवूं लागले तेव्हां मेधातिथीच्या वंशजांस तें न आवडून त्यांनीं काण्वायन हें नांव धारण केलें. या काण्व वंशज क्षत्रोपेत ब्राह्मणांचीं कित्येक सूक्तें ऋग्वेदांत ग्रथित आहेत.

२२. अजमीढ–द्विमीढाच्या वेळींच कोसल देशांत ऋतुपर्णाचा प्रपौत्र मित्रसह सौदास राज्य करीत होता. याचा पुरोहित होता श्रेष्ठभाज् वसिष्ठ. यावेळीं पुन्हा एकदा राक्षसांनीं हल्ला केला होता, पण मित्रसहानें त्यांचा संहार करून चक्रवर्तीपद प्राप्त केलें. नरभक्षक याच राक्षसांपैकीं राजावर सूड उगविण्यासाठीं वेष बदलून एक राक्षस राजाचे महालांत स्वैंपाकी म्हणून राहिला. जमदग्नीनें काढलेली श्राद्धकल्पना या वेळेपर्यंत इतकी रूढ झाली होती कीं, श्राद्ध न केलें तर पितर उपाशीं राहतात व आपणांस तसें राहण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून पुत्र असणें आवश्यक होऊन बसलें होतें. तो औरस नसेल तर दत्तक

किंवा तोहि मिळत अथवा आवडत नसेल तर क्षेत्रज, पण पुत्र हा आवश्यक. मित्रासहानें पितृश्राद्धाचे दिवशीं श्रेष्ठभाज वसिष्ठास भोजनास बोलाविलें असतां त्या राक्षसानें नरमांस शिजवून वसिष्ठास वाढिलें. वसिष्ठ श्रेष्ठभाज् रागावला व राजास दण्ड देण्यास उद्युक्त झाला. मित्रसहानें क्षमाहि मागितली व त्यावरोबर दण्डहि. कांहीं दिवस राजानें दण्डकारण्यांत राहावें ही शिक्षा दिली गेली. तेथेंच राहात असतां राजाचे पायास कांहीं होऊन ते काळे पडले व यास वेड लागलें. वेडाच्याच भरांत यानें एका वसिष्ठ ब्राह्मणपुत्रास मारून टाकलें. राजा याप्रमाणें वेडा झाल्यावर मित्रसहपत्नी मदयंतीच्या ठिकाणीं श्रेष्ठभाजानें एक क्षेत्रज पुत्र निर्माण केला. याचें नांव अश्मक. वसिष्ठ या अश्मकाचे नांवानें राज्य चालवूं लागला. बारा वर्षांनंतर राजाचें वेड नाहींसें झालें पण काळे पाय पडलेला व म्हणून कल्माषपाद म्हणविला जाणारा मित्रसह परत आला. सारी हकीगत कळल्यावर यानें कोसल राज्याचे दोन भाग केले. एक ठेवला आपल्याकडे व दुसरा दिला अश्मकास. हे दोन भाग जवळ जवळ पांच पिढ्या चालले.

२३. हत्तींचा समावेश फौजेंत झाल्यामुळें रथांचें महत्त्व थोडें कमी झालें. हत्तीवरची स्वारी डौलाच्या दृष्टीनें जरी चांगली असली तरी रक्षण किंवा सोय या दृष्टीनें रथच जास्त उपयुक्त होते. प्रश्न होता हत्तीसारख्या धुडापुढें रथ दुर्लक्षित होण्याचा. यासाठीं काशीच्या राजांनीं रथावर केतु म्हणजे ध्वज लावण्याची प्रथा काढिली. केतुमन्त, सुकेतु, धर्मकेतु, सत्यकेतु अशीं क्रमानें नांवें काशिराजांनीं धारण केलीं ही गोष्ट केतुप्रथेचीच द्योतक आहे. रथविद्येस आणखी विविधता देऊन पौरस्त्य आनवांनींहि दिविरथ, धर्मरथ, विचित्ररथ व सत्यरथ अशीं नांवें घेतलीं. याच सुमारास तृणबिंदुनामक वैशाली राजाच्या मुलानें एक नगरी वसवून आपली राजधानी तेथें नेली. या मुलाचें नांव विशाल व नगरीचें नांव विशाला.

२४. याप्रमाणें या कालखंडांत नवे नवे देश ठाऊक झाले, ब्रह्मक्षत्र संमीलनानें क्षत्रियांत पुन्हा थोडी बुद्धीची चमक दिसूं लागली, हत्ती हा फौजेचें अंग झाल्यानें व रथावर ध्वज फडकूं लागल्यानें सेनेचा डौल वाढला, नवीं नवीं शहरें वसलीं व क्षत्रोपेत ब्राह्मणांचीं नवीन गोत्रेंहि निर्माण झालीं. हा कालखंड जवळजवळ तेरा-चौदा पिढ्यांचा आहे.

☆ ☆ ☆

सर्ग पांचवा

रामराज्याकडे

१. गेल्या चार सर्गांत आपण वैवस्वतमनूपासून चौपन्न पिढ्यांचा इतिहास पाहिला. म्हणजेच आपण महाभारतपूर्व जवळ जवळ पंचेचाळीस पिढ्यांपावेतों येऊन पोंचलों. दाशरथि रामाचा काळ महाभारतपूर्व पसतीस पिढ्या आहे. या सर्गांत आपणांस जवळ जवळ दहा पिढ्यांचा इतिहास पाहावयाचा आहे.

२. वैशाली राज्याच्या विशाल नामक राजानें नवीनच विशाला नांवाची नगरी वसवून आपली राजधानी तेथें नेल्याचें वर्णन चौथ्या सर्गाचे शेवटीं आलेंच आहे. वैशालीचें राज्य या वेळीं मोठ्या वैभवांत होतें. पश्चिमेकडून किंवा दक्षिणेकडून होणाऱ्या स्वाऱ्यांची आंच या राज्यास सर्वांत कमी लागल्यामुळें हें चांगलें समृद्ध होतें. ब्रह्मक्षत्रांचे जोडीस हळूहळू वैश्यवर्ण कसा आला हें व त्या वर्गानें वाणिज्यकर्म कसें सांभाळलें हें आपण मागें पाहिलेंच आहे. या वैश्यवर्गांत एक नवी कल्पना निघाली व ती वैशालीच्या राजांनीं अमलांत आणली. या कल्पनेमुळें समाजांत एक प्रचण्ड क्रांति घडून आली. या वैश्यांस आपल्या वाणिज्यकर्मासाठीं जी देवघेव करावी लागे तिचें साधन पूर्वी घोडे, गाई इत्यादि असे. हरिश्चंद्राच्या वेळीं शुनःशेपास विकत घेतांना त्याच्या बापास याची किंमत म्हणून हजार गाईच दिल्या गेल्या होत्या. ऋचीकानें सत्यवती मिळविण्यास अश्वधनच दिलें होतें. भूमि ही एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेतां येण्यासारखी नाहीं. पण बैल, गाई, घोडे हे नेतां येण्यासारखे असल्यामुळेंच यांस 'धन' असें नांव पडलें. धन

या संज्ञेस सर्वांत सुलभतेनें पात्र होणारें तें धान्य. पण क्रयविक्रयाचीं हीं साधनें फार दिवस टिकणारीं नसत. पशु जसे वाढत तसे कमीहि होत. धान्य तर यांहूनहि कमी काल टिके. त्यामुळें विनिमयासाठीं वैश्यवर्गास अशा वस्तूची गरज भासूं लागली कीं, जी हाताळण्यास अत्यंत सुलभ असेल, थोडी दुर्लभ असल्यामुळें बहुमूल्यहि ठरेल व कालाचा परिणाम जिच्यावर सर्वांत कमी होऊन जी कमी होणारी नसेल. अशी वस्तु म्हणजे सोनें. सोन्याचे कांहीं विविक्षित भाराचे तुकडे करून त्यांचा या देवघेवीसाठीं उपयोग होऊं लागला. हे तुकडे पुढें गोल म्हणजे साररख्याच आकाराचे व साररख्या भाराचे झाल्यामुळें यांस 'चंद्र' ही संज्ञा मिळाली. सोन्याचे हे चंद्र प्रथम विशालाच्या मुलानें पाडले व त्यांस सुंदर आकार देण्याचें काम त्याचे मुलानें केलें म्हणून या दोन राजांचीं नांवेंच हेमचंद्र व सुचंद्र अशीं पडलीं. हे चंद्र हाताळण्यास सुलभ असल्यामुळें हे मोजण्यासाठीं गणित शास्त्राचीहि वाढ झाली. आतांपावेतों दश, शत, सहस्र व अयुत एवढेच शब्द आम्हांस माहीत होते. पण आतां संख्येची गरज वाढली व प्रत्येक दशकानें वाढणाऱ्या प्रत्येक संख्येस आम्ही परार्धापावेतों नांवें दिलीं. या चंद्रांनीं व्यापारांत फार मोठी सोय झाली. वस्तुविनिमयाची जागा या चंद्रविनिमयांनीं घेतली व त्यामुळें दूरदूरच्या देशांशीं नुसत्या युद्धासाठीं नव्हे तर व्यापारासाठीं संबंध येऊं लागला.

३. विशाल राजाच्या आजाचें नांव होतें विश्रवस्. विश्रवस्चे वंशज म्हणून हे वैशालीचे राजे वैश्रवणहि म्हणविले जात. यांनीं राजाधिराज ही पदवीहि धारण केली होती. चंद्राचें साधन निघाल्यानंतर हवी असेल ती गोष्ट चंद्रांचे म्हणजे सुवर्णनाण्यांचे साह्यानें प्राप्त करून मनोरथ पूर्ण करतां येत म्हणून या चंद्रनिर्मात्यांस कामेश्वर अशीहि संज्ञा असे. मंत्रपुष्पाचे वेळीं आज म्हटल्या जाणाऱ्या एका मरुत्त राजाबद्दलच्या श्लोकाचा उल्लेख पूर्वी केलाच आहे. याच मंत्रसमूहाचा आरंभ आज जरी गद्यासारखा म्हटला जात असला तरी तो पद्यात्मकच आहे तो असाः—

राजाधिराजाय प्रसह्यसाहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे ।
स मे कामान्कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो ददातु ॥

पुढच्या एखाद्या ऋषीनें याच्याच जोडीस त्यास माहीत असलेल्या साम्राज्य,

भौज्य, स्वाराज्य, वैराज्य, पारमेष्ठ्य राज्य, माहाराज्य इत्यादि आधिपत्यमय शासनपद्धतींचें वर्णन करून शेवटीं वैशालीच्या जुन्या प्रसिद्ध मरुत्त राजा-संबंधींचा प्रचलित श्लोक घालून हा मंत्रकलाप पुरा केला आहे. यावरून या मंत्रसमूहाचा व ते रचणाऱ्यांचा वैशाली देशाशीं स्पष्ट संबंध दिसून येतो. आपणांस येथें एवढेंच ध्यानांत ठेवावयाचें कीं त्या कालीं वैशाली राज्य फार वैभवसंपन्न होतें व वैशालीचे राजे वैश्रवण म्हणजे कुबेर समजले जात.

४. सुवर्णचंद्रांत संपत्ति गोळा होऊं लागल्यामुळें इतिहासांतली दुसरी प्रवृत्तिहि सहज ध्यानीं येते. ज्या वेळीं संपन्नतेचें साधन नुसती जमीनच होती, तेव्हां असा नियम असणें योग्य होतें कीं, राज्याचे वांटे न करितां वडील मुलास सारें राज्य द्यावयाचें व इतर मुलांस अन्यत्र देश जिंकण्यास मोकळें सोडावयाचें; पण जसजशी संपत्ति थोड्या जागेंत सांठवितां येऊं लागली तसतशी ही आवश्यकता—राज्यविस्ताराची जरुरी—राहिली नाहीं. राज्याचें क्षेत्रफळ लहान असलें तरी संपन्न होतां येतें या कल्पनेमुळें राज्याचे तुकडे करावयासहि कांहीं बाटेनासें झालें. पण याचमुळें कांहीं राजे अल्पसंतुष्ट बनून निष्क्रिय झाले. अजमीढाच्याच ज्या मुलास हस्तिनापुरचें राज्य मिळालें होतें तो इतका कर्तृत्वहीन निघाला कीं, त्याच्या वंशांत दहाबारा पिढ्यांपर्यंतचें प्रसिद्ध नांवहि इतिहासकारांस नमूद करून ठेवतां आलें नाहीं. त्याच्या वंशजांत ज्यांनीं ब्राह्मणधर्म स्वीकारला त्यांचीं नांवें सांपडतात, पण हस्तिनापुरच्या राजां-चींच नांवें सांपडत नाहींत. हस्तिनापुरची जरी ही स्थिति असली तरी कांपिल्य देशांतील राजे असे कर्तृत्वहीन निघाले नाहींत. तेथल्या एका राजानें बाणाची लांबी वाढविली, त्याच्याच मुलानें बाणास अनुरूप असें मोठें धनुष्य केलें व नातवानें या बृहत् धनुर्बाणानें बृहत्कर्महि करून दाखविलें. तिसरें राज्य अहिच्छत्रा येथें होतें. तेथील राजाचें नांव भृम्यश्व. याचा मुलगा मुद्गल. मुद्गलास आणखी चार भाऊ होते. भृम्यश्वानें आपलें राज्य या पांचांत वांटून त्यांस सांगितलें कीं

"पंचानां विद्धि पंचैते स्फीता जनपदायुताः।
अलं संरक्षणे तेषां पंचाला इति विश्रुताः॥"

"हे एकमेकांस लागलेले संपन्न पांच प्रांत तुम्हां पांचांचेहि समजा. यांच्या रक्षणास पुरे असलेले तुम्ही पंचाल या नांवानें प्रसिद्ध व्हाल"

तेव्हांपासूनच त्या देशाचेंहि नांव पंचाल असेंच पडलें. मुद्गल वंशजांनीं क्षत्रोपेत ब्राह्मणधर्म स्वीकारला. ते आपणांस मौद्गल म्हणवूं लागले.

५. मुद्गलाच्या काळीं म्हणजे चाळीस पिढ्या महाभारतापूर्वी कोसल देशांत दिलीप नांवाचा राज्याधिपति होता. सगराचा वंशज व भगीरथाचा पिता जो दिलीप होता तो पहिला दिलीप. हा दिलीप दुसरा. याला खट्वांग अशी उपाधि होती. याच वेळचा शाण्डिल्य काश्यप. हा दिलीपाच्या एका यज्ञांत एक ऋत्विज होता. मुख्य ऋत्विज मात्र वसिष्ठच होता. यानेंहि अथर्वमंत्र एकत्र केले असल्यानें यास दुसरा अथर्वनिधि असें नांव होतें. या वसिष्ठानेंच दिलीपास गोसेवेची दीक्षा दिली व याच वसिष्ठाचे व दिलीपाचे संबंध नीट जमल्यामुळें पांच पिढ्यांपूर्वी विभक्त झालेला कोसल देश पुन्हा एकत्र झाला. दिलीपानेंहि आणखी स्वारी करून थोडा देश आपलासा केला व चक्रवर्तिपद धारण केलें. हा इतका प्रसिद्ध असतांनाहि याच्या वेळच्या इतर लहान लहान राजांचीं नांवें वैदिक सूक्तांत असतांना याचें नांव सांपडत नाहीं, ही थोडी आश्चर्याची गोष्ट आहे, असें पुष्कळांस वाटतें. पण याचें कारण अगदीं स्पष्ट आहे. विश्वामित्रापासूनचे मंत्ररचना करणारे ऋषि कोसल देशाच्या पश्चिमेकडे किंवा अगदीं पूर्वेकडे राहणारे होते. वसिष्ठ वंशज जरी मंत्र गोळा करीत तरी ते अजून मंत्ररचना करूं लागले नव्हते. यामुळें दिलीपसमकालीन पौरव किंवा पांचाल राजांचीं नांवें जरी वैदिक सूक्तांत आलीं तरी कोशल व विदेह राजांचीं नांवें सांपडत नाहींत.

६. वैदिक सूक्तांत बहुधा काण्वांच्या रचनेंत राजविषयक उल्लेख बरेच सांपडतात व त्याचमुळें ऐतिहासिकदृष्ट्या हीं सूक्तें महत्त्वाचीं मानलीं जातात. ज्या राजांकडून काण्वांस मोठमोठीं दानें मुख्यतः मिळालीं त्यांचींच नांवें या सूक्तांतून येणें स्वाभाविकच आहे. प्रगाथ काण्वाच्या एका सूक्तांत दुर्गह नांवाच्या एका राजाच्या नातवाचें वर्णन आहे. याचें नांव त्रसदस्यु व याच्या पित्याचें नांव पुरुकुत्स. पण हे पितापुत्र व अयोध्येच्या राजकुलांतील मांधात्याचा मुलगा पुरुकुत्स व नातू त्रसदस्यु हे एक नसून अगदीं भिन्न आहेत. या दोन वापलेकांच्या जोड्यांत जवळजवळ चाळीस पिढ्यांचें अंतर आहे. सूक्तकार त्रसदस्यु मांधातृपौत्र नसून क्षत्रोपेत ब्राह्मण कुलांतील आहे. सूक्तकार त्रसदस्यूच्या वेळेसच पांचाल देशांत एक राजा झाला ज्यानें घोडे

खची करावयास आरंभ केल्यावरून त्याचें नांव वध्रयश्व असें पडलें. या वध्रयश्वाचा मुलगा दिवोदास; संजय कुलांतला प्रस्तोक, काण्व सोभरि आणि त्रसदस्यु हे ऋग्वेद सूक्तांवरून समकालीन ठरतात. याच ऋषींच्या साह्यानें त्रसदस्यु कुलांतील एकानें अश्वमेधविधि परिपूर्ण केला. या अश्वमेधरचनाकाराचा मुलगा पूतक्रतु व पौत्र दस्यवेवृक आणि दिवोदासाचा इंद्रोत याचे उल्लेखहि ऋग्वेदांत सांपडतात. त्रसदस्यु संभूत एका मुलानें ब्राह्मणधर्म स्वीकारला. विष्णुवृद्ध गोत्राचे ब्राह्मण याचेच वंशज.

७. कोसल देशांत दुसरा दिलीप राज्य करीत असतां यादवकुलांत एक मधु नांवाचा राजा प्रसिद्ध झाला. यादवांचीं जीं लहान लहान राज्यें विखुरलेलीं होतीं तीं सारीं यानें एकत्र केलीं व आनर्तापासून यमुनेपर्यंतचा सारा देश आपल्या आधीन केला. यमुनातीरावर मधुरा नांवाची एक मनोरम नगरी यानें वसविली व तेथें आपली राजधानी स्थापिली. चर्मण्वतीजवळ दशपूर नगरींत जें लहानसें राज्य रंतिदेवानें स्थापिलें होतें तेंहि यानें स्वतःच्या राज्यांत विलीन करून टाकिलें व चक्रवर्तिपद धारण केलें. हा वंशकरहि होता. याचे पश्चात् यादव आपणांस माधवहि म्हणूं लागले. याप्रमाणें यमुनेच्या पूर्वेस अयोध्या व पश्चिमेस मधुरा या दोन्ही राजधान्या दिलीपाच्या काळीं भरभराटींत होत्या. याच काळाचे शेवटीं शेवटीं दक्षिण पांचाल देशांत एक नवीन यज्ञाची पद्धति निर्माण झाली. ही करणाऱ्यानें दिग्विजय करावा व यज्ञ झाल्यानंतर सर्वस्व दान करावें ही मुख्य गोष्ट होती. दिलीपाचा मुलगा दीर्घबाहु असें नांव धारण करणारा होता, पण हा अल्पायुषी असल्यानें दिलीपानंतर प्रसिद्ध झाला. दिलीपचा नातू रघु.

८. रघुराजा फार पराक्रमी होता. यानें आसपासचे सारे राजे अंकित करून दिग्विजय केला व सर्वस्वदक्षिण विश्वजित् यज्ञहि केला. दिग्विजयापेक्षां साऱ्या राजेलोकांवर याच्या सर्वस्वदानाचा प्रभाव फार पडला. इतकां कीं, सर्वस्व दान दिल्यावर कुत्स आंगिरस् कुलांतला एक ब्राह्मण आपल्या वरतंतु नांवाच्या गुरूसाठीं चौदा कोटि चंद्र मागण्यासाठीं जेव्हां रघूकडे आला व रघूनें आपली अपकीर्ति टाळण्यासाठीं जेव्हां वैशलीच्या वैश्रवणावरच स्वारी करावयाचें ठरविलें तेव्हां त्या वेळच्या प्रमतिवैश्रवणानें नुसते चौदा कोटि चंद्रच नव्हे तर आपलें सारें राज्य रघूस देऊन टाकिलें. प्रमति

पुष्कळ दिवस म्हणजे दशरथाच्या राज्यकालाचे आरंभापयत जगला. पण वैशालीचें राज्य जें कोशल देशांत विलीन झालें तें झालेंच. यादव मधू-प्रमाणेंच रघुहि वंशकर होता, म्हणजे याचे वंशज आपणांस राघव म्हणवीत. इक्ष्वाकुवंशांत इक्ष्वाकु व ककुत्स्थ यानंतर वंशकर्ता रघुच झाला. हाहि चक्र-वर्ती होता.

९. रघूचा मुलगा अज. धनुर्विद्या, हत्तीस वश करण्याची विद्या, राज-विद्या इत्यादि साऱ्या विद्या हा बापाजवळूनच शिकला. विदर्भ देशची राज-कन्या इंदुमती हिनें स्वयंवरांत यास पसंत करून वरमाला याच्याच गळयांत घातली. पण दैवयोगानें ही फार दिवस जगली नाहीं. राजास फार शोक झाला. महाकवि कालिदासानें या तीन ऐतिहासिक राजांची कीर्ति अमर करून ठेविली आहे. अजाच्या समकालीन असलेल्या दिवोदासाचा व प्रस्तोकाचा उल्लेख पूर्वी आलाच आहे. याच प्रस्तोकास भरद्वाज गोत्रांतल्या पायुनामक ऋषीनें एक विजय मिळवून देण्यांत मदत केली होती. अत्रि-कुलांतील अर्चनानस् ऋषिहि याच काळांतला. याचाच मुलगा श्यावाश्व. याच्याच सूक्तांत त्रसदस्यूचा उल्लेख असल्यानें यांचा काल पूर्णपणें निश्चित केला जाऊं शकतो. दिवोदासाचा इंद्रोत मुलगा आणि त्याचा भाऊ मित्रयु राजा झाला. मित्रयूचे ब्राह्मणवंशज मैत्रेय नांवानें प्रसिद्ध आहेत. सोमयागाचा यांनीं विधि वाढवून त्यांत केशवपनास जागा दिली. या विधींत क्षुराचा उपयोग यांनींच प्रथम केला. त्याचप्रमाणें जटांचा केशसंभार काढून त्याऐवजीं नुसती शेंडीच ठेवण्याची पद्धति मैत्रेयांनींच सुरू केली. त्यामुळें 'दक्षिणतः कपर्दावसिष्ठाः' इत्यादि लक्षणें सुटून सुटसुटीत शेंडी सर्वच ब्राह्मण ठेवूं लागले. पण याच मैत्रेयांचे संबंधी जे मौद्गल ब्राह्मण होते त्यांनीं शेंडीहि काढून टाकिली व नुसताच गोटा ठेवण्यास आरंभ केला. याची स्मृति म्हणून आजहि मुद्गल गोत्री बटूची मुंज करावयाच्या वेळेस त्याचे डोक्यावर शेंडी ठेवीत नाहींत.

१०. अजानंतर त्याचा मुलगा दशरथ गादीवर बसला. रामाचा पिता या नात्यानें रामचरित्र समजण्यापूर्वी यावेळची परिस्थिति पाहणें उपयुक्त होईल. यादवांचें प्रबल राज्य यमुनेच्या पश्चिमेस विंध्यापर्यंत पसरलें होतें आणि दशरथाच्या वेळीं तेथें मधूचा प्रपौत्र अंशुमाधव राज्य करीत होता. पंचाल देशाचे दोन तुकडे होऊन उत्तर पांचालांत मित्रयु व दक्षिण पांचालांत

पृथुश्रेण राज्य करीत होता. काशींत धृष्टकेतूचें राज्य होतें व अंगदेशचा अधिपति लोमपाद होता. वैशालीचा शेवटचा राजा प्रमति दशरथाचे राज्यकालीं जिवंत होता. विदेह देशचे राजे शांतिप्रिय असल्याचें मागें सांगितलेंच आहे. यांच्या प्रजापालनप्रसिद्धीमुळें हे सारेच 'जनक' म्हणविले जात. रथध्वजावर बोधचिह्न लावण्याची प्रथा सुरू झाली तेव्हां या राजांनीं आपल्या ध्वजावर नांगर तें चिन्ह ठेवलें. दोहोंहून अधिक बैल लावून नांगरटी या प्रांतांत होत असे. ही बैल जुंपण्याची संख्या बारापर्यंत गेली होती. द्वादशगव खीर म्हणजे बारा बैलांचा नांगर ऋत्विजास दक्षिणा म्हणून दिला जाई. यामुळें नांगरटी खूप खोल होई हें सांगावयास नकोच. अशाच एका खोल नांगरटीच्या वेळीं नांगरानें पडणाऱ्या सीतांत म्हणजे फाळणांत, जी कोणत्या योनींत जन्माला आली आहे हें माहीत नसलेली एक मुलगी सीरध्वज जनकास सांपडली. जनकानें औरस मुलीप्रमाणेंच तिचें पालनपोषण केलें व सीतांत सांपडल्यामुळें तिचें नांव सीता ठेवलें. विदेहाच्या पूर्वेस अंग व पौरस्त्य आनवांचें राज्य होतें. पंचनदांत केकय, सिंधु व सुवीर हीं राज्य होतीं व दक्षिणेस विदर्भाचें राज्य होतें. उत्तरेस हिमाचलाच्या पायथ्याशीं ऋषींचेच आश्रम होते. कौशिकी म्हणजे सध्यांची कोसी, हिच्या पूर्वतीरावर विश्वामित्राचे वंशजांचा आश्रम होता तर पश्चिम तीरावर भार्गव वाल्मिकीचे गोत्रज राहात होते. कश्यपकुलांतील ऋष्यशृंग व रेभ आणि अत्रिकुलांतील अर्चनानस व श्यावाश्व याहि ऋषींचे आश्रम याच भागांत होते.

११. या परिस्थितींत दशरथ राज्य करीत होता. उतारवय होईपावेतों यास मुलें झालीं नाहींत. पुत्र असण्याची आवश्यकता क्षेत्रज पुत्र करविण्यापर्यंत पोंचली होती हें मागें सांगितलेंच आहे. पण क्षेत्रज पुत्रासाठीं स्त्रीची अनुमति नेहमीं मिळतच असे असें नाहीं. त्यामुळें पुत्राची जागा दौहित्रानें किंवा मुलगीहि नसल्यास एखाद्या मुलीस पुत्रिका मानून तिच्या मुलाकडूनहि पुरी केली जात असे. निपुत्रिक दशरथानें आनव अंगराज लोमपादाच्या शांता नांवाचे मुलीस पुत्रिका मानलें होतें. पण वसिष्ठानें त्याच शांतेच्या पतीस—प्रसिद्ध ऋष्यशृंगास-ऋत्विज करून पुत्रकामेष्टि नांवाचा यज्ञ करविला. यज्ञ सफल झाला व दशरथास आपल्या तीन राण्यांपासून चार

मुलें झालीं. कौसल्येच्या मुलाचें नांव राम, सुमित्रेस जें जुळें झालें त्यांचीं नांवें लक्ष्मण व शत्रुघ्न आणि कैकेयीस जो मुलगा झाला त्याचें नांव भरत ठेविलें गेलें. दशरथाच्या राजवाड्यांत चार मुलें खेळूं लागलीं.

१२. रामाचा इतिहास सांगण्यापूर्वी रामायण या ग्रंथाचा थोडा विचार करणें आवश्यक आहे. कारण या ग्रंथाचा प्रभाव भारतीय जनमनावर इतका पडलेला आहे कीं, त्याविरुद्ध एक शब्दहि काढणें कठीण आहे. पण तरीहि या विषयांत दोन गोष्टी सांगणें आवश्यक आहे. ध्यानांत ठेवण्यासारखी पहिली गोष्ट ही कीं, रामायण हा इतिहासग्रंथ नसून काव्यग्रंथ आहे. तें आदि-काव्यहि आहे आणि अमर काव्यहि आहे. तें वाचणारे व त्याचा अर्थ नीट समजून मनन करणारे मानव जोंपर्यंत भूतलावर राहतील तोंपर्यंत त्यांतील सिद्धान्त त्यांचे जीवनास चांगलें वळण लावतील यांत तिळमात्र संदेह नाहीं. पण सरते शेवटीं हें विसरून चालणार नाहीं कीं, तें इतिहासरूप नसून काव्य-स्वरूपांत आहे. येथें काव्य व इतिहासांतील भेद ध्यानांत ठेवला पाहिजे. इतिहास असें व या क्रमानें घडलें हें सांगतो. तो वास्तवताप्रधान असतो. काव्याचा हेतु नुसती वास्तवता दाखविणें नसतें. तें कल्पनाप्रधान असतें. कोणतीहि गोष्ट कशी होती हें सांगण्यापेक्षां कवि ती कशी असावी, हें आपल्या कल्पनेनें सांगत असतो. अर्थात् काव्य कितीहि चांगलें असलें तरी तें इतिहास होऊं शकत नाहीं. काव्य हें इतिहासावर थोडेंफार आधारलेलें असेल किंवा नसेलहि. पण इतिहास मात्र काव्याच्या आधारावर लिहितां येतच नाहीं. काव्य हें इतिहासाचा आधार होऊं शकत नाहीं. शेक्सपीयरचें जुलियस सीझर किती का चांगलें असेना, तें रोमन सम्राट् सीझरचा इतिहास लिहितांना आधारभूत होऊं शकत नाहीं.

१३. दुसरी गोष्ट अशी कीं, आज ज्या स्वरूपांत रामायणग्रंथ आमच्या पुढें आहे, तें त्याचें मूळस्वरूप नव्हे. श्रीराम जिवंत असतां ज्या भार्गव वाल्मीकीच्या आश्रमांत सीतेस दोन मुलें झालीं व ज्यांना त्यांची पूर्वमाहिती देण्यासाठीं त्या भार्गव वाल्मीकीनें जें काव्य रचिलें त्याचें स्वरूप कांहीं निराळेंच असलें पाहिजे. रामानंतर पसतीस पिढ्यांचा काळ लोटल्यावर महाभारत युद्ध झालें. याचा जय नांवाचा इतिहास व्यासानें भारत या सदरा-खालीं लिहिला. यांत बरीचशी भर पडून त्याचें महाभारत झालें. भारत व

महाभारत हे दोन निरनिराळे ग्रंथ होते ही गोष्ट आमच्या स्मृतींतून जाऊं नये म्हणून आमच्या पूर्वाचार्यांनीं नित्यतर्पणांत 'सुमंतुजैमिनिवैशंपायनपैल-सूत्रभाष्यभारतमहाभारतधर्माचार्यास्तृप्यन्तु' येथें भारत व महाभारत असे दोन निरनिराळे ग्रंथोल्लेख करूनच ठेविले आहेत. हल्लींचा रामायण ग्रंथ जो प्राचेतस वाल्मीकीनें रचिला आहे तो या महाभारत ग्रंथाचेहि नंतर लिहिलेला आहे, हें त्याची भाषा व त्यांत जे उल्लेख आले आहेत त्यावरून स्पष्ट आहे. रामाची कथा पुराणांतूनहि सांपडते पण ती या रामायणाहून थोडी निराळी व इतकी विस्तृत सांपडत नाहीं. पद्मपुराणकार तर त्यांत दिलेल्या रामायणास पुरातन रामायण म्हणतात. यावरूनहि असें म्हणतां येईल कीं, वर्तमान रामायण पुरातन नसून नवीन आहे. महाभारत रचणारे कवि महाभारतास पांचवा वेदच म्हणतात, पण हें रामायण लिहि-णारा रामायणास वेद न म्हणतां वेदतुल्य म्हणतो हीहि गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

१४. तिसरी ध्यानांत ठेवावयाची गोष्ट अशी कीं, आम्ही श्रीरामास नुसती ऐतिहासिक व्यक्ति न मानतां प्रत्यक्ष परमेश्वरच समजतों. परमेश्वर म्हटला कीं तो मग कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं समर्थ समजला जातो व मग त्याचे बाबतींत मानुष, अमानुष, अतिमानुष साऱ्याच गोष्टी संभवूं शकतात. पण इतिहास या दृष्टीनें विचार करूं लागलें म्हणजे त्या खऱ्या धरितां येत नाहींत. मी मातृभक्त आहें, देशभक्त आहें व श्रीरामभक्तहि आहें असें मी निश्चितपणें समजतों. पण भक्ति ही भावना आहे, कल्पना आहे. तिचा विचार करितांना वास्तवतेकडे लक्ष्य द्यावयाचें नसतें, नव्हे तें तसें दिलेंच जाऊं शकत नाहीं. पण इतिहास ही वस्तुस्थिति आहे. तेथें भावनेचा विचार करतां कामा नये. माझी आई मला अत्यंत पूज्य वाटते, माझा देश मी सर्व-श्रेष्ठ समजतों व माझा ईश्वर—माझा राम मी सर्वसमर्थ मानतों. पण ही मानण्याची गोष्ट झाली. बीजगणिताचें उदाहरण सोडवितांना मी उत्तर 'क्ष' आहें असें मानून चालतों, त्या 'क्ष' वरच सारे गणितसंस्कार करितों व शेवटीं त्यामुळें मला खरें उत्तरहि मिळतें. पण तरी तो 'क्ष' म्हणजे खरें उत्तर होत नाहीं. माझी आई मला जरी कितीहि सुंदर वाटली तरी ती तशी नसते, माझा देश मला किती जरी चांगला वाटला तरी तो खरोखर तसा

होत नाहीं, त्याचप्रमाणें माझा राम असंभाव्य गोष्टी करणारा मला वाटला तरी राम ही ऐतिहासिक व्यक्ति तशी होऊं शकत नाहीं. कुठल्याहि गोष्टीकडे पाहण्याच्या या दोन अगदीं भिन्न दृष्टि आहेत व त्यांची गल्लत करतां कामा नये. ही गोष्ट ध्यानांत ठेवून व रामचरित्रांतल्या असंभाव्य व तर्कास न पटणाऱ्या गोष्टी बाजूस सारूनच रामाचा इतिहास पाहिला पाहिजे व तसाच तो पाहण्याचा प्रयत्न येथें केला गेला आहे.

१५. राम लहान असतांनाच वैशालीच्या राजहीन प्रांतांतून कौशिकी तीरावर असलेल्या एका विश्वामित्रवंशजास जनस्थानच्या दक्षिणेस कांहीं राक्षसांनीं त्रास द्यावयास सुरुवात केली होती. या त्रासांतून सुटका व्हावी म्हणून तत्कालीन विश्वामित्र दशरथाकडे मदत मागण्यास गेला. तेथें राम-लक्ष्मणाची जोडी त्याच्या नजरेस पडली. या तेजःपुंज राजकुमारांस पाहतांच आपल्या घराण्यांत प्राचीन काळापासून चालत आलेली धनुर्विद्या व अस्त्रविद्या शिकवून यांस तयार करावें व यांकडून पुन्हा डोकें वर करणाऱ्या राक्षसांचा नाश करवावा अशी आचार्यस्वभावसुलभ इच्छा त्या विश्वामित्र ऋषीस झाली व त्यानें त्या जोडीस विद्या शिकवून तयार करण्यासाठीं दशरथापासून मागून घेतलें. अनायासें असा आचार्य मिळत आहे हें पाहून तत्कालीन वसिष्ठ पुरोहिताच्या अनुमतीनें दशरथ राजानें दोन्ही राजकुमार विश्वामित्राचे स्वाधीन केले. विश्वामित्रानें त्यांस शस्त्रास्त्रविद्येंत निपुण करवून त्यांकरवीं प्रथम ताडका नांवाच्या एका राक्षसीचा वध करविला व मग सुबाहु व मारीच या राक्षसांस पळवून लाविलें.

१६. सीरध्वज जनकास नांगरटीच्या वेळीं सीता सांपडल्याची कथा मागें आलीच आहे. सांगण्याचे ओघांत ती जरी रामजन्माचे पूर्वी सांगितली असली तरी तिचा काल रामजन्मानंतरचा आहे. जनकास सीत सांपडल्यानंतर एक औरस मुलगी झाली व त्याच्या भावासहि दोन मुलीच झाल्या. राम-लक्ष्मण विद्यासंपन्न होऊन तारुण्यांत पदार्पण करीत होते. तेव्हांच या चारी मुलीहि उपवर झाल्या होत्या. सीतास्वयंवर हा शब्द जरी इतिहासांत रूढ असला तरी तें स्वयंवर नव्हतें म्हणजे सीतेस पति हवा तो निवडण्याची मोकळीक नव्हती. त्याऐवजीं क्षत्रियांत एक निराळीच प्रथा रूढ होत चालली होती. युद्धें कमी झाल्यामुळें राजकुमारांचे पराक्रम

उघड उघड दिसतनासे झाले होते म्हणून म्हणा किंवा मुलींस वर निवडावयाची मोकळीक दिल्यामुळें त्यांचे हातून नुसत्या बाह्यस्वरूपावर भाळून पति निवडल्यानें कांहीं वाईट परिणाम झाले असतील म्हणून म्हणा, ही नवी प्रथा अस्तित्वांत आली होती. या प्रथेप्रमाणें मुलीच्या पालकानें कांहींतरी अचाट पराक्रमाचें कृत्य ठरवावयाचें व जो तें कृत्य करील त्यास मुलगी द्यावयाची असें होत असे. जनक सीरध्वजाचे येथें एक त्र्यंबक म्हणजे तीन डोळ्यांचें त्रिवक्रधनुष्य होतें. हें फार जुनें, लोखंडी व जड होतें. यास प्रत्यंचा चढविण्याचें काम जो कोणी करील त्यास सीता द्यावयाची हें जनकानें जाहीर केलें होतें. अशा गोष्टी जशा शक्तीनें होतात, तशा युक्तीनेंहि होतात. आपण शिकवून तयार केलेल्या रामाची परीक्षा घेण्याचें हें चांगलें साधन आहे असें पाहून विश्वामित्रानें रामलक्ष्मणास घेऊन जनकाकडे जाण्याचें ठरविलें.

१७. कौशिकी तीरावरील विश्वामित्राश्रमांतून विदेह राजाच्या मिथिला नगरीस जात असतांना वाटेंत एका गौतमवंशीय ऋषीचा आश्रम होता. मागें सांगितलेल्या वध्र्यश्वाची मुलगी व दिवोदासाची बहीण अहल्या ही या गौतमऋषीला दिलेली होती व तिच्या हातून झालेल्या कांहीं अज्ञात कुकर्मामुळें त्या गौतमानें तिला शिलावत् सोडून दिली होती. विश्वामित्रासह त्यानें तयार केलेले व राक्षसांचा पराभव केल्यानें ब्राह्मण वर्गावर उपकार करणारे हे दोन कुमार व विशेषतः राम यांचे पाय आपल्या आश्रमास लागणार या आनंदांत गौतम तेथें आला व रामाचे पाय लागल्यानें त्यानें शिळेसारख्या टाकून दिलेल्या अहल्येचा पुनः स्वीकार केला. याप्रमाणें अहल्येचा उद्धार करून हे तिघेहि जनकपुरास आले. रामानें तें धनुष्य पाहिलें व ज्या दोन लोखंडी वांकड्या कांबींचें तें धनुष्य घडलें होतें त्याचे मध्यावरचा सांधा निखळतांच त्याचे दोन निरनिराळे तुकडे दूर दूर झाले व प्रत्यंचा चढविण्याचें कारणच पडलें नाहीं. सीतेच्या भाग्यानें हें काम रामाचे हातून झालें म्हणून बरें, नाहीं तर बिचारीस तें काम करणाऱ्या एखाद्या आडदांड माणसाचे पदरींच पडावयाचा प्रसंग प्राप्त व्हावयाचा. जनकानें सीता तर आतां रामास देण्याचें काम केलेंच, पण त्याबरोबरच आणखीहि तिघींस म्हणजे उर्मिला, मांडवी व श्रुतकीर्ति यांस अनुक्रमें लक्ष्मण, भरत व

शत्रुघ्नास देण्याचें ठरविलें. कोसलाधीश दशरथ विदेहांत आला व मोठ्या थाटानें चारी मुलांचे विवाहविधि उरकून परत अयोध्येस गेला.

१८. दशरथानें रामास यौवराज्याभिषेक करण्याचें ठरविलें. यावेळीं भरत व शत्रुघ्न आपल्या मामाच्या घरीं केकय देशांत होते. या परिस्थितीचा फायदा घेऊन कैकेयीच्या मंथरानामक दासीनें कैकेयीचें मन कलुषित केलें व कित्येक दिवसांपूर्वी राजानें दिलेल्या वचनास अनुसरून दोन वर मागून घेतले. एकानें रामास वनवास व दुसऱ्यानें भरतास यौवराज्य. सत्यसंध दशरथानें दोनहि आज्ञा दिल्या. राम आणि त्याबरोबर सीता आणि लक्ष्मण वनवासासाठीं दण्डकारण्याकडे निघून गेले. या शोकाचे आघातानें दशरथ मूर्च्छित झाला व भरत आणि शत्रुघ्न परत येण्यापूर्वीच चार पुत्र असतांना एकहि जवळ नसतां स्वर्गवासी झाला. राम प्रयागमार्गानें दण्डकारण्यसीमेवर असलेल्या चित्रकूट पर्वतावर बरेच दिवस राहिला. भरतानें परत आल्यावर चित्रकूटास येऊन रामास विनविलें, पण रामानें न ऐकल्यामुळें स्वतः राज्यस्वीकार न करितां नंदिग्रामीं कोसलदेशच्या सीमेवर राहून रामाच्या नांवानें ज्या चौदा वर्षांचा वनवासकाल आईनें मागून घेतला होता, त्या कालांत राज्यकारभार चालविला. चित्रकूटाहून राम, लक्ष्मण व सीता जनस्थानाजवळ पंचवटीस आले व रामानें तेथें राहून जनस्थानांतील राक्षसांचा संहार केला.

१९. ही बातमी राक्षसराज रावणास समजली. रावण म्हणजे राजा हें पूर्वी सांगितलेलेंच आहे. या रावणाचें व्यक्तिनाम दशानन होतें. या नांवावरून कवींनीं त्यास खरोखरच दहा तोंडांचा करून टाकिलें. पण आपणांस तसें करण्याची आवश्यकता नाहीं. आज एक, उद्यां दुसरें, असें बोलणाऱ्यांस आपण दुतोंड्या म्हणतों, म्हणजे त्यास खरींच दोन तोंडें होत नाहींत. सिंहास पंचानन असा शब्द आहे, यावरून त्यास पांच तोंडें असतात असें आपण मानीत नाहीं. त्याचप्रमाणें दशानन या शब्दावरून त्यास दहा तोंडें होतीं, असें मानण्याचें कारण नाहीं. दशाननाची राजधानी लंकेंत होती. ज्या भाषेंतील ईरैवण शब्दापासून रावण शब्द झाला त्याच भाषेंत इलंकार शब्द समुद्रीय द्वीपाचा वाचक आहे. यावरून लंकेचा रावण म्हणजे समुद्रीय वेटांचा राजा असा अर्थ निघतो. दशानन पंचवटींत येऊन रामलक्ष्मण नसतांना सीतेस घेऊन गेला व त्यानें तिला लंकेंत नेऊन ठेविलें. राम व लक्ष्मण

तिच्या शोधासाठीं दक्षिण दिशेकडे निघाले.

२०. रामाच्या कालापर्यंतचा जो इतिहास आपणांस ठाऊक आहे त्यांत ज्या प्रांतांचें वर्णन आहे ते सारे जनस्थानाच्या उत्तरेस होते. जनस्थानाच्या दक्षिण भूभागाची माहिती रामाच्या कालांतच आपणांस होते. राक्षसांचें व त्यांच्या संस्कृतीचें वर्णन मागें दिलेंच आहे; पण राम व लक्ष्मण जेव्हां पंचवटींतून निघून दक्षिणेस वळले तेव्हां त्यांचा एका निराळ्या प्रकारच्या लोकांशीं संबंध आला. हे म्हणजे वानर. वानर हा शब्द अवनर शब्दापासून झाला असावा. अवनर म्हणजे थोडा कमी प्रकारचा माणूस. संस्कृत भाषेंत 'अव' याच्या 'अ' चा लोप होतोच. तो झाल्यामुळें अवनर शब्दाचा वनर शब्द झाला व त्यापासून वानर शब्द बनला असावा. हे लोक जनस्थानाच्या दक्षिणेस व पश्चिमेस राहात होते. यांची राजधानी किष्किंधा होती व ती पंपा सरोवर व प्रस्रवण पर्वत यांच्या जवळ होती. या लोकांचीहि एक संस्कृति होती. यांचें राज्य होतें, दुर्ग होते, भाषा होती, फौजहि होती. मानव संस्कृतीपेक्षां ही वानरसंस्कृति दोन गोष्टींत भिन्न. राक्षस हे मांसभक्षक असून क्वचित् नरमांसहि खात, पण हे वानर मात्र पूर्णपणें शाकाहारी होते. कृषि मात्र या दोन्ही संस्कृतींत नव्हती. राक्षसांत जसे कांहीं संस्कृत भाषा जाणणारे होते तसे क्वचित् वानरांतहि होते. फौज असली तरी वानर लोकांजवळ शस्त्रास्त्रें नव्हतीं. झाडाचीं लाकडें व दगड हींच यांचीं आयुधें. अगदीं हातघाईवर आले तर मुष्टियुद्ध. यांचा दुसरा विशेष म्हणजे हे वस्त्रें फारशीं वापरीत नसत. शरीर झांकण्यापुरती लंगोटी लावावयाची व तिचा एक सोगा पाठीमागें शेपटीसारखा सोडून द्यावयाचा. यांच्या वालि नांवाच्या राजानें तर एकदा दशानन रावणाचाहि मुष्टियुद्धांत पराभव केला होता. याच वालीनें आपल्या सुग्रीव नांवाच्या धाकट्या भावास राज्यांतून काढून दिलें होतें. सुग्रीवाचा एक सचिव हनुमान नांवाचा होता. त्यानें रामाची व सुग्रीवाची मैत्री जमवून दिली. सीता लंकेंत आहे हा शोध काढला व लंकेवर स्वारी करण्यासाठीं फौज गोळा केली. रामानें इकडे सुग्रीवाचा पक्ष घेऊन वालीस मारलें व किष्किंधेचें राज्य सुग्रीवास मिळवून दिलें. या नरसेनेस बरोबर घेऊन राम समुद्रतीराबर आला.

२१. रामेश्वराची स्थापना येथेंच झाली. रावणाचा पक्ष सोडून बिभीषण

येथेंच रामास येऊन मिळाला. भरतीच्या वेळीं न दिसणारे पण ओहोटीच्या वेळीं ध्यानांत येणारे खडक शोधून त्यावरून सारी सेना लंकेंत पोंचली. रामानें रावणास व त्याच्या सर्व मोठमोठ्या लोकांस मारून लंकेचें राज्य विभीषणास दिलें व सीतेसह मुख्य मुख्य राक्षसांस व वानरांस घेऊन राम परत आला. भरताशीं भेट होऊन भरतानें सारें राज्य रामाच्या स्वाधीन केलें व रामास राज्याभिषेक करविला. कांहीं दिवसांनीं रामास लोकापवादासाठीं गरोदर असलेल्या सीतेचाहि त्याग करावा लागला. वाल्मीकीच्या आश्रमांत वनांत सोडलेल्या सीतेस आश्रय मिळाला व तेथेंच लव आणि कुश या जुळया मुलांस तिनें जन्म दिला. वाल्मीकीनें रामायणाची रचना करून या मुलांस शिकविली व यांस रामाकडे पाठविलें. रामानें मुलांचा स्वीकार केला व बरींच वर्षें राज्य केलें. सीता मात्र जन्मास कशी आली हें कुणास समजलें नाहीं. तसेंच तिच्या जीविताचा अंत कसा झाला हेंहि कुणास समजलें नाहीं. भूगर्भांतून जशी ती आली तशीच भूगर्भांत सामावली. सीता व रामाचा हा असा इतिहास आहे.

२२. रामानें पुष्कळ वर्षें राज्य केलें. या वर्षांत जेव्हां यादवांचा सत्वत् नांवाचा राजा राज्य करीत होता, तेव्हां लवणमाधवानें प्रजेस पीडण्यास आरंभ केला. रामाजवळ साह्य मागितलें गेलें. लक्ष्मण व भरत आपल्या भ्रातृप्रेमामुळें प्रसिद्ध झालेच होते. राहिला होता शत्रुघ्न. त्याला मात्र अजून विशेष कांहीं करून दाखवितां आलें नव्हतें. रामानें त्याचें नांव अन्वर्थक करण्याच्या इच्छेनें या मोहिमेवर त्यासच पाठविलें. त्यानें लवणावर चढाई करून त्याचा नाश केला व मधुरा नगरीस त्याचे जाचांतून सोडविलें. लवणाच्या भीतीनें सत्वत् आधींच पळून गेला होता. तेव्हां रामानें यादवराज्यहि आपल्या अंकित केलें. केकय, सिंधु, सुवीर हे देश भरताच्या मामाचे म्हणून हेहि कांहीं दिवस कोसलाचेच अंकित होते. याप्रमाणें रामराज्यांत अनार्तापासून अंगादि देशापर्यंत व पंचनदापासून दक्षिण समुद्रापर्यंतचा सारा देश नांदत होता. रामानें अत्यंत निरपेक्षपणें राज्य चालवून लोकरंजन केलें व जनमताचा आदर केला. 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायानें सर्वत्रच लोकांस मान व आदर दिला जाऊं लागला व प्रजेच्या सुखाची सर्वच काळजी वाहूं लागले. उच्चाधिकारी स्वार्थनिरपेक्ष होऊन

न्यायनीतीनें चालूं लागले, म्हणजे हाताखालच्या लोकांसहि तसेंच वागावें लागतें. न्याय व सत्य या बाबतींत रामराज्य आमच्या साऱ्या इतिहासांत आदर्श ठरलें.

२३. रामाच्या इतिहासावरून स्पष्टपणें समजतें कीं, रामपूर्वकालीं दक्षिण देशांत राक्षसांचें जनस्थानांत व वानरांचें किष्किंधेंत अशीं दोनच राज्यें होतीं. इतर कुठल्याहि दक्षिणच्या राज्याची नांवनिशीदेखील सांपडत नाहीं. त्याचप्रमाणें रामराज्यानंतर राक्षसांच्या किंवा वानरांच्या राज्यांचा ऐतिहासिक उल्लेख मिळत नाहीं. यावरून असें वाटतें कीं, राक्षसांनीं नरमांस-भक्षण सोडून मानवी संस्कृति स्वीकारली असावी व याप्रमाणें ते मानवांतच मिसळून गेले असावे. त्याचप्रमाणें रामकालीन मानवी संस्कृतीचा परिणाम वानरांवरहि झाला असावा व तेहि आपल्या वानरी रानटी गोष्टी सोडून मानवांसारखे राहूं लागले असावेत. यांतीलच कांहीं लोकांनीं आपलीं लहान राज्यें स्थापन केलीं असावींत व तींच पुढें पांड्य, चोल, केरल इत्यादि नांवांनीं प्रसिद्ध झालीं असावींत. थोडक्यांत सांगावयाचें कीं, भरताचा भारतदेश वाढून आज आम्ही ज्यास भारतवर्ष किंवा भरतखंड म्हणतों एवढा मोठा देश एका रामराज्याखालीं आला व साऱ्या या देशभर आसेतु-हिमालय एकच संस्कृति वावरूं लागली. राक्षसांचें भय नष्ट झाल्यामुळें सर्वत्र ऋषींचे आश्रम स्थापिले जाऊन अध्ययन-अध्यापनादि कर्में सुरू झालीं व या देशांतील सारेच लोक सुखाचा व शांतीचा उपभोग घेऊं लागले. राम-राजापासून तर क्षुद्र रंकापर्यंत एकसारखा भ्रातृभाव व एकसारखा समभाव दिसून येत होता. रामादि बंधूंचा भ्रातृभाव पाहून भावाभावांत भांडणारे राक्षसराज व वानरराज यांच्या मनावर तर खरोखरच विलक्षण प्रभाव पडला असावा. सारांश, रामराज्यासारखें राज्य रामापूर्वी झालें नव्हतें, रामा-पासून आजपावेतों झालें नाहीं व पुढेंहि कधीं होईल असें वाटत नाहीं.

☆ ☆ ☆

सर्ग सहावा

विद्येची वाढ

१. रामराज्य आलें व गेलें. यदागतं तद्गतम्. आपण गतागत शब्द वापरतों पण त्यापेक्षां आगतगतं शब्दच अधिक अन्वर्थक वाटतो. गेलें तें येत नाहीं, पण आलें तें गेल्याविना राहात नाहीं. रामराज्यांत जें बंधुप्रेम दिसलें तें न रामापूर्वी कधीं दिसलें व न रामानंतर. चारी भाऊ नुसत्या एकमतानेंच नव्हे तर अगदीं एक मनानें राहिले, पण हें भ्रातृप्रेम पुढच्या पिढींत थोडेंच टिकणारें होतें ? जग हें जलासारखें आहे. जलाशयांतून एखादें जहाज जात असलें म्हणजे त्याच्या जोसानें खळबळ होऊन जो मार्ग होतो अथवा झाल्यासारखा वाटतो, तो तें जहाज दूर जातांच नामशेषहि राहात नाहीं. अगदीं तीच स्थिति या भ्रातृभावाची झाली. रामानें ही गोष्ट ओळखिली नव्हती असें नाहीं व त्याचे परिणाम वाईट होऊं नयेत म्हणून त्यानें अगदीं नवीन प्रकारची एक व्यवस्थाहि केली. ती म्हणजे अगदीं नवीन प्रकारची राज्यवांटणी. अगदीं पूर्वी फक्त एकाच व बहुधा वडील मुलास राज्य मिळत असे. पुढें तें साऱ्याच मुलांस वांटे होऊन मिळूं लागलें. पण तरीहि ही वांटणी राजाच्या मुलांतच होत होती. रामानें ही वांटणी पुढेंहि वाढविली. म्हणजे आपलें राज्य आपल्याच मुलांत न विभागतां आपल्या भावांच्याहि मुलांत विभागिलें व आपल्या मुलांबरोबरच इतर साऱ्याहि भावांच्या मुलांस राज्याधिपति करून टाकलें. पण या प्रयोगाचा परिणाम मात्र चांगला झाला नाहीं. राम असेपावेतों कोणीहि डोकें वर काढिलें नाहीं, पण रामानंतर जेव्हां एवढें प्रचंड

साम्राज्य आठ जागीं विभागिलें जाऊन त्याचे आठ तुकडे झाले, तेव्हांपासून कोसल राज्याचें व त्याचबरोबर अयोध्येचेंहि महत्त्व अजीबात कमी झालें. असें म्हणतात कीं, रामाबरोबर सारी अयोध्या स्वर्गास गेली. हें अक्षरशः खरें असो कीं नसो, पण एवढें मात्र खरें कीं, रामानंतर अयोध्येचें महत्त्व मात्र स्वर्गवासी झालें.

२. राम व त्याच्या तीनहि भावांस प्रत्येकीं दोन दोन मुलें होतीं. रामाच्या मुलांचीं कुश व लव हीं नांवें पूर्वी आलींच आहेत. भरतास दोन मुलें होतीं. यांचीं नांवें तक्ष व पुष्कर. लक्ष्मणाचीं दोन मुलें अंगद व चंद्रकेतु व शत्रुघ्नाच्या मुलांचीं नांवें सुबाहु व शूर. भरताच्या दोन मुलांस गांधार व केकय देश मिळाला व त्यांनीं क्रमानें तक्षशिला व पुष्करावती (हल्लींचें पेशावर) येथें राजधानी स्थापून राज्य चालविलें. लक्ष्मणाच्या दोन मुलांनीं अंगद व चंद्रकेतूनीं सिंधु व मद्र देश बांटून घेतला व अंगदीया आणि चंद्रचक्रा नांवानें नवीन नगरी स्थापून आपला राज्यकारभार चालविला. शत्रुघ्नाचीं दोन मुलें शूर व सुबाहु. यादवांचा जिंकून घेतलेला मुलूख यांच्या वांट्यास आला व मधुरा व रत्नपूर येथून त्यांनीं राज्य चालविलें. लवाच्या वांट्यास कोसल देशाचा उत्तर भाग ज्यांत श्रावस्ती नगरी वसलेली होती तो आला व कुशानें अयोध्या सोडून विंध्यपर्वताजवळ कुशस्थली नांवाचें नगर वसवून त्यास राजधानी केलें व तेथून राज्यशकट तो हांकूं लागला. पण अयोध्यावासी जनांच्या विनंतीवरून त्यानें कुशस्थली सोडली व परत अयोध्येसच राजधानी आणली. याप्रमाणें रामाच्या विस्तीर्ण साम्राज्याचे आठ लहान लहान विभाग झाले. रामाची कल्पना असेल कीं, हीं आठ राज्यें मिळून राहतील. महापुरुष स्वतःवरून जगाची कल्पना करितात, पण ती त्यांच्यानंतर खरी ठरत नाहीं. या कल्पनेचेंहि तसेंच झालें. इतर सातहि राज्यविभाग इतर राज्यांत विलीन झाले व त्यांचे राजवंशहि अस्तित्वांत राहिले नाहींत. शिल्लक राहिला तेवढा कुशाचा वंश, पण त्याचेंहि अस्तित्व नाममात्राचेंच होतें. पुढच्या इतिहासांत या वंशांतील एकहि चक्रवर्ती राजा झाला नाहीं व कोसल राज्याचें महत्त्व पुन्हा वाढलें नाहीं. विदेहाप्रमाणेंच हें राज्यहि शांतपणें तग धरून राहिलें एवढेंच.

३. रामानंतर प्रथम बलिष्ठ झाले यादव. लवणमाधवाच्या भीतीनें पळून गेलेला सत्वत् पुन्हा मधुरेंत आला व त्याच्या भीमनामक पराक्रमी

पुत्रानें शत्रुघ्नपुत्रांस हांकलून लाविलें व मधुरा ताब्यांत घेऊन राज्य चालविण्यास आरंभ केला. भीमाची सर्वांसच भीति वाटत होती. यानें पुन्हा यादवांस एक केलें व तो चक्रवर्ती झाला. याचा मुलगा भजमान. उत्तर पांचालाच्या सृंजय राजानें आपल्या दोन्ही मुली भजमानास दिल्या, पण भजमान फार दिवस जगला नाहीं. त्यामुळें भीमानंतर मधुरेचें राज्य भजमानाच्या अंधक नांवाच्या मुलास मिळालें. दुसरा मुलगा देवबृध् यानें पर्णाशा (सध्यांची बनास नदी) पासून अर्बुद (आबू) पर्यंतचा प्रांत आपल्या ताब्यांत घेतला. हाच भाग पुढें शाल्व नांवानें प्रसिद्ध झाला. तिसऱ्या मुलाचें नांव होतें वृष्णि. याच्या ताब्यांत आनर्त देश आला व तेथें यानें राज्य चालविलें, या राज्यांशिवाय अवंती, दशार्ण व माहिष्मती येथेंहि यादवांचीं लहान लहान राज्यें होतींच. मध्यदेशांतले हे सारे यादव आपलें राज्य हैहयांच्या भोजगणांच्या राज्यांत असल्यामुळें आपणांस भोज म्हणवीत. भोज नांव इतकें लोकप्रिय झालें कीं, इतरहि यादव आपणांस भोज म्हणविले जाण्यांत अभिमान मानीत. रामानंतर याप्रमाणें यादवांचें सामर्थ्य व राज्य वाढतच गेलें.

४. राम दाशरथीच्या कालापर्यंत वसिष्ठ पुरोहितांचें निवासस्थान कोसल देशच होता. मध्यंतरीं कार्तवीर्यार्जुनाचे वेळीं जरी आपव वसिष्ठ कांहीं कालपर्यंत हिमाचलाच्या पायथ्याशीं जाऊन राहिला तरी तोहि परत स्थिरस्थावर होतांच कोसलांतच येऊन राहिला. पुरोहित या दृष्टीनें यांचें सारें कार्य याच देशांत झालें होतें. पण रामानंतर कोसलराजांचें कमी होणारें महत्त्व हे पुढचे वसिष्ठ सांवरूं शकले नाहींत व यांसच कोसलदेश सोडून बाहेर पडावें लागलें. प्रथम हे शत्रुघ्नवंशजाबरोबर शूरसेन देशांत गेले व नंतर पांचालांत. या देशांतच त्या दिवसांत मैत्रेय ब्राह्मण यज्ञपद्धति जमवीत होते व सूक्तरचना करीत होते. दिवोदासाचे दोन ब्राह्मण वंशज परुच्छेप व प्रतर्दन. परुच्छेपाचा मुलगा अनानत, त्याचप्रमाणें वध्र्यश्वाचा ब्राह्मणवंशज सुमित्र याच वेळचे सूक्तकार आहेत. यांचे पाहून पाहूनच हे वसिष्ठहि मंत्ररचना करूं लागले. वसिष्ठांचीं यापूर्वीचीं सूक्तें नाहींत व त्यामुळेंच वसिष्ठ सूक्तांत कोसल देशाचा उल्लेखहि सांपडत नाहीं. आपल्या कल्याणाची अत्यंत काळजी असल्यामुळेंच हे सुप्रसिद्ध सूक्तकार वसिष्ठ नेहमीं आपल्या सूक्तांचे

शेवटीं 'यूयं पात स्वस्तिभिः सदा नः' अशीच प्रार्थना करीत असतात. ऋग्वेदाच्या सातव्या मंडलांत वसिष्ठ सूक्तेंच आहेत व त्यांपैकीं शाहत्तर सूक्तांचें हें पालुपद आहे. या मंडलांत एकशेंचार सूक्तें आहेत, त्यांतल्या अवघ्या अठ्ठावीस सूक्तांत हा स्वस्तिवाचनिक चरण नाहीं. याच वेळेपासून ब्रह्मा वसिष्ठ गोत्रांतलाच असला पाहिजे हा नियम सैल झाला, कारण आतां वसिष्ठ हौत्रकर्महि करूं लागले.

५. उत्तर पांचालाच्या सृंजय राजाचा उल्लेख भजमानाचा सासरा या नात्यानें पूर्वी आलाच आहे. याचा मुलगा च्यवन. याचेंच दुसरें नांव पिजवन. कधींकधीं यास पंचजन असेंहि म्हणत. हा फार पराक्रमी होता. यानें आणि त्याचा मुलगा सुदास यानें पांचाल राज्य खूपच वाढविलें. कांहीं कालासाठीं तर यांनीं द्विमीढ व दक्षिण पांचाल राज्य नामशेष करून टाकलें होतें. या सुदासाला एका वसिष्ठ पुरोहितानें राज्याभिषेक केला होता. वसिष्ठाचें पांचालांत याप्रमाणें महत्त्व वाढत चाललेलें पाहून इकडील विश्वामित्र पुरोहित खवळून उठले. वसिष्ठ-विश्वामित्रांचा हा दुसरा संघर्ष. विश्वामित्रांनीं आपल्या कूट नीतीनें सुदासपक्षाच्या लोकांत व वसिष्ठ पुरोहितांत भांडणें लावलीं. या युद्धांत उभय पक्षांतील शेंकडों लोक मारले गेले. मुख्य वसिष्ठ पुरोहिताचा मुलगा शक्ति याच भांडणांत मारला गेला. एका वसिष्ठानें सुदासाकडील शंभर लोक मारल्यानें विश्वामित्रांच्या मुख्यानें तो आरोप विख्यात वसिष्ठावर केला. विश्वामित्रांची काव्यरचना या वेळीं बऱ्याच निम्नस्तरावर पोंचली. त्यांनीं वसिष्ठांस उघड उघड शिव्या द्यावयास आरंभ केला. वसिष्ठांस 'न गर्दभं पुरो अश्वान्नयन्ति' असें तिरस्कारानें म्हणण्यास कमी केलें नाहीं. ऋग्वेदसंहितेंत या ऋचा 'वसिष्ठविद्वेषिण्यः' म्हटल्या जातात. अजूनहि वसिष्ठ गोत्रांतले ब्राह्मण या ऋचा म्हणत नाहींत किंवा 'न केवलं यो महतोऽपभाषते, शृणोति तस्मादपि यः स पापभाक्' या न्यायानें ऐकतहि नाहींत. काव्याचा सुळसुळाट झाला म्हणजे तें कोणत्या थराला जाऊन पोंचतें याचा या काळचीं कांहीं सूक्तें वाचलीं म्हणजे अनुभव येतो. यांत अश्लीलता, रसहीनता इत्यादि दोष शिरूं लागलेले दिसतात.

६. विश्वामित्रांनीं सुदासासमोर जेव्हां वसिष्ठावर शंभर लोकांस खाणारा

राक्षस असा आरोप केला, तेव्हां वसिष्ठानें शपथपूर्वक ही गोष्ट नाकारली. पण तेवढ्यानें सुदासाचें समाधान झालें नाहीं व दोहोंतला विरोध कायमच राहिला. पुढें शक्ति मारला गेल्यानंतर वसिष्ठ त्या शक्तीच्या अदृश्यती नांवाच्या विधवा स्नुषेस घेऊन पळाला व पौरवराज संवरणाकडे जाऊन राहिला. पण सुदासानें तेथेंहि वसिष्ठाचा पाठलाग केला व वसिष्ठांसाठींच संवरणासहि हस्तिनापुर सोडून पळावें लागलें. सुदासाची सत्ता हस्तिनापुरांतहि चालू लागली. सुदास पुढें पंचनदाकडे वळला व विश्वामित्रांचे साहाय्यानें त्यानें शतद्रु (सतलज) व विपाशा (बियास) पार करून आपली सत्ता तेथेंहि स्थापन केली. सुदासाची ही लाट थोपविण्यासाठीं वसिष्ठांनीं खटपट करून आसपासच्या राजांचा एक संघ बनविला. या राजांनीं मिळून संवरणाचा सामना केला. वैदिक वाङ्मयांत प्रसिद्ध असलेलें दाशराज्ञ युद्ध तें हें. येथें दश ही सामान्य संज्ञा असून तिचा अर्थ दहाच नाहीं तर पुष्कळ एवढाच घ्यावयाचा आहे. या संघाचा प्रमुख पौरव संवरण होता. यादव, आनव, द्रुह्यु, तुर्वस, मत्स्य, शिव इत्यादि लहान मोठे दहाबारा राजे यांत सामील होते. पण या साऱ्यांचा सुदासानें परुष्णी (रावी) च्या तीरावर पराभव केला. वसिष्ठासह संवरण पळाला व सिंधुतीरावरील एका किल्ल्यांत अनेक वर्षें लपून राहिला. शक्तिपिता वसिष्ठाचा अंत झाला. इकडे शक्तीच्या विधवा स्त्रीस मुलगा झाला होता. त्याचें नांव पराशर. या पराशराच्या मुलाचें नांव सुवर्चस् वसिष्ठ. कांहीं कालानंतर सुदासहि वारला व त्याचे नंतर त्याचा मुलगा सहदेव उत्तर पांचालचा राजा झाला.

७.सहदेव पराक्रमी नव्हता. बापानें मिळविलेलें राज्य यास राखतां आलें नाहीं. निरनिराळे राजे आपापले प्रांत या राज्यांतून काढून आपापलीं राज्यें चालवूं लागले. हें पाहून वर सांगितलेल्या पराशरपुत्र सुवर्चसच्या मनांतहि महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली व आपल्या पितामहास आश्रय देणाऱ्या व त्यासाठीं दुःख भोगणाऱ्या वृद्ध संवरणास या लहान तरुणानें सिंधुदुर्गांतून बाहेर काढिलें व हस्तिनापुरांतील सैन्याकडून सहदेवावर स्वारी करविली. सहदेवाचा पराभव झाला व वृद्ध संवरण पुन्हा पौरव राज्याचा अधिपति बनून हस्तिनापुरीं राज्य करूं लागला. संवरणानें वसिष्ठास

आश्रय दिला तेव्हां त्याचें लग्नहि झालेलें नव्हतें व या अविवाहित स्थितींतच त्यास या साऱ्या आपत्तींत दिवस काढावे लागले होते. सुवर्चस् वसिष्ठानें शूर नांवाच्या एका यादवाकडे जाऊन त्याची तपती नांवाची मुलगी मागून आणली व तिचें संवरणाशीं लग्न लावून दिलें व याप्रमाणें संवरणानें आपल्या कुलावर जे उपकार केले होते त्याची भरपाई केली. सुवर्चस् वसिष्ठ एवढेंच करून राहिला नाहीं तर त्यानें आपल्या खटपटीनें पौरव राज्याची वाढहि केली. संवरणापासून तपतीस एक मुलगा झाला. पुत्रजन्मानंतर संवरण फार दिवस जगला नाहीं. याच सुमारास एक दीर्घ दुष्काळ पडला. पुराणेतिहासांत उल्लेखिलेला हा दुसरा दुष्काळ. या दुष्काळांत सुवर्चस् वसिष्ठानें फार चांगल्या रीतीनें हस्तिनापुरचें राज्य, संवरणाची विधवा तरुण स्त्री तपती व तिचें बाल अपत्य यांस साभाळलें व पौरव संवरणाच्या ऋणांतून पूर्णपणें आपल्या कुलास मुक्त केलें. हस्तिनापुरच्या या बालराजाचें नांव कुरु. कुरूस गादीवर बसविल्यावर सुवर्चस् निघून गेला व सूक्तरचनेच्या व यज्ञविस्ताराच्या कामांत आपला काळ घालवूं लागला.

८. ऋग्वेद सूक्तांत सर्वांत अधिक उल्लेख जर कुणा राजवंशाचा असेल तर तो पांचाल राजवंशाचा. दाशराज्ञ युद्धाचा उल्लेख तर जवळ जवळ प्रत्येक मंडालांतील सूक्तांत आहेच. मुद्गल भार्म्याश्व, बध्र्यश्व व त्याची आई इंद्रसेना, दिवोदास, सृंजय, च्यवन, पिजवन आणि सुदास यांचीं नांवें तर स्पष्टच आलीं आहेत. दहाव्या मंडलांत समाविष्ट असलेलें 'श्रोष्वस्मै' हें एकशेंतेहतिसावें सूक्त तर पैजवन सुदासानें रचिलेलें समजलें जातें. सुदासाबरोबरच त्याचा मुलगा सहदेव आणि नातू सोमक या पांचाल राजांचींहि नांवें ऋग्वेदांत सांपडतात. या सोमक पांचालाचेंच दुसरें नांव दुर्मुख. या दुर्मुखास राज्याभिषेक करणारा वामदेवहि याच काळीं प्रसिद्ध झाला. हा गौतम वंशांतला. ममतेचा अंध मुलगा दीर्घतमस् याचा याच सूक्तांत स्पष्टच उल्लेख आहे. हत्तीवर मंत्र्यासह बसलेल्या राजाचें उपमान यानेंच आपल्या सूक्तांत दिलेलें आहे. यानें व याच्या गोत्रजांनीं केलेलीं सूक्तें ऋग्वेदाच्या चौथ्या मंडलांत ग्रथित आहेत. हीं सूक्तें व त्यांत आलेलीं नांवें पुराणेतिहासाशीं पूर्णपणें जुळत असल्यानें एकमेकांचीं समर्थन करणारींच आहेत व पुराणेतिहास म्हणजे कल्पनेवर आधारलेल्या कथा नाहींत हें स्पष्ट करणारीं आहेत. भस्म-

धारणविधीचा प्रवर्तक रामदेवच.

९. पौरवराज्याच्या हस्तिनापुरचे गादीवर सुवर्चस् वसिष्ठानें बसविलेला कुरु फार पराक्रमी निघाला. यानें उत्तर पांचालराज सोमक आणि त्याचा मुलगा जंतु यांस युद्धांत ठार मारिलें व याप्रमाणें सुदासावरचा पुरा सूड उगविला. पांचाल राज्य यानें पौरवराज्यांत मिळविलें. त्यामुळें उत्तरपांचाल-राजवंशांत जंतूनंतर पांचाल राजांचीं नांवें सांपडत नाहींत. हें राज्य पुन्हा पुढें भीष्मकालीं निराळें होऊन पृषताचे स्वाधीन झालें. कुरूनें दक्षिण पांचालचें राज्यहि आपल्या राज्यास जोडलें व याप्रमाणें आपलें राज्य पूर्वेस प्रयागपर्यंत वाढविलें. हा चक्रवर्तीहि होता व वंशकरहि. पौरव यानंतर कौरव म्हणविले जाऊं लागले. याच्या लहानपणीं पडलेल्या दुष्काळाचीं कारणें शोधतांना याच्या लक्ष्यांत असें आलें कीं, जेथें जंगल नसतें व सारीच भूमि अन्नोत्पादनासाठीं नांगरली जाते, तेथें पावसाचें प्रमाण कमी होत जातें. या साठीं यानें आपल्या राज्यांत क्षेत्र व जांगल असे दोन विभाग केले. शहरा-जवळ क्षेत्राचा भाग व दूर अंतरावर जंगलाचा अशी योजना यानें केली. त्यामुळें हस्तिनापुराजवळचा भाग कुरुक्षेत्र म्हणविला गेला व दूरचा कुरु-जांगल. याप्रमाणें राज्यांत जंगल ठेवण्याची प्रथा कुरूपासून सुरू झाली.

१०. कुरूस तीन मुलें झालीं. परीक्षित्, सुधन्वन् व जह्नु. परीक्षित्ला हस्तिनापुरचें राज्य मिळालें. हा पहिला परीक्षित्. दुसरा परीक्षित् महाभारता-नंतरचा अभिमन्युपुत्र. यानें आपल्या मुलाचें नांव ठेवलें जनमेजय. याच कुलांत पूर्वी पुरूचा एक मुलगा जनमेजय नांवाचा होऊन गेल्यामुळें यास द्वितीय जनमेजय म्हटलें पाहिजे. सर्पसत्र करणारा भारतीय युद्धानंतरचा परीक्षित्पुत्र जनमेजय तिसरा जनमेजय. या दुसऱ्या जनमेजयानें लोकांस त्रास देणें सुरू केलें. यानें गार्ग्यवंशांतल्या एका ऋषीस फार सताविलें. ऋषीनें जनतेपुढें आपलें गाऱ्हाणें मांडलें व हस्तिनापुरच्या जनतेनें यास राज्यपदावरून दूर केलें. हा शौनक कुलांतील देवापि ऋषीकडे गेला व त्याची मदत मागितली. देवापीच्या मुलाचें नांव होतें इंद्रोत. हा इंद्रोत इंद्राचे साह्यानें विजय मिळवून देणारा समजला जात होता. यानें व तुरकावशेय नांवाचे ऋषीनें पौरोहित्यकर्म करून या जनमेजयाकडून विजयप्राप्तीसाठीं अश्वमेध यज्ञ करविला. पण विजयानंतर केल्या जाणाऱ्या अश्वमेधानें आधींच विजय कसा

मिळावा ? या अश्वमेधानें जनमेजयास विजय तर मिळाला नाहींच, उलट हा अश्वमेध केल्यावर जनमेजय दुसरा आपल्या चुलतभावाकडून-जह्नुपुत्र सुरथाकडून मारला गेला. याप्रमाणें यज्ञानें इष्टफल न मिळाल्यानें स्वर्गाची कल्पना निघाली व यज्ञाचें अदृष्टफल स्वर्ग मानला जाऊं लागला. ही गोष्ट बृहदारण्यकांत स्पष्टपणेंच नमूद करून ठेविली आहे. अश्वमेध करणाऱ्या परीक्षिताचें काय झालें या प्रश्नाच्या उत्तरांत याज्ञवल्क्यानें भुज्यु लाह्यायनीस जें उत्तर दिलें त्यांत अश्वमेध करणारे पारीक्षित वायुलोकास गेले असें जें सांगितलें आहे त्यावरून स्पष्टच ही गोष्ट होत आहे. याप्रमाणें यज्ञांतले देव जसे काल्पनिक झाल्यावर त्यांचीं वर्णनें काल्पनिक झालीं तशीं यज्ञाचीं फलेंहि अदृष्ट म्हणजे अप्रत्यक्ष मानलीं जाऊं लागलीं.

११. जह्नूच्या ताब्यांत जुना जह्नूचा म्हणजे कान्यकुब्ज देशच आला होता. जह्नूचा मुलगा सुरथ. यानें द्वितीय जनमेजयास मारून तें राज्य आपलेंसें केलें होतें. पण हाहि त्या राज्याचा उपभोग घेऊं शकला नाहीं. तिसऱ्या मुलाच्या म्हणजे सुधन्वन्च्या च्यवन नांवाच्या मुलानें सुरथाचा पराभव करून तीं दोन्हीं राज्यें बळकाविलीं. या च्यवनास जो मुलगा झाला त्याचें नांव वसु. आपल्या पराक्रमानें यानें चेदिदेश यादवांजवळून जिंकून घेतला, त्यामुळें यास 'चैद्योपरिचर वसु–' चैद्यांवर सत्ता चालविणारा वसु, असें म्हणूं लागले. थेट मगध देशापर्यंतचा प्रांत यानें जिंकून हा चक्रवर्ती झाला. सम्राट् ही यास पदवी मिळाली होती. वायव्येस मत्स्य देशापर्यंत याची सत्ता पोंचली होती. हा फार न्यायी म्हणूनहि प्रसिद्ध होता. यज्ञांत केल्या जाणाऱ्या हिंसेबद्दल यास वाईट वाटल्यानें यानें पिष्टपशु करून स्वतः एक यज्ञ केला होता. पण जेव्हां या विषयावर ब्राह्मणवर्गांत दुमत झालें व सम्राट् या नात्यानें याकडे निकाल करावयास तो प्रश्न आला, तेव्हां यानें सभा बोलाविली. उभय पक्षांचें म्हणणें ऐकून घेतलें. स्वतः अहिंसेच्या पक्षाचा असतांहि यज्ञांतली हिंसा हिंसा नव्हे असा निकाल देऊन 'अध्वर' शब्द सार्थ ठरविला.

१२. या कालीं मंत्ररचना इतकी वृद्धिंगत झाली होती व यज्ञांत तिचा इतका उपयोग होऊं लागला होता कीं, कोणतीहि क्रिया मंत्राशिवाय केली त नसे. पण यांत अशी अडचण येऊं लागली कीं, मंत्र म्हणावयाचा व

क्रिया करण्याचा काल कधीं कधीं जमेनासा झाला. कारण क्रियेस लागणारा काल मंत्र म्हणावयाच्या कालाइतका निश्चित नसे. उदाहरणार्थ, आपण अशी कल्पना करूं कीं, अग्नि प्रज्वलित करतांना एक मंत्र म्हणावयाचा आहे. मंत्र म्हणण्यास लागणारा वेळ जरी निश्चित असला तरी तेवढ्याच वेळांत ज्वाला होईलच असें नाहीं. ज्वाला उत्पन्न होणें इंधनाच्या शुष्कतेवर, तें इंधन कशाप्रकारें रचिलें आहे यावर व फुंकरण्याच्या क्रियेवर अवलंबून आहे. बरें, हा काल कांहीं अशा समप्रमाणांत वाढत नाहीं कीं, तेवढ्या वेळांत तो मंत्र दोनदा किंवा तीनदा म्हणतां येईल. ही अडचण दूर करण्यास वामदेव कुलोत्पन्न एका ऋषीनें एक नवी कल्पना काढली. ती अशी कीं, क्रियेबरोबर म्हणावयाच्या मंत्रास म्हणजे उक्थास, त्यांतील अक्षरें उच्चारण्यास जो काल लागतो तो, तीं अक्षरें थोडीं लांबवून वाढवावयाचा, म्हणजे 'हौ' असें म्हणावयाचें असेल तर 'हा ३ उ' असें किंवा नाभौ म्हणावयाच्या जागीं 'ना भा ३ इ' असें म्हणावयाचें. याप्रमाणें उक्थास बृहत् करणाऱ्या या ऋषीस बृहदुक्थ असेंच नांव पडलें. सामपद्धतीचा आरंभ येथूनच झाला. मंत्र ऋग्वेदाचाच पण त्याचींच अक्षरें लांबवावयाचीं व पुन्हा पुढच्या अक्षरांस मिळवावयाचीं म्हणजेच त्याचें साम करावयाचें. साम म्हणजे जुळविणें. अक्षरें लांबवून जुळवावयाचीं म्हणजेच साम म्हणावयाचे ही कल्पना रूढ झाली.

१३. अगदीं आरंभीं मंत्रांचे स्वर निश्चित केलेले नव्हते. पण पुढें असें ध्यानांत आलें कीं, शब्दांतल्या अक्षरांवरील स्वरांच्या आघातभेदामुळें अर्थ-भेद होतो. जसें 'मा' शब्दाचे नको व मला असे दोन अर्थ होतात. मला म्हणतांना साहजिकपणेंच माझी मान हृदयाकडे वळते व 'मा' चें अनुदात्त उच्चारण होतें. तेंच नको म्हणतांना स्वर वर जातो. उदात्त होतो. तेव्हां मंत्रपाठ करितांना उदत्तानुदात्त व स्वारित अशा तीन स्वरांनीं युक्त त्रिश्रुतिक पाठ होऊं लागला. पण तरीहि यजन करतांना मंत्र एकश्रुतिकच म्हणावयाची पद्धति कायम राहिली. पुढें मंत्रांचे स्वर जेव्हां लांबविले जाऊं लागले तेव्हां याच तीन स्वरांचे सात स्वर झाले.

उदात्ते निषादगांधारावनुदात्त ऋषभधैवतौ ।
स्वरितप्रभवा ह्येते षड्जमध्यमपंचमाः ॥

या स्वरांच्या व कालाच्या योगानें सामगीतें निर्माण झालीं. ही पद्धति रूढ होऊन ब्रह्मा, होता, अध्वर्यु यांचे जोडीस आणखी एक सामगान करणारा ऋत्विज् उद्गाता म्हणून आला, आणि यज्ञांत निरनिराळीं सामगानें म्हणावयाचें काम याजकडे सोंपविण्यांत आलें. आतां यज्ञांत चार मुख्य ऋत्विज झाले व सामगानाचें महत्त्व इतकें वाढलें कीं 'अयज्ञो वै योऽसामा' ज्या यज्ञांत सामगान नाहीं तो यज्ञच नव्हे असें समजण्यांत येऊं लागलें.

१४. चैद्य उपरिचर वसूच्या मागें मगधापासून मत्स्यापर्यंत पसरलेलें त्याचें साम्राज्य त्याच्या पांच पुत्रांत वांटलें गेलें. मगध, चेदि, कौशाम्बी, कारूष आणि मत्स्य असे पांच भाग होऊन एकेक भाग एकेका मुलाच्या वांट्यास आला. मारुतास मत्स्य देश मिळाला, कारूषावर ललिताचा ताबा आला, कौशाम्बीचें राज्य कुशनांवाच्या वासवास मिळालें, चेदि देश प्रत्यग्रहाचे ताब्यांत आला व मगध देशावर बृहद्रथ राज्य करूं लागला. हे पांचहि भाऊ वसूचे पुत्र असल्यामुळें वासव म्हणविले जात असत. बृहद्रथाच्या वेळेपासून मगध देशास इतिहासांत जें प्राधान्य मिळालें, तें महाभारताच्या युद्धानंतर अगदीं आधुनिक इतिहासकालापर्यंत टिकलें. बृहद्रथानें आपली राजधानी गिरिव्रज येथें स्थापिली. हें ठिकाण चारी बाजूंनीं डोंगरांनीं वेष्टित होतें. येथें जुनी वसति होतीच. दीर्घतमस् गोतमाची जी प्रजा मंत्ररचना न शिकतां अर्थात् ब्राह्मण न होतां राहिली होती ती येथेंच वसत होती. हे लोक आपणांस मगध देशांत राहणारे म्हणून मागध म्हणवीत. यांनीं जरी वैदिक मंत्ररचना केली नाहीं तरी पण यांनीं भिन्न भिन्न राजे लोकांच्या वंशावळी गोळा करून हे वंशशंसक झाले होते. बृहद्रथानें या लोकांस उत्तेजन देऊन हें काम त्यांजकडून पुरें करविलें व पुढेंहि चालू ठेवविलें. या मागधांनींच एकत्र करून ठेवविलेल्या वंशांचा पुढें पुराणांत समावेश झाला. या माहितीच्या आधारावरच हा पुराणेतिहास लिहिणें शक्य झालें आहे.

१५. कोणतीहि नवीन गोष्ट निघाली कीं, तिच्यामागेंच लोक लागतात. जुनी परंपरा बदलते व ती नव्या परंपरेस स्वस्थानापन्न करिते हें त्रिकालाबाधित सत्य आहे. मंत्ररचनेंत शैथिल्य, अश्लीलता, नीरसता येऊं लागल्यामुळें बुद्धिवान् लोकांस नवें कांहींतरी हवेंच होतें तें या सामपद्धतीमुळें मिळालें. आतां मंत्ररचना कमी होऊं लागली व निर्माण झालेल्या मंत्रांतच स्वर

बदलून त्यांचें गान कसें करावें इकडे विद्वानांचें लक्ष्य वेधलें. तोच मंत्र एखाद्या ऋषीनें एक प्रकारें गाइला तर दुसरा एखादा ऋषि तोच मंत्र निराळ्या प्रकारानें गाई. काव्यरचनेचा भर याप्रमाणें काव्यगायनावर आला व पुढें पुढें जसजशी या गायनांत स्वरमालिकेची व आलापांची भर पडत गेली तसतशी मंत्रांतल्या अर्थापेक्षां या स्वरालापांचीच महती वाढून शेवटीं काव्यगायनांतलें काव्य अदृश्य होऊन नुसतें गायनच राहिलें. म्हणूनच पूर्व-मीमांसाकारांनीं मंत्र व गान यांत मंत्रापेक्षां गानासच प्राधान्य दिलें आहे. एकास मंत्र माहीत आहे, पण गान माहीत नाहीं व दुसऱ्यास गान येत आहे पण मंत्र येत नाहीं, अशा प्रसंगीं गान येणारासच प्राधान्य द्यावें असें स्पष्ट सांगितलें आहे.

१६. यज्ञक्रिया फार जुनी आहे. ती क्रिया करतेवेळीं तोंडानें कांहीं म्हणत नसतील किंवा असतीलहि. तरी पण जें काय म्हणत असतील तें प्रथम गद्यांतच असणार. गद्य हें पद्यापूर्वीचें आहे, हें सांगावयासच नको. मनुष्य प्रथम गद्यांतच बोलतो. गद्य स्वाभाविक आहे, पद्य कृत्रिम आहे. विश्वामित्रानें पद्यरचना करण्यापूर्वीहि गद्य अस्तित्वांत होतेंच. सवब वेद-त्रयींत जुना अध्वर्युवेद, नंतर होतृवेद, व सर्वांत शेवटील उद्गातृवेद. अगदीं आजच्या कालीं ज्या वेदसंहिता माहीत आहेत त्यांत देखील यजुःसंहितेचे कांहीं भाग ऋक्संहितेंतल्या कोणत्याहि मंत्रापेक्षां प्राचीन सांपडतात, आणि म्हणूनच सायणाचार्यांनीं 'यजुर्वेदो भित्तिस्थानीयः। ऋग्वेदश्चित्रस्थानीयः' असें स्पष्ट सांगितलें आहे. ऋङ्मंत्र चित्रांसारखे सुंदर असतील, मनोहर असतील, नव्हे ते तसे आहेतहि. पण या चित्रांची पार्श्वभूमि मात्र यजुर्वेद आहे. ऋग्वेदाचे मंत्र ही धेनु आहे व सामवेद त्या धेनूपासून दोहिलेलें अमृत आहे. या तीन वेदांची कालानुक्रांति अशी आहे. सारांश, साम ही या उक्रांतींतील शेवटली पायरी आहे. हळूहळू सामांची संख्या वाढत गेली व त्यांचेंहि नियमन होत गेलें.

१७. या कालांत कोसल देशाचें महत्त्व कमी कमी होत चाललें होतें हें मागें सांगितलेंच आहे. रामानंतर पांच सात पिढ्यांनीं कुरु झाला व कुरूनंतर जवळ जवळ तितक्याच अंतरानें वसु चैद्य उपरिचर होऊन गेला, पण या काळांतच नव्हे पण आणखीहि कांहीं पिढ्या जाईपर्यंत

रघुवंशांत नुसत्या नांवापलीकडे नांवाजण्यासारखी कृति करणारा कोणी पुरुष झालाच नाहीं. म्हणूनच रघुवंश लिहिणाऱ्या कविकुलगुरु कालिदासासहि जवळ जवळ अठरा एकोणीस वंशजांचें वर्णन करितांना नुसत्या नांवाच्या शब्दावर कोट्या करण्यापलीकडे अठरावा सर्गभर रघुवंशकाव्यांत कांहीं लिहितां आलें नाहीं. या साऱ्या काळांत कोसल राजांची राजकीय महत्त्वाकांक्षा नष्टच झाली होती असें म्हणावयास हरकत नाहीं. वसु चैद्य उपरिचरानंतर सुमारें पांचसहा पिढ्यांचा काल गेला असेल. या कालांत सामाची प्रथा कोसल देशांत खूप वाढली व कोसलनरेश हिरण्यनाभानें राजकीय दृष्टीनें नसलें तरी सांस्कृतिक दृष्टीनें एक मोठें कार्य केलें, आणि तें म्हणजे त्याच्या वेळेपावेतों जितकीं सामें अस्तित्वांत आलीं होतीं त्या सर्वांस एकत्र करण्याचें कार्य त्यानें संपादिलें.

१८. सामवेदाचे मंत्र एकत्र होऊं लागल्याबरोबर ऋग्वेद व यजुर्वेदाचेहि मंत्र एकत्र करण्याची क्रिया सुरू झाली. याप्रमाणें तीनहि वेदांच्या मंत्रांचें चयन होऊं लागलें. ही सामवेद संहिता प्रथम कोसल देशांत तयार झाली. हिरण्यनाभानें या कामीं फार परिश्रम घेतले. पण एकट्यानें होण्यासारखें हें काम नव्हतें. या कामांत त्यास साह्य हवें होतें. कोसलाच्या पश्चिमेसच द्रिमीढ राज्य होतें. तेथल्या कृत नांवाच्या राजानें या कामांत हिरण्यगर्भास गुरु केलें व हिरण्यनाभानें जमविलेली साम संहिता पुरी केली. नुसते मंत्रच या दोघांनीं गोळा केले नाहींत तर ते म्हणण्याच्या पद्धतीहि म्हणणाऱ्यांकडून ऐकिल्या. महाभारतकार स्पष्टच नमूद करून ठेवतात कीं, 'वेदो गीतः पुरा प्राच्याम्' म्हणजे वेदांचें गान प्रथम पूर्वेकडे झालें. कृत व हिरण्यनाभानें मिळून चोवीस प्रकारचीं सामगानें गोळा केलीं. हीं प्राच्य सामें म्हणून प्रसिद्ध झालीं व कृत यानें गोळा केलेलीं सामगानें गाणारे आपणांस कार्त म्हणवूं लागले.

१९. पण ही सामसंहिता पुरी करण्याचें काम मात्र कोसलांतहि झालें नाहीं किंवा द्रिमीढ राज्यांतहि झालें नाहीं. तें पुरें झालें दक्षिण पांचाल देशांत. कृतानंतर तीन पिढ्यांनीं. कृताचे कालीं तेथें विभ्राज् नांवाचा राजा राज्य करीत होता. या विभ्राजाचा नातू अणुह नांवाचा होता. यानें एखाद्या राजकन्येशीं लग्न न करितां शुक्र नांवाच्या ब्राह्मणाच्या कृत्वी नांवाच्या कन्येशीं लग्न केलें. या विवाहापासून जो पुत्र झाला त्याचें नांव ब्रह्मदत्त. अणुहाच्याच

राज्यांत अत्रिकुलांतला जैगीषव्य नांवाचा विद्वान् ब्राह्मण होता. याची फार मोठी पाठशाला होती. याच्या दोन्ही मुलांनीं संहितांच्या बाबतींत फार मोठें काम केलें. यानें संहितेचे मंत्र, पदें एवढींच नव्हे तर अक्षरेंहि मोजून काढिलीं व दुसऱ्यानें त्यांचीं लिखितें तयार करविलीं. त्यावरून यांस संख्य व लिखित अशींच नांवें पडलीं. संख्य हा शब्द तालव्य 'श' नें लिहिला गेला व पुढें त्या शब्दाचा अर्थ होत नसल्यानें 'शंख' असा वाचिला गेला. नीट विचार करितां ही गोष्ट सहज लक्ष्यांत येण्यासारखी आहे. या संख्य-लिखितांबरोबर ब्रह्मदत्तानें जैगीषव्याच्या पाठशालेंत अध्ययन केलें होतें. ब्रह्मदत्तहि फार विद्वान् असून योगाचें अध्ययन यानें चांगलेंच केलें होतें.

२०. आपल्या पित्याप्रमाणेंच यानेंहि राजकन्येशीं विवाह न करितां एका ब्राह्मणमुलीशींच लग्न केलें. ही देवल नांवाच्या ऋषीची मुलगी होती. हिचें घरचें नांव संनति. पण आपल्या अत्यंत गरीब स्वभावामुळें हिचें नामकरण ब्रह्मदत्तानें गो – गाय असें केलें. या विद्वान् राजाला दोन मंत्रीहि असेच विद्वान् मिळाले. एकाचें नांव होतें काण्डरीक व दुसऱ्याचें होतें गालव. बभ्रु गालवाच्या पित्याचें नांव असल्यामुळें व पांचालांत हा राहणारा असल्यानें इतर गालवांपेक्षां निराळेपणा दाखविण्यासाठीं याला गालव बाभ्रव्य पांचाल असेंहि म्हणत. या दोनहि मंत्र्यांनीं ऋक्, यजु व साम यांच्या संहिता केल्या व त्यांचें सम्यक् विभाजन केलें. काण्डरीकास द्विवेदी, छंदोग आणि अध्वर्यु म्हणत असत. यावरून असें दिसतें कीं, यजुस् व साम मंत्रांचें संहितीकरण यानें केलें. गालव बाभ्रव्य पांचालानें ऋङ्मंत्राची संहिता तर केलीच, पण या ऋङ्मंत्रांचा पाठ कसा करावा याबद्दलचें शिक्षाशास्त्रहि केलें. सामगानांत शब्दांची जी ओढाताण करावी लागे त्यामुळें पुष्कळ वेळ मूळ शब्द काय व तो कसा उच्चारावा हें सांगणें आवश्यक झालें होतें व त्यामुळें जे अपपाठ शिरूं लागले होते त्यांस आळा बसला. संख्यानें पदांची संख्या नियत करतांना पदपाठ केलाच होता, त्यांत बाभ्रव्यानें क्रम पाठाची भर घातली व दोन शब्द मिळवून म्हणावयाचे असले म्हणजे अनुदात्त स्वराचा जो बदल होतो तोहि निश्चित केला. काण्डरीक वेदविद्येंत तर निष्णात होताच, पण तो वैद्यशास्त्रप्रवर्तकहि होता. औषधि विद्या फार जुनी होतीच. तिलाहि या

काळीं शास्त्राचें रूप आलें.

२१. याच तीनचार पिढ्यांत आणखीहि एक विद्या पुढें आली व ती म्हणजे नक्षत्रविद्या. कृत्तिकादि नक्षत्रांचीं नांवें या काळीं निश्चित झालीं असावींत. कारण याच तीन चार पिढ्यांत सर्वांत प्रथम नक्षत्रांचीं नांवें पुरुषांस दिलेलीं सांपडतात. हिरण्यनाभ कोसलेश्वराचा उल्लेख पूर्वी आलाच आहे. यानें आपल्या मुलाचें नांव पुष्य ठेविलें तर त्याच वेळीं असलेल्या अंधक यादव कुलांतील नलराजानें आपल्या मुलाचें नांव अभिजित् व नातवाचें नांव पुनर्वसु ठेविलें. पुष्य नांवावरून नुसते ठळक दिसणारे तारेच ज्योतिर्विद ओळखूं लागले होते असें नव्हे तर खगोलाचे सत्तावीस विभागहि त्यांनीं कल्पिले होते असें दिसतें. कारण नाहींतर पुष्यासारखें लहान व सहज ध्यानांत न येणारें नक्षत्र कल्पिण्याचें कांहीं कारण नव्हतें. येथून ही विद्या इतकी वाढली कीं, महाभारतापूर्वी तर स्त्रियांस हीं नक्षत्रांचीं नांवें दिलीं जाऊं लागलीं. वसुदेवाची एक स्त्री बलरामाची आई रोहिणी म्हणून प्रसिद्धच आहे. कृष्णाच्याहि एका स्त्रीचें नांव हेंच होतें. बलरामाच्या स्त्रीचें नांव रेवती होतें. सुभद्रेस चित्राहि म्हणत असत. राधा तर प्रसिद्धच आहे. या सर्वांवरून असें दिसतें कीं, कोसल देशांत व विशेषतः यादवांचे राज्यांत या विद्येची चांगलीच प्रगति झाली असावी.

२२. याप्रमाणें या कालांत विद्येची खूपच वृद्धि झाली, पण पराक्रमाचीं कृत्यें फारशीं झालीं नाहींत. राजे लोकहि बहुधा बलाची उपासना करण्यापेक्षां बुद्धीचीच उपासना करूं लागले होते. यामुळें वसु चैद्य उपरिचरानंतर जवळ जवळ दहा पिढ्यांत कुणी चक्रवर्ती झालाच नाहीं, पण हें चक्रवर्तिपद तत्कालीन राजप्रवृत्तीच्या उलट जाऊन कौरव वंशांतील प्रतीप नांवाच्या राजानें मिळविलें. प्रतीप ब्रह्मदत्ताचा समकालीन होता. पूर्वीच्या शांतताप्रिय राजांची वृत्ति सोडून यानें स्वपराक्रमानें अंधक, वृष्णि हे यादव, द्विमीढ, उत्तर पांचाल व मागध या सर्व राजांस आपल्या ताब्यांत घेतलें व स्वतः चक्रवर्ती झाला. याला दोन मुलें होतीं. एकाचें नांव ऋष्टिसेन व दुसऱ्याचें उदान. ऋष्टिसेनाचा मुलगा देवापि आणि उदानाचा मुलगा शंतनु असे प्रतीपाचे दोन पौत्र होते. प्रतीप दीर्घायुषी होता. पण या दीर्घायुष्यांत याच्या डोळ्यासमोरच ऋष्टिसेन व उदान हीं दोनहि मुलें कालवश

झालीं. पुत्रशोकानें दुःखित वृद्ध प्रतीपाच्यानंतर देवापि राजा व्हावयाचा. पण त्याचे अंगावर श्वेतकुष्ठ झालें म्हणून त्यानें राज्य न घेतां तो वनांत गेला व तपस्या करूं लागला. ब्राह्मण होऊन यानें सूक्तरचनाहि केली व धाकट्या चुलतभावास—शंतनूस राज्य मिळाल्यानंतर कांहीं काल या लहान राजाचें नगरांत परत येऊन पौरोहित्यहि केलें. प्रतीपानंतर पौरव किंवा आतां कौरव वंशाचें राज्य शंतनूचे हातीं आलें.

२३. प्रतीपकालींच वसिष्ठकुलांत एक प्रसिद्ध ऋषि होऊन गेला. याचें नांव होतें सगर. एका राजाकडून यास एक हत्ती मिळाला होता त्यामुळें यास स्वगज असेंहि म्हणत. या हत्तीवरून मिरवत असल्यामुळें यास शक्ति असेंहि नामाभिधान मिळालें होतें. सुदासाकडून मारला गेलेला शक्ति निराळा व हा शक्ति वसिष्ठ निराळा. दोहोंत कमींत कमी दहा पिढ्यांचें अंतर आहे. शिवाय त्या सुदासकालीन शक्तीस सगर किंवा स्वगज असें कुठेंच म्हटलेलें नाहीं. या शक्तीस जो मुलगा झाला त्याचेंहि नांव पराशरच होतें. हा दुसरा पराशर. पहिला पराशर सुवर्चस् वसिष्ठाचा पिता होता. या दुसऱ्या पराशरास सगर किंवा स्वगजाचा मुलगा असल्यामुळें सागर किंवा स्वागज असेंहि म्हणत. हा पराशर नुकताच वयांत आला असतां एक दिवस यमुनातीरीं हिंडतांना याचे दृष्टीस एक धीवरबालिका पडली. मुलगी होती काळीच. नांवहि होतें काली. पण तीहि नुकतीच यौवनांत आलेली होती. नाव चालवून लोकांस परतीरीं नेण्याचें काम ती करीत असे. दोघांची दृष्टादृष्ट झाली. दोघेंहि परस्पराकृष्ट झालीं. पराशर परतीरीं जाण्याचें निमित्त करून नावेंत बसला. परतीरीं जाऊन दोघांनींहि क्रीडा केली व परत आल्यावर तिला बरेंचसें धन देऊन पराशर निघून गेला. कुमारी कालीला दिवस गेले. बापानें विचारतां तिनें खरी खरी घडलेली गोष्ट सांगितली. म्हणून तिचें नांव सत्यवती पडलें. यमुनातीरीं ही गोष्ट घडत असतां तिकडे गंगेच्या तीरावर शंतनूस गंगा नांवाची एक सुंदर स्त्री भेटली. तिला हवें तसें वागूं देण्याची तिची अट मान्य करून शंतनूनें तिच्याशीं गांधर्व विवाह केला व तिला आपली राणी केलें.

२४. गंगायमुनातीरीं या गोष्टी घडल्या तेव्हां मनूपासून जवळ जवळ पंचाण्णव पिढ्यांचा काळ लोटला होता. म्हणजे या गोष्टी महाभारत युद्ध-

पूर्वी पांच पिढ्या घडल्या. राम दाशरथीपासून प्रतीपपुत्र शंतनूपावेतों जवळ जवळ पसतीस पिढ्यांचा काळ गेला. या मोठ्या कालखंडांत राजकीय दृष्टीनें फार मोठमोठ्या गोष्टी घडल्याच नाहींत. रामापासून प्रतीपापर्यंतच्या एवढ्या दीर्घ कालांत राजकीय दृष्टीनें कुरु व वसूशिवाय कुठलाच राजा प्रसिद्धीस आला नाहीं. राजे लोकांची विजयाकांक्षा जवळ जवळ थिजल्यासारखीच झाली होती. छोट्या छोट्या राज्यांत लहान लहानशीं भांडणें व्हावयाचीं व तेवढ्या काळापुरतें एका राज्यास दुसऱ्याचे अंकित व्हावें लागावयाचें. या अंकित होण्यासहि फारसें महत्त्व नव्हतें. नियमित खंडणी दिली कीं, एखादा राजा अंकित समजला जाई. याचें थोडें सामर्थ्य वाढलें किंवा दुसरा थोडा दुर्बल झाला कीं खंडणी देणें बंद होई व पुन्हा तें राज्य स्वतंत्र समजलें जाई. राजे लोकांत रोगहि या काळीं उद्भवलेले दिसतात. कोसल देशचा ब्रह्मदत्तकालीन अग्निवर्ण विषयोपभोगाच्या अतिरेकामुळें राजयक्ष्मा होऊन कालवश झाला. देवापीस श्वेतकुष्ठासारखा रोग जडला. बरेचसे राजे या कालांत अल्पायुषी निघाले. याप्रमाणें राष्ट्रांत थोडथोडी अवनतीची कळा दिसूं लागली. पण या कालांत विद्येची मात्र चांगली वृद्धि झाली. काव्य, संगीत, वैद्यक, ज्योतिष, गणित, लेखन इत्यादि गोष्टी वाढल्या व म्हणूनच या कालखंडास 'विद्येची वाढ' असें नांव दिलें आहे.

☆ ☆ ☆

सर्ग सातवा

महाभारत

१. आतांपर्यंत दिलेल्या सहा सर्गांत आपण जवळ जवळ पंचाण्णव पिढ्यांचा इतिहास—राजकीय व सांस्कृतिक—पाहिला. या शेवटल्या सर्गांत शेवटल्या पांच पिढ्यांचा इतिहास पाहावयाचा आहे.

२. शंतनूनें गंगेशीं लग्न केलें व काली सत्यवतीस पराशर—समागमामुळें दिवस गेले या गोष्टी गेल्या सर्गाचे शेवटीं सांगितल्याच आहेत. दिवस पूर्ण झाल्यावर कालीस मुलगा झाला. बापानें यमुनेच्या एका बेटांत तिला ठेविलें होतें व तेथेंच ती प्रसूत झाली. मुलाचें नांव जातूकर्ण असें ठेविलें गेलें. अविवाहित कन्येस हा झाल्यामुळें यास कानीन असेंहि म्हणत. इकडे शंतनु—स्त्री गंगाहि गर्भवती झाली. योग्य कालीं झालेल्या मुलास ही गंगेंत फेंकण्यासाठीं तयार झालेली पाहून शंतनूनें तिला आडकाठी केली. हवें तसें वागूं देण्याची अट मोडल्यामुळें व तिला तिच्या इच्छेविरुद्ध वागावयास लावल्यामुळें मुलास शंतनूजवळ ठेवून गंगा शंतनूस सोडून गेली. शंतनूनें मुलाचें नांव ठेविलें देवव्रत. शंतनूचें या मुलावर अत्यंत प्रेम होतें. त्यानें यास लहानाचा मोठा केलें व वयांत येतांच यौवराज्यपदीं याची स्थापना केली. देवव्रत शंतनूचें प्रेमसर्वस्व असल्यामुळें शंतनूचे मनांत पुनश्च विवाह करण्याची कल्पनाहि आली नाहीं.

३. तिकडे सत्यवतीनें व तिच्या पित्यानें त्या कानीनपुत्र जातूकर्णाचाहि विवाह करून दिला. कानीन म्हणून जातूकर्ण त्या कृष्णद्वीपांत—यमुनेच्या बेटांतच—अप्रकटपणें राही. हा फार बुद्धिवान् असल्यानें यानें त्या कालीं

माहीत असलेल्या बहुतेक विद्या आत्मसात् केल्या व त्या कृष्णद्वीपांतच झालेल्या आपल्या मुलाचें नांव 'कृष्णदीप ज्याचें स्थान आहे' अशा अर्थाचें 'कृष्ण–द्वैपायन' ठेविलें. विवाह न झालेली सत्यवती तरुणावस्थेंत असतांनाच आजी झाली. हिच्या सौंदर्यावर मोहित होऊन एका काश्यप असित ऋषीनें हिला मागणी घातली. पण सत्यवती किंवा तिचा बाप दोहोंच्याहि मनांत ब्राह्मणांविषयीं फारसा आदर नसल्यामुळें दोघांनींहि ती मागणी नाकारली आणि सत्यवती विवाह न करितांच राहून व आपलें नांव चालविण्याचें काम करून स्वतःची व वृद्ध पित्याची उपजीविका चालवूं लागली. राजा शंतनु एक दिवस फिरतां फिरतां या बाजूस आला व यमुना पार करण्यास हिच्याच नावेंतून निघाला. प्रौढ विधुरावस्थेंत असलेला शंतनु व तशाच अविवाहित स्थितींत असलेली काली या उभयतांची दृष्टादृष्ट झाली व दोघेंहि परस्पराकृष्ट झालीं. शंतनूनें लग्नासाठीं विचारणा केली, पण बापलेकींनीं एकच अट घातली. ती अशी कीं, राज्य देवव्रतास न मिळतां हिच्या मुलास मिळालें पाहिजे. देवव्रतावरील प्रेमामुळें शंतनु ही अट मान्य करण्यास तयार झाला नाहीं, पण त्याची स्थिति मात्र मोठी चमत्कारिक झाली. मुलाचा ओढा व कालीची ओढ दोनहि गोष्टी सुटेनात व या ओढाओढींत सांपडल्यामुळें कांहींहि सुचेना, अशी शंतनूची अवस्था झाली.

४. शंतनु जसा पुत्रवत्सल होता तसाच देवव्रतहि पितृभक्त होता. बापाची स्थिति बरी नाहीं, कुठल्यातरी गोष्टीसाठीं तो झुरत आहे ही गोष्ट देवव्रताच्या लक्ष्यांत येण्यास फार काळ लागला नाहीं. त्यानें या गोष्टीचा छडा लावण्याचें ठरविलें व लवकरच साऱ्या गोष्टी त्यास समजल्या. आपला पिता आपल्यामुळें दुःखी व्हावा ही स्थिति देवव्रतास असह्य झाली व तो स्वतः कालीच्या पित्याजवळ गेला व बापासाठीं कालीचीं मागणी त्यानें केली. 'मी राजा होणार नाहीं, राज्य हिच्याच मुलास मिळेल' असें देवव्रतानें मान्य केलें, तरीहि तो धीवर ही गोष्ट मान्य करीना. धीवर खराच धी–वर होता. त्यानें अशी शंका प्रकट केली कीं, 'तुम्ही जरी राज्य हिसकलें नाहीं तरी तुमचीं मुलें पुढें तसें करतील!' पण देवव्रतहि कांहीं कमी नव्हता. त्याची शंका मुळापासूनच उपटून टाकण्यासाठीं त्यानें अशी भीमप्रतिज्ञा केली कीं, 'मी आजन्म ब्रह्मचर्यानें राहीन.' या भीमप्रतिज्ञेमुळें 'प्रतिज्ञा केली महाभीम

म्हणवुनी नाम पडिलें भीष्म ' देवव्रत भीष्म म्हणविला जाऊं लागला. धीवराचें समाधान झालें. शंतनु व काली सत्यवती यांचा विवाह झाला व आपल्याच प्राचीन पूर्वज ययातीप्रमाणें शंतनूहि सुखोपभोगांत रममाण झाला. कालीपासून दोन मुलेंहि त्यास प्राप्त झाली. एकाचें नांव विचित्रवीर्य ठेवलें व दुसऱ्याचें चित्रांगद. हीं दोन मुलें झाल्यानंतर शंतनु लौकरच कालवश झाला.

५. याच सुमारास द्रिमीढ कुलांतल्या उग्रयुध राजास विजिगीषा उत्पन्न झाली. त्यानें उत्तर पांचालच्या राजास व राजपुत्रास ठार मारिलें व त्या राजाच्या पृषत नांवाच्या नातवास पळवून लाविलें. तो दक्षिण पांचालच्या कांपिल्य नगरींत लपून राहिला. हें समजल्यामुळें उग्रायुधानें दक्षिण पांचालावर स्वारी केली व तेथील ब्रह्मदत्तवंशज दुर्बुद्धि जनमेजयाचाहि प्राण घेतला. पृषत मात्र लपूनच राहिला होता. शंतनूच्या मृत्यूनंतर उग्रायुधानें कौरव राज्यावरहि हल्ला केला. पण तेथें देवव्रत भीष्म आपल्या सापत्न लहान भावांचा संरक्षक होता. त्यानें मोठ्या शौर्यानें उग्रायुधाशीं लढाई केली व त्या युद्धांत पांचाल देशच्या राजांस व राजपुत्रांस ठार करणाऱ्या उग्रायुधास आपल्या दुष्कृत्याचें फळ भोगण्यासाठीं स्वर्गलोकीं पाठविलें. हें पाहून कांपिल्य नगरांतून पृषत बाहेर पडला व भीष्मास शरण गेला. भीष्मानें दया करून उत्तर पांचालच्या अहिच्छत्रा नगरींत पृषतास गादीवर बसविलें व दक्षिण पांचाल पौरव राज्यांत समाविष्ट करून घेतलें. याप्रमाणें काली सत्यवती पुत्रांचें राज्य भीष्मानें वृद्धिंगत केलें. हे मोठे झाल्यावर वडील भाऊ चित्रांगद गादीवर बसला पण तो एका युद्धांत मारला गेल्यामुळें राज्य विचित्रवीर्यास मिळालें. भीष्म संरक्षक राहिला.

६. विचित्रवीर्य राजा होईपावेतों त्याचें लग्न झालेलें नव्हतें. काशिराजानें आपल्या तीनहि मुलींचें तथाकथित स्वयंवर मांडलें होतें. जो सर्वांत समर्थ ठरेल व ज्याशीं लढावयास कोणी तयार होणार नाहीं त्यानें या तीनहि मुली न्याव्या अशी अट घातली होती. अट ऐकून भीष्म तेथें गेला व कोणाचेंहि त्यास विरोध करण्याचें सामर्थ्य न दिसल्यामुळें अंबा, अंबिका व अंबालया नांवाच्या तिन्ही मुली त्यानें जिंकून आणल्या व विचित्रवीर्याशीं त्यांचा विवाह करण्याचें ठरविलें. तिघींपैकीं वडील अंबेनें भीष्मास स्पष्टपणें

सांगितलें कीं, 'माझें प्रेम शाल्वराजावर बसलेलें आहे'. हें ऐकून भीष्मानें तिला शाल्वाकडे पाठविलें. पण भीष्मानें जिंकून नेल्यामुळें तो तिच्याशीं लग्न करीना, या स्थितींत आपल्या आयुष्याचा नाश भीष्मानें केला या भावनेनें जळफळतच तिनें आत्महत्या करून घेतली. अंबिका व अंबालया दोघींचाहि विवाह विचित्रवीर्याशीं झाला व कांहीं दिवस त्यानें सुखानें घालविले. पण दुर्दैवास तें पाहवलें नाहीं. विचित्रवीर्य थोड्याच दिवसांनीं ऐन तारुण्यांत मरण पावला व सत्यवतीच्या दोघीहि सुना विधवा झाल्या.

७. त्या काळीं क्षत्रियकुलांत जसा भीष्म प्रसिद्ध झाला तसाच ब्राह्मण-कुलांत कानीन जातूकर्णाचा मुलगा द्वैपायन होऊन गेला. भीष्मापेक्षां हा वयानें लहान असला तरी पण विद्येनें फार मोठा होता. लहान वयांतच आपल्या प्रकाण्डपंडित पित्याजवळून हा सर्व विद्या शिकून कृष्णद्वीपाच्या बाहेर पडला व आपल्या ज्ञानानें त्यानें सर्वांस थक्क करून सोडलें. हा आपणास पाराशर्य म्हणवी. द्वैपायन विलक्षण तीव्रबुद्धि होता. ब्रह्मदत्ताच्या वेळेपासून जें वेदांचें संहितीकरण चालू होतें तें पुरें करून यानें त्याचें योग्य विभाजनहि केलें. तोंपावेतों गद्य मंत्र यजुस्, छंदोबद्ध मंत्र ऋक् व गानबद्ध मंत्र साम असें म्हटलें जाई. द्वैपायनानें यज्ञकर्म पुढें ठेवून अध्वर्यु, होता व उद्गाता या ऋत्विजांच्या कामाचे दृष्टीनें वेदविभाग केले. ज्या मंत्रांचा–ते गद्य असोत कीं पद्य असोत–प्रत्यक्ष यजन करण्यांत उपयोग होई, ते एकत्र करून त्यांचा यजुर्वेद बनविला. याप्रमाणें अध्वर्युकर्मास लागणारे मंत्र निराळे काढिले व त्या मंत्रांचा विनियोग कसा करावा हेंहि ठरवून टाकिलें. होत्यास लागणारे व इतर सारे छंदोबद्ध मंत्र एकत्र करून त्यांची ऋक्संहिता तयार केली व सामगानास योग्य असे सारे मंत्र–मग ते ऋग्वेदांतले असोत कीं बाहेरचे असोत– गोळा करून त्यांची सामवेद संहिता तयार केली. यज्ञकर्मासाठीं लागणाऱ्या या तिन्ही वेदांस मिळून वेदत्रयी किंवा त्रयी असें म्हणत. यज्ञकर्मांत ज्यांचा उपयोग नाहीं, अशा इतर कर्मोपयोगी मंत्रांचें एकीकरण करून त्यास अथर्व वेद असें नांव दिलें गेलें. याप्रमाणें समस्त वेद नीट रीतीनें व्यस्त केल्यामुळें म्हणजे नीट विस्तारपूर्वक विभागिल्यामुळें द्वैपायनास वेदव्यास किंवा व्यास असेंच नामाभिधान प्राप्त झालें.

८. व्यास नुसत्या वेदांच्याच संहिता करून राहिला नाहीं. त्यानें विचार केला कीं, या ज्ञानाचा उपयोग मर्यादितच राहणार. यज्ञ किंवा तत्सम कर्में करणाऱ्यांसच या संहितांचा उपयोग होणार. पण सामान्य माणसांस ज्ञानप्राप्ति कोणत्या प्रकारची व कशी व्हावयाची ? यासाठीं मगध देशांत मुख्यत्वें व अन्यत्र जे राजवंशविषयक इतिहासज्ञान विखुरलेलें होतें तेंहि सारें या बुद्धिमान् पुरुषानें गोळा केलें आणि

वंशैर्वंशानुचरितैर्गाथाभिः कल्पजोक्तिभिः ।
पुराणसंहितां चक्रे पुराणार्थविशारदः ॥

म्हणजे जुन्या गोष्टींत पंडित असलेल्या या व्यासानें, वंश, वंशानुचरित, लोकांत प्रचलित असलेलीं लोकगीतें व त्यासारख्याच जुन्या कालांत निर्माण झालेल्या म्हणी या सर्वांचा समावेश करून पुराणसंहिताहि निर्माण केली. हा नुसत्या संहिता निर्माण करूनच राहिला नाहीं तर त्या त्या ज्ञानाचें विभागवार शिक्षण देऊन यानें फार मोठी शिष्यपरंपरा निर्माण केली. ऋग्वेद शिकणाऱ्या याच्या शिष्यांत पैल, यजुर्वेदाचें अध्ययन करणाऱ्या शिष्यवर्गांत वैशंपायन, सामगान करणाऱ्या विद्यार्थ्यांत जैमिनि, अथर्व मंत्रांचा अभ्यास करणाऱ्यांत सुमंतु आणि पुराणग्रंथांची ज्ञानप्राप्ति करून घेणाऱ्यांत लोमहर्षण हे फार प्रसिद्ध होऊन गेले. व्यास आपल्या आजीस सत्यवतीस मधूनमधून भेटत राही व भीष्महि या तरुण, तेजस्वी व तीव्र-बुद्धि ब्राह्मणाचा फार आदर करी. व्यासाचा विवाहहि झाला. याच्या स्त्रीचें नांव अरणी. अरणीपासून जसा अग्नि उत्पन्न होतो तसा या अरणीपासूनहि व्यासास एक तेजस्वी मुलगा झाला. याचें नांव शुक.

९. इकडे शंतनूचा वंश खुंटण्याची वेळ आली. सत्यवतीस मोठा विचार पडला. भीष्माला आपली प्रतिज्ञा कायम ठेवण्याचें आतां कांहीं कारण उरलें नव्हतें. कारण त्याची प्रतिज्ञा सत्यवतीच्या वंशजांच्या राज्यप्राप्तीच्या आड आपण येऊं नये एवढ्याचसाठीं होती. पण आतां सत्यवतीचा वंश जवळ जवळ संपलाच होता. तिनेंहि भीष्मास परोपरीनें सांगून पाहिलें. पण भीष्म आपल्या प्रतिज्ञेपासून तिळमात्र ढळला नाहीं. भीष्मानें लग्न केलें असतें व वंश चालविला असता तर पुढचें महाभारत टळलें असतें. पण भीष्माची प्रतिज्ञा सशर्त नव्हती. प्रतिज्ञा करतांना नुसतें आजन्म ब्रह्मचारी

राहण्याचें त्यानें म्हटलें होतें व ती प्रतिज्ञा त्यास तशीच पाळणें सत्याच्या दृष्टीनें आवश्यक होतें. तेव्हां सत्यवती व भीष्म उभयतांच्याहि मतें दोघीहि विधवा स्नुषा अंबिका व अंबालया यांचे ठिकाणीं क्षेत्रज पुत्र निर्माण करावे असें ठरलें. नियोग विधीनें पुत्रोत्पादन करण्यास तरुण व्यास अत्यंत योग्य समजला गेला व त्यास तशी गळ घातली गेली. व्यासानें ती गोष्ट मान्य करून अंबिकेपासून एक व अंबालिकेपासून एक अशीं दोन मुलें निर्माण केलीं. पण दैवानें मोठासा हात दिला नाहीं. अंबिकासुत अंधळा जन्मला. त्याचें नांव ठेवलें गेलें धृतराष्ट्र. अंबालयेला जो पुत्र झाला तो जन्मापासूनच पंडु रोगानें युक्त असल्यामुळें त्यास पांडुच म्हणूं लागले. दगडापेक्षां वीट मऊ या नात्यानें आंधळ्यापेक्षां पंडु रोगी बरा असें ठरवून पांडूस राजा केलें. भीष्मानें गांधार देशांतली एक मुलगी आणून त्या गांधारीशीं धृतराष्ट्राचें लग्न लावून दिलें व कुंति व मद्रदेशांतल्या दोघी मुलींशीं पांडुराजाचा विवाह केला. या गांधारीप्रमाणेंच या दोघींचीं नांवें अनुक्रमें कुंती व माद्री अशींच प्रसिद्ध आहेत.

१०. हस्तिनापुर राज्यांत व कौरव वंशांत या गोष्टी होत असतां भारतवर्षाच्या इतर राज्यांत काय होत होतें, हें पाहणेंहि अवश्य आहे. यादवांचीं अंधक व वृष्णि हीं कुलें त्या वेळीं प्रसिद्ध होतीं. अंधक कुलांत उग्रसेन राजा व कंस युवराज होता तर वृष्णिवंशांत शूर राजा होता व युवराजाचें पद वसुदेवाकडे होतें. उग्रसेनाची मुलगी देवकी वसुदेवास दिली होती. या वसुदेव देवकीचाच मुलगा कृष्ण. द्विमीढ कुलांत सुवीर राज्य करीत होता आणि पांचालदेश भीष्मानें गादीवर बसविलेल्या पृषतपुत्र द्रुपदाचे ताब्यांत होता. मगध देशचा राजा जरासंध फार पराक्रमी असून यास सारे राजे बरेच भीत असत. चेदिवंशांत दमघोषाची कारकीर्द चालू होती. याला च पुढें शिशुपाल नांवाचा मुलगा झाला. आनवंशाचें राज्य विश्वजित् नांवाचा राजा चालवीत होता, तर अयोध्याधिपति होता अमर्ष आणि विदेह राजा होता बहुलाश्व. नर्मदेच्या दक्षिणेस विदर्भ देशांत भीमकाचें राज्य चाललें होतें. यालाच पुढें रुक्मिणी नांवाची मुलगी झाली जिचें कृष्णाशीं लग्न झालें.

११. कौरव वंशांतील धृतराष्ट्रास अनेक मुलें झालीं ज्यांत गांधारीपासून

झालेले दुर्योधन व दुःशासन हे प्रमुख पुत्र होते. पांडूच्या दोन स्त्रिया कुंती व माद्री. पैकीं कुंतीस धर्म, भीम व अर्जुन अशीं तीन व माद्रीस नकुल व सहदेव हें जुळें अशीं पांच मुलें पांडूचीं होतीं. पांडु जिवंत असेपावेतों राजा कोण याचा वाद निघाला नाहीं व तो निघणेंहि शक्य नव्हतें. पण पांडुहि फार दिवस जगला नाहीं. त्याबरोबर त्याची दुसरी स्त्री माद्री सती गेली. पांडूनंतर प्रश्न निघाला कीं, आतां राज्य कोणाचें ? धृतराष्ट्र वयानें वडील असल्यामुळें त्याच्या मुलांचें कीं पांडु राजा होता त्यामुळें त्याच्या मुलांचें ? हीं मुलें लहान असतांनाच संरक्षक या नात्यानें भीष्मानें या प्रश्नाचा निकाल लावून टाकला असता तर तो वाद पुढें वाढलाच नसता. परंतु धर्म व सत्य या बाबतींत भीष्माचीं कांहीं विशिष्ट प्रकारचीं मतें होतीं. कोणत्याहि पक्षास अन्याय होऊं नये यासाठीं त्यानें हा प्रश्न पुढें ढकलला व दोन्ही पक्षांस न्याय देण्याची इच्छा असूनहि भीष्माकडून कोणत्याहि पक्षास पूर्णपणें न्याय मिळाला नाहीं आणि पांडुपुत्र पांडवांचें व धृतराष्ट्राचीं मुलें ज्यांस कौरव म्हणत त्यांचें वैमनस्य वाढत जाऊन शेवटीं भारतवर्षांत या भाऊबंदकीमुळें महाभारत युद्ध घडूनच आलें.

१२. मागें रामायणाचा विचार करितांना ज्या गोष्टी सांगितल्या, त्या साऱ्या काव्याची गोष्ट सोडून महाभारत ग्रंथासहि लागू पडतात. महाभारतयुद्धानंतर व्यासानें जय नांवाचा इतिहास लिहिला, पुढें त्याचें भारत व मग महाभारत झालें ही गोष्ट मागें सांगितलीच. रामायणाप्रमाणेंच महाभारतांतहि कल्पनेसच पटणाऱ्या पण तर्कास न पटणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. इतिहास या दृष्टीनें विचार करतांना मीं त्या विचारांत घेतल्या नाहींत ही गोष्ट स्पष्टपणें येथें सांगून ठेवावयास हवी. महाभारत ग्रंथाकडेहि भावनेनें पाहणारे असंख्य लोक आहेत. मीहि भावनेनें पाहतों तेव्हां त्या लोकांसारखेंच समजतों. पण ऐतिहासिक दृष्टीनें पाहात असतां मी भावनेस त्या दृष्टीचे आड येऊं देत नाहीं. भारतकथा भारतीयांस इतकी परिचित आहे कीं, तिची जशीची तशीच आवृत्ति करणें म्हणजे चर्वित चर्वणच होणारें आहे. सबब संक्षिप्त इतिहासाचे रूपांतच मी ती कथा सांगणार आहें. त्याबरोबरच त्या इतिहासांतून जे सांस्कृतिक सिद्धान्त ध्वनित होतात त्यांचेंहि निरूपण ओघानें करणार आहें.

१३. कौरवपांडवांत लहानपणापासूनच प्रेमाचा अभाव होता. लहान-

पर्णीहि हे खूप भांडत व भांडणांतहि पांची पांडव एका बाजूस व कौरव दुसऱ्या बाजूस असेंच दृश्य दिसे. लहान मुलांच्या भांडणांत मोठ्यांनीं न पडणेंच बरें असतें. ते जेव्हां या भांडणांत पडतात तेव्हां मुलांस तर न्याय मिळतच नाहीं, उलट मोठ्यांचींहि मनें कलुषित होतात. कारण मनुष्यानें निःपक्षपणाचा कितीहि आव आणला तरी ,तो खरा होऊं शकत नाहीं. प्रत्येक माणसाच्या राग–द्वेषप्रवृत्ति भिन्न व त्या प्रकृतीप्रमाणेंच त्याची वागणूक होते. कौरवपांडवांच्या वागतींतहि तसेंच झालें व या मुलांप्रमाणेंच वडील माणसांतहि तट पडले. असो. मुलें मोठीं झालीं व क्षत्रियोचित धनुर्विद्या शिकविण्याचा प्रश्न भीष्मापुढें उभा राहिला. त्या कालीं प्रचलित पद्धति अशी होती कीं, मुलांस विद्यार्जनासाठीं गुरुगृहीं पाठवावयाचें व तेथें विद्यासंपन्न होऊन मुलांनीं परत यावयाचें. या पद्धतीमुळें गुरुगृहीं राहतांना सर्वांसच–मग तो गरीब असो कीं राजपुत्र असो–सारखेंच राहावें लागे व सारखेच कष्ट करावे लागत. याप्रमाणें या मुलांसहि कुठें तरी पाठविणें अवश्य होतें किंवा संरक्षक या नात्यानें त्यांस भीष्मानेंच घरीं शिकवावयास हवें होतें. पण तसें न करितां भीष्मानें मुलांस गुरुगृहीं न पाठवितां गुरूसच आपल्या घरीं आणून ठेवावयाचें ठरविलें. पण असा आचार्य मिळावयाचा कसा ही चिंता भीष्मांस पडली. सुदैवानें म्हणा कीं दुर्दैवानें, पण भीष्मास असा आचार्य सांपडला. याचें नांव द्रोण.

१४. द्रोण हा अंगिरस कुलोत्पन्न भरद्वाजवंशीय एका गरीब ऋषीचा मुलगा. याची विद्या अग्निवेश नांवाचे ब्राह्मणाच्या गंगाद्वाराजवळ असलेल्या आश्रमांत झाली. याच आश्रमांत पृषतपुत्र द्रुपदाचीहि धनुर्विद्या शिक्षा झाली. दोघेहि या विद्येंत पारंगत होते. विद्यार्जन संपल्यावर द्रुपद पांचालांत जाऊन राज्य करूं लागला व द्रोण लग्न करून आपला संसार चालवूं लागला. द्रोणाच्या मुलाचें नांव अश्वत्थामन्. मुलाचा दूध पिण्याचा हट्ट पुरविण्यासाठीं हा द्रुपदास गुरुबंधु समजून त्याजवळ गाय मागण्यासाठीं गेला. पण द्रुपदानें ओळखहि न दाखवून याचा अपमान केला. या अपमानाचा सूड उगविण्यास्तव व मुलाचें कोड पुरविण्यास्तव काय करावें या विचारांत फिरत असतां द्रोणास हस्तिनापुराचे बाहेर मैदानांत हीं मुलें खेळतांना दिसलीं.मजेनें म्हणून यानें आपल्या धनुर्विद्येचें कौशल्य या कौरव–पांडवांस दाखविलें.

विलें. मुलांवर छाप पडली व घरीं आल्यावर त्यांनीं भीष्मास द्रोणाची गोष्ट सांगितली. भीष्म द्रोणास भेटला, विचारपूस केली व गायच नव्हे तर मोठें ऐश्वर्य देण्याचें कबूल करून आपल्या नगरांत राजपुत्रांचा गुरु म्हणून आणून ठेविलें.

१५. द्रोणाचें दारिद्र्य दूर झालें, पण त्याबरोबरच त्याचें स्वातंत्र्यहि नष्ट झालें. आतां कुणास काय शिकवावें व काय शिकवूं नये, ही बाब शिक्षकाचे हातीं न राहतां त्यास शिक्षक म्हणून ठेवणाऱ्याचे हातीं गेली. यामुळेंच एकलव्यासारखा बुद्धिवान् पण वनवासी भिल्ल जेव्हां द्रोणाजवळ धनुर्विद्या शिकावयास आला, तेव्हां या उच्चश्रेणीच्या मुलांबरोबर त्यास शिकवावयाचें द्रोणानें नाकारलें. 'अर्थस्य पुरुषो दासः' या म्हणीची याप्रमाणें विद्यादानाविषयींचें आपलें स्वातंत्र्य गमावून द्रोणानें सार्थकता करून दाखविली. एवढेंच नव्हे तर जेव्हां एकलव्यानें आपल्या परिश्रमानें व गुरुभक्तीनें आपलें धनुर्विद्यानैपुण्य द्रोणाच्या प्रिय विद्यार्थ्यांपेक्षांहि अधिक सिद्ध केलें, तेव्हां या शिक्षकानें त्याचें तें नैपुण्य कमी करण्यासाठीं त्याचा अंगठाहि कापून घेतला व आपली पक्षपात वृत्ति सिद्ध केली. सारांश काय कीं, उपजीविकेसाठीं विद्येचा उपयोग होऊं लागला व विद्यादान करणाऱ्यांची स्वतंत्रता नष्ट झाली कीं, शिक्षकाचा दर्जा खालावतो व कालिदासानें म्हटल्याप्रमाणें त्यास 'ज्ञानपण्य वणिक्' म्हणवून घ्यावें लागतें. आजच्या पोट भरण्यासाठीं नौकरीसाठीं शिकविण्याचें काम करणाऱ्या आम्हां पोटभरू परतंत्र शिक्षकांचा मूळ पुरुष द्रोणच होय.

१६. मागें अंधक व वृष्णि या दोन यादव कुलांतील देवकी व वसुदेव यांचा विवाह झाल्याचें व त्यांचा मुलगा कृष्ण असल्याचें सांगितलेंच आहे. हा कृष्ण म्हणजे आमच्या पुराणेतिहासांतील फार मोठा पुरुष होय. याच्या इतका प्रसिद्ध इतर कोणी झालाच नाहीं. दाशरथि रामाप्रमाणें हा वासुदेव कृष्णहि देवाचा अवतार मानला गेला, इतकेंच नव्हे तर हा 'कृष्णस्तु भगवान् स्वयम्' असाहि म्हटला गेला. पण यामुळेंच पुराणकवींनीं याच्या जन्मापासूनच असें कल्पनांचें जाळें विणलें कीं, त्यांतून ऐतिहासिक कृष्णाचें खरें दर्शन घडणेंहि अशक्य झालें आहे. या कविकल्पनेच्या कथा इतक्या परस्परविरोधी भासतात कीं, गोपालकृष्ण व वासुदेवकृष्ण एकच नसून या दोन निरनिराळ्या व्यक्ति असाव्यात असाहि अनेक विद्वानांचा समज झाला

आहे. या साऱ्या कथा इतक्या चिरपरिचित आहेत कीं, त्यांची पुनरावृत्ति करणें अनावश्यक आहे. तेव्हां ऐतिहासिक दृष्टीनें जेवढें सांगावयाचें तेवढेंच येथें देत आहें. या ठिकाणींहि रामचरित्र सांगतांना भावनादृष्टि व ऐतिहासिक दृष्टि यांतील जो भेद पूर्वी सांगितला आहे, त्याची मात्र आठवण दिली पाहिजे.

१७. यादवराज्यांत नक्षत्र विद्येची वाढ झाल्याचें आपल्यास माहीतच आहे. या विद्येंतूनच फलज्योतिष हा भाग निघाला व त्यावर कांहीं लोकांचा तरी विशेष विश्वास बसला असावा असें दिसतें. एका ज्योतिष्यानें वसुदेवाचा मुलगा कंसास मारील असें भविष्य सांगितल्यामुळें कंसानें वसुदेव व देवकी या दोघांसहि आपल्या नजरेखालीं प्रतिबंधांत ठेविलें. या बंदिवासांतच कृष्णजन्म झाला. जन्म होतांच वसुदेवानें कोणास न कळतां गोकुळांत राहणाऱ्या आपल्या नंद नांवाचे मित्राचे स्वाधीन यास केलें. तेथें नंदपत्नी यशोदेजवळच हा लहानाचा मोठा झाला. गोप व गोपी यांचें कृष्णावर अतोनात प्रेम होतें. त्यांत राधेचा तर हा अत्यंत आवडता होता. कंसास हें वर्तमान कळल्यावर कृष्णाचा प्राण घेण्याचे त्यानें अनेक प्रयत्न केले, पण ते सारे निष्फळ झाले. शेवटीं कंसानें यास मथुरेस आणण्यासाठीं अक्रूर नांवाच्या यादवास पाठविलें. तो कृष्णास घेऊन आला पण कृष्णाला मारण्याचा कट कंसावरच उलटला व कृष्णानेंच कंसास ठार मारिलें आणि तो मथुरेचा राजा झाला. पुढें कंसाचा सासरा मगधदेशाधिपति जरासंध यानें कंसाचा सूड उगविण्यासाठीं मथुरेवर बऱ्याच वेळा स्वाऱ्या केल्या.हा त्रास चुकविण्यासाठीं कृष्णानें आपली राजधानी मथुरेहून द्वारकेस नेली. पुढें विदर्भ देशाचा राजा भीमक यानें चेदिराज शिशुपालाशीं आपल्या रुक्मिणी नांवाच्या मुलीचें लग्न ठरविलें. पण तें तिला न आवडल्यानें तिनें कृष्णास चोरून एक पत्र पाठविलें व त्याप्रमाणें कृष्णानें येऊन तिचें हरण केलें आणि तिच्याशीं लग्न लाविलें. यानें बऱ्याच दुष्ट राजांचा पराभव केला व प्रजेस सुखी केलें.

१८. इकडे द्रोणाचार्यांनीं कौरवपांडवांस धनुर्विद्येंत निपुण केलें. या सर्वांत अर्जुन या विद्येंत फार तरबेज झाला. याच्याच साह्यानें द्रोणानें द्रुपदावर स्वारी केली व त्यास हारवून आपल्या अपमानाचा सूड उगविला.

नंतर उत्तर पांचालाचा भाग आपल्याकडे ठेवून बाकीच्या भागावर द्रुपदासच राजा केलें. दुर्योधनानें पांडवांचा नाश करण्यासाठीं अनेक प्रयत्न केले, पण त्यांत त्यास यश आलें नाहीं. पुढें द्रुपदकन्या द्रौपदीसाठीं द्रुपदानें ठरविलेला मत्स्यभेद करून अर्जुनानें आपलें धनुर्विद्याकुशलत्व दाखविलें व द्रौपदी मिळविली. राज्य चालविण्याजोगें पांडवांचें वय झाल्यावर त्यांस इंद्रप्रस्थ व त्याचे आसपासचा भाग देण्यांत आला. पांडवांनीं तेथें आपला चांगला जम बसवून राजसूय यज्ञ करण्याचें ठरविलें. यासाठीं कृष्णाचे सल्ल्याप्रमाणें भीम अर्जुनकृष्णासह मगध देशांत गेला व तेथें मल्लयुद्ध खेळून त्यानें जरासंधास ठार मारिलें व त्याच्या बंदीशाळेंतले अनेक राजे सोडविले. नंतर अर्जुनानें दिग्विजय करून खूप कीर्ति मिळविली व धर्माचा राजसूय यज्ञ निर्विघ्नपणें पार पडला. नाहीं म्हणावयास शेवटीं कृष्णाची अग्रपूजा झालेली पाहून शिशुपालानें दांडगाई आरंभिली व त्यामुळें कृष्णानें त्यास ठार केलें. याप्रमाणें कृष्णाचे साह्यानें पांडवांची खूप भरभराट झाली.

१९. पांडवांच्या ऐश्वर्याची ही चढती कमान पाहून दुर्योधनाचा जळफळाट झाला व त्यानें आपल्या शकुनिमामाच्या उपदेशाप्रमाणें द्यूताचा व्यूह रचिला. गांधारराज शकुनि या अक्षविद्येंत फार प्रवीण होता. दुर्योधनानें धर्मराजास द्यूतासाठीं आव्हान दिलें व त्या वेळच्या क्षत्रियपंरपरेप्रमाणें धर्म द्यूत खेळण्यासाठीं बसला. डावामागें डाव धर्मराज हरतच गेला. दुर्योधनानें याप्रमाणें धर्माजवळून नुसतें सर्व राज्यच जिंकून घेतलें नाहीं, तर शेवटीं बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवासाचा पण लावून तोहि जिंकला. धर्मराजानें स्वतःस व आपल्या भावांसहि पणास लाविलें व त्या पणांत हरल्यावर द्रौपदीसहि द्यूतांत डावावर लावून धर्म तिलाहि गमावून बसला. पुढें जिंकलेल्या द्रौपदीची अब्रू घेण्याचा प्रयत्नहि दुर्योधनानें केला, पण त्यामुळें सारेच खवळलेले पाहून धृतराष्ट्रानें रदबदली करून तिची सुटका करविली. पांडवांबरोबर बारा वर्षें वनवासांत राहून त्यांजबरोबर ती विराटाचे नगरांत अज्ञातहि राहिली. या सर्व दुःखाचें कारण द्यूतक्रीडा. द्यूतक्रीडेचें वाईट फळ एक नळास मिळालें होतें व दुसरें पांडवांस.

२०. वनवास व अज्ञातवास पुरा केल्यावर तेरा वर्षांनंतर पुन्हा पांडव वावरूं लागले. आतां त्यांस खालीं पाहण्याचें कारणच नव्हतें. विराटानें

आपली मुलगी उत्तरा अर्जुनाचे अभिमन्यु नामक पुत्रास दिली व पांडवांचा सन्मान केला. धर्मानें सारें विसरून राज्याचा अर्धा वांटा किंवा अगदीं किमान पक्षीं पांच गांवें तरी मागण्यासाठीं दुर्योधनाकडे शिष्टाई करण्यास लोक पाठविले. शेवटीं कृष्णानेंहि शिष्टाई केली, पण दुर्योधन कोणाचेंच ऐकण्यास तयार नव्हता. या तेरा वर्षांत त्यानें चांगलीच तयारी केली होती व युद्ध झालें तर आपण जिंकूं अशी त्यास खात्री वाटत होती. सत्रव शिष्टाई करणारांस त्यानें अत्यंत उद्धटपणें उत्तर दिलें कीं, 'पांच गांवें तर काय पण सुईच्या टोंकावर जेवढी माती राहील तेवढीहि युद्धाशिवाय देणार नाहीं.' तेव्हां युद्धाशिवाय दुसरी गतिच राहिली नाहीं. हेंच भारती युद्ध किंवा महाभारत. भरतवर्षांतले सर्वच राजे या युद्धांत कोणत्या ना कोणत्या पक्षास मदत करीतच होते. एवढें मोठें युद्ध तोंपावेतों या देशांत झालेंच नव्हतें. पांडवांचे पक्षांत पश्चिमी देशांतले आनर्त व गुजराथचे यादव, पश्चिमेकडील मागध राजे, दक्षिण पांचाल, मत्स्य, चेदि, काशी व कारुष यांची फौज होती तर कौरव पक्षास पंचनदीय सारे देश, उत्तर भारतांतील राज्यें व दक्षिण भारतांतले सारे राजे यांच्या फौजांची मदत होती. याच युद्धाचे वेळीं अर्जुन मोहव्यास झाला असतां कृष्णानें त्यास उपदेश करून ताळ्यावर आणलें. कृष्णाची सर्व प्रकारें पांडवांस मदत होती. आरंभींचे दहा दिवस कौरवांचें सेनापतित्व भीष्मांकडे असतांना धर्मयुद्ध चाललें होतें. पण भीष्म पडल्यानंतर 'युद्धे तु सकलं क्षम्यम्' ही प्रवृत्ति बळावली व खरेंखोटें कसेंहि करून युद्ध जिंकावयाचें ही कल्पना मान्यता पावली. त्यामुळें पुढील आठ दिवसांत हवीं तशीं अनन्वित कर्में झालीं. असंख्य लोक प्राणास मुकले, दोन्ही पक्षांतील सर्वच मोठमोठे लोक धराशायी झाले, पण पांडवांचा विजय होऊन धर्मराजास हस्तिनापुरचें राज्य मिळालें.

२१. महाभारताची मुख्य कथा येथेंच संपते. भाऊभाऊ एकोप्यानें न राहतां भांडत राहिले तर काय परिणाम होतो याचें महाभारत एक प्रतीक आहे. रामायण व महाभारत एकमेकांच्या अगदीं विरुद्ध आहे. एकांत बंधुप्रीतीनें काय परिणाम होतो हें दाखविलें आहे, तर दुसऱ्यांत बंधुद्वेषामुळें गोष्टी कोणत्या थराला जातात याचें दिग्दर्शन आहे. मानव दुर्बुद्धिवश झाला तर तो दानवाच्या कोटीस कसा जाऊन पोंचतो हेंहि

...क्रमांक ८५६५२ वि: ...मिरज
...२७०३ सं: २०१३।८७

महाभारतावरून चांगलेंच दिसून येतें. तिसरा सिद्धान्त महाभारतापासून निघतो तो असा कीं, धर्म परिस्थितिनिरपेक्ष कधींच राहूं शकत नाहीं. समाजाचें धारण हा धर्माचा प्रधान हेतु असल्यानें परिस्थिति बदलली कीं, त्यासहि बदलावें लागतेंच. परिस्थितीचा विचार न करितां 'जुनें तें सोनें' म्हणून आपण चालूं लागलों तर समाजाचें हित न होतां अहितच होतें. दुसऱ्या पक्षीं परिस्थितीचा पूर्ण विचार करून तदनुसार आपण आपली वागणूक ठेविली व समाजास नवा घडा घालून दिला तरच समाज उन्नत होत जातो. महाभारतांतील भीष्म आणि कृष्ण हे दोन महापुरुष या दोन प्रकारच्या लोकांचीं उदाहरणें आहेत. आजपावेतों चालत आलें म्हणून सोडावयाचें नाहीं, हा भीष्माचा सिद्धान्त कालमानाप्रमाणें नको असेल ती गोष्ट सोडावयाची व बरोबर पटेल ती गोष्ट करावयाची हा कृष्णाचा सिद्धान्त. हे दोन्ही सिद्धान्त नवीन नाहींत. सर्व कालीं व सर्व स्थलीं हे थोडे फार दृष्टीस पडतातच. पण एकाच स्थलीं व एकाच कालीं महाभारतांत जसे हे दिसून येतात तसे अन्यत्र येत नाहींत.

२२. महाभारताचें युद्ध आटोपलें. कौरव सारे नाश पावले. पांडवांचे जे वंशज शिल्लक राहिले होते त्या सर्वांचा अश्वत्थाम्यानें ते झोपेंत गाढ निजले असतां खून केला. केवळ उरला अभिमन्यूचा विराटकन्या उत्तरेच्या उदरांत बीजरूपानें असलेला गर्भ. याचें नांव ठेवलें परीक्षित्. हा परीक्षित् दुसरा. पहिला परीक्षित् चक्रवर्ती कुरूचा मुलगा. हा महाभारती युद्धांत मारल्या गेलेल्या वीर अभिमन्यूचा पुत्र. धर्मराज राजा झाल्यावर धृतराष्ट्र व गांधारी पुत्रशोकानें पीडित होऊन रानांत जाऊन राहिले. तेथेंच एकदा वणवा पेटून यांच्या झोपड्या जळाल्या व त्यांतच या दोघांची राखरांगोळी झाली. थोड्या दिवसांनंतर कृष्णपुत्र सांबामुळें यादवांत भाऊबंदकी माजली व बहुतेक यादव आपसांतच एक दुसऱ्यास मारून समाप्त झाले. 'यादवी' हा शब्द तेव्हांपासूनच प्रचारांत आला. थोड्याच दिवसांनीं कृष्णहि निजधामाला गेला. उरलेलीं बायकामुलें घेऊन अर्जुनाचे संरक्षणाखालीं यादव द्वारका व गुजराथ सोडून निघाले. वाटेंत आभीर लोकांनीं यांस लुटलें. यांपैकीं थोड्यांस अर्जुनानें अर्बुदपर्वताजवळ शाल्व देशांत वसविलें, कांहींस सरस्वती तीरावर स्थापिलें व बाकीच्यांस इंद्रप्रस्थीं आणून ठेविलें. धर्मराज आपल्या

दा. क. १२३२६

भावांसह राज्यत्याग करून हिमाचलावर अरण्यवासास गेला व दुसरा परीक्षित् धर्मराजानंतर हस्तिनापुरच्या राज्याचा अधिपति झाला.

२३. प्राचीन कालचा सुमारें शंभर पिढ्यांचा इतिहास येथें संपला. यापुढें अर्वाचीन कलियुगांतला इतिहास सुरू होतो. पण या संधिकालांतल्या कांहीं घटनांचा विचार करून हा महाभारत सर्ग समाप्त करूं. या महायुद्धांत जो प्रचण्ड क्षत्रियनाश झाला त्यामुळें भारताच्या वायव्यदिशेकडील सारींच राज्यें क्षीण झालीं. हें पाहून बाहेरच्या नागजातीय लोकांनीं स्वाऱ्या केल्या व तक्षशिला येथें आपली राजधानी स्थापन केली. यांनीं हस्तिनापुरावर चढाई केली व यांचे हातून दुसरा परीक्षित् मारला गेला. या परीक्षित्च्या मुलाचेंहि नांव जनमेजयच होतें. पूर्वी दोन जनमेजय होऊन गेल्यानें यास तिसरा जनमेजय म्हटलें पाहिजे. या तिसऱ्या जनमेजयानें पितृवधाचा सूड उगविण्यासाठीं नागांस मारण्याचा सपाटा चालविला. पण आस्तिक नांवाच्या एका महापुरुषानें या पौरव-कौरवांत आणि नाग लोकांत तह घडवून आणला. सरस्वतीतीरावरील व शाल्व देशांतील यादव राज्येंहि टिकलीं नाहींत व पुराणेतिहासाचें भारतवर्षांतील सीमास्थान हस्तिनापुरच राहिलें. यानंतरचा इतिहास निर्धारित केलेल्या विषयांत येत नसल्यानें त्याचा विचार अप्रस्तुत ठरेल म्हणून हा सर्ग येथेंच संपविणें इष्ट आहे.

☆ ☆ ☆

उपसंहार

सज्जनहो,

मला जें मुख्यतः सांगावयाचें होतें, तें सांगून झालें. वैवस्वतमनूपासून महाभारतापर्यंत जवळ जवळ शंभर पिढ्यांचा इतिहास मीं आपणांपुढें गेल्या सात सर्गांत सांगितला. श्रोतृसंख्येंत प्रतिदिनीं वृद्धिच होत गेली. त्यावरून माझ्या सांगण्यांत उत्सुकता वाढविण्याचें सामर्थ्य होतें असें मानण्यास हरकत नाहीं. मीं आरंभींच म्हटलें होतें कीं, 'ज्ञास्यते नवनीतस्य रुचिर्नासाग्रदर्शनात्,' आणि व्याख्यानें देत असतांना मी सारखा आपल्या तोंडाकडेच पाहात असें त्या वेळीं आपल्या चेहऱ्यावर जे भाव उमटलेसे मला वाटले, त्यावरून माझें सांगणें आपणांस अप्रिय वाटलें नाहीं, असें मी समजतों. 'कामी स्वतां पश्यति' असेंहि असण्याचा संभव असूं शकेल.

माझ्या विधानांनीं आपल्या रूढ कल्पनांस कांहीं वेळ हादरे बसले असतील. मला स्वतःलाहि तसे आधीं आधीं बसले आहेत. आपण सारेच ज्या शिक्षणक्रमांतून पार पडलों आहोंत, त्या अभ्यासक्रमांत आपण वाचिलेल्या पाश्चात्त्य ग्रंथांवरून आपल्या मनांत कांहीं कल्पना अशा ठसून जातात कीं, त्या खऱ्या नसतील अशी शंकाहि आपल्या मनांत चुकूनसुद्धां येत नाहीं; आणि त्यामुळें त्या कल्पनांचा फोलपणा कुठून तरी आपणांस दिसूं लागला कीं, आपल्या मनास धक्का बसतो. पण धक्का बसला म्हणून तिकडे पाहावयाचें नाहीं, ही ज्ञानप्राप्तीची वृत्ति खास नव्हे. स्वतःस पूर्णपणें पटल्याशिवाय कुठलीहि गोष्ट स्वीकारावयाची नाहीं, आणि पटली म्हणजे आपल्या कल्पनांच्या पूर्वपरंपरेशीं ती कितीहि विरुद्ध असली तरी ती नाकारावयाची नाहीं, हीच खरी अभ्यासकाची वृत्ति. या वृत्तीनेंच इतकीं वर्षें मीं या

विषयाचा अभ्यास केला व मला जितकें पूर्णपणें पटलें तितकें आपणांपुढें सादर केलें. तेव्हां आपण माझें म्हणणें 'ब्रह्मवाक्य' म्हणून माना असें मी कसें म्हणूं शकेन ? माझा एवढेंच म्हणावयाचा अधिकार आहे कीं, एवढ्या मोठ्या कालखंडाचा कालक्रमयुक्त व बुद्धीस पटेल असा राजकीय व सांस्कृतिक इतिहास इतक्या सुसंगतपणें आपल्यापुढें आलेला नाहीं. याचा एकेक वंशाप्रमाणें उभा व एकेक कालखंडाप्रमाणें आडवा, असे दोनहि प्रकारचे सूक्ष्म अभ्यास अजून व्हावयाचे आहेत. ते आमच्या तरुण, विद्वान् अभ्यासकांनीं करावे व हा आपला प्राचीन इतिहास जो मीं निवळ सांगाड्याचे रूपानें आपणापुढें ठेविला यांचीं अंगप्रत्यंगें समृद्ध करून तो निर्दुष्ट, सुपुष्ट आणि सुदृढ करावा हाच माझ्या या सप्तसर्गात्मक व्याख्यानांचा प्रधान हेतु आहे.

मीं आरंभीं सांगितलेंच आहे कीं, या इतिहासाचा मीं काल ठरविलेला नसून केवल कालानुक्रम निश्चित केला आहे. कालनिर्णय करण्याचा माझा हेतु नव्हता. काल कोणताहि निर्णित झाला तर घटना कांहीं वर्षें अलीकडे किंवा कांहीं वर्षें पलीकडे घडल्या एवढेंच मानावें लागेल. पण काल बदलला तरी घटनांचा अनुक्रम बदलणार नाहीं. हा कालक्रम विद्वन्मान्य झाला व त्यांतील संस्कृतीची वाढ कसकशी झाली हें पटलें तर अनेक गोष्टींचा कालनिर्णय करितां येईल. वैदिक वाङ्मयाविषयीं तर या इतिहासानें अनेक कल्पना सुस्पष्ट होऊन त्यांचाहि कालक्रम ठरविण्यास फार मोठी मदत होणारी आहे. एकच उदाहरण दिलें म्हणजे माझें विधान स्पष्ट होईल. या इतिहासाप्रमाणें हत्ती हा प्राणी माणसाळला जाऊन त्याचा स्वारीसाठीं उपयोग प्रथम पौरव हस्तिन् राजाच्या कालांत म्हणजे महाभारतापूर्वी सुमारें पन्नास पिढ्या या वेळीं झाला. ही गोष्ट जर मान्य झाली, तर रुद्राध्यायांत जेथें सेनेच्या भिन्न भिन्न अंगांचें वर्णन आलें आहे, तेथें हत्तीचें वर्णन स्वाभाविक असतांना न आल्यामुळें त्या वैदिक भागाची रचना झाली, तेव्हां हत्तीचा समावेश सेनेच्या अंगांत झाला नव्हता अशी कल्पना करणें युक्तिविसंगत होणार नाहीं. म्हणजे हा वैदिक भाग हस्तिन् या राजाच्या कालापूर्वी लिहिला गेला, असें मानणेंच युक्तिसंगत ठरेल. त्याचप्रमाणें 'कृणुष्व पाजः' हें सूक्त रचणारा वामदेव गौतम, ज्यानें हत्तीवरून मिरवीत जाणाऱ्या राजाची

अग्नीस उपमा दिली आहे, हा हस्तिन् राजानंतर झाला असें मानण्यास हरकत येणार नाहीं. म्हणून माझी अशी विनंती आहे कीं, विद्वान् लोकांनीं हा कालक्रम तात्पुरता तरी मानून अधिक विचार करावा. कोणताहि लेखक आपल्यापूर्वी घडलेली गोष्ट हवी तेव्हां सांगूं शकतो; पण त्यानें सांगितलेली गोष्ट घडण्यापूर्वी तो ती सांगूं शकत नाहीं. ही गोष्ट लक्षांत ठेवून कालनिर्णय करावयास हवा. विसाव्या शतकांतला कोणताहि लेखक किंवा कवि महाभारतांतली किंवा त्यापूर्वीचीहि गोष्ट लिहूं शकतो. म्हणून त्यानें जें काय लिहिलें त्यावरून तें केव्हां लिहिलें हें ठरविणें धोक्याचें ठरेल; पण एटम बॉंबचा उल्लेख जर एखाद्या ग्रंथांत सांपडला तर तो या आविष्करानंतरचाच मानावा लागेल, यापूर्वीचा मानतां येणार नाहीं.

व्याख्यानें देतांना संदर्भ ग्रंथांची यादी व उल्लेख सांगणें शक्यच नसतें; पण हीं प्रसिद्ध करतांनाहि तें सांगणें मला आवश्यक वाटत नाहीं. मीं सांगितलेल्या व्यक्तींची व गोष्टींची सूची शेवटीं दिलीच जाईल व त्यावरून या सप्तसर्गांपैकीं कुठल्या सर्गांत ती गोष्ट आहे हें सहज सांपडेल; पण त्या गोष्टी कोणकोणत्या जुन्या-नव्या ग्रंथांत कुठें कुठें सांपडतात हें कुठल्याहि चांगल्या संदर्भ ग्रंथांवरून किंवा कोशावरून अभ्यासकांस शोधतां येईल. म्हणून ते सारे उल्लेख सूचीबद्ध करून देण्याची व ग्रंथाचें कलेवर अवास्तव वाढविण्याची आवश्यकता वाटत नाहीं. एकच गोष्ट सर्व ठिकाणीं जर तशीच सांगितलेली असती किंवा मीं ज्या दृष्टीनें ती सांगितली तशीच कथन केलेली असती, तर हा इतिहास केव्हांच लिहिला गेला असता. पण त्या गोष्टींवर पूर्ण विचार करून साधकबाधक प्रमाणांचा मनाशीं निश्चय करून, तर्कास न पटणाऱ्या गोष्टी दूर सारून आणि कांहीं विशेष कल्पना वसवून मीं हा इतिहास आपणापुढें मांडला आहे. या विषयाचें मंडन मीं केलें आहे व त्याचें खंडन करावयाचें असेल तर त्यासाठीं लागणारा पुरावा पुढें मांडण्याची जबाबदारी खंडन करणारावर आहे. उदाहरणार्थ, विश्वामित्र हा पहिला मंत्रद्रष्टा, गायत्री हा प्रथम स्फुरलेला मंत्र, ब्राह्मण म्हणविले जाण्यास त्या मंत्रोपदेशाची आवश्यकता, त्या मंत्रास दिलें गेलेलें प्राधान्य, त्यांतील ' प्रचोदयात् ' या पदास विधायक व निषेधक दोन्ही दृष्टींनीं दिलेलें महत्त्व, इत्यादि गोष्टी मी खऱ्या मानीत आहें. त्या तशा नसतील तर त्या खोट्या ठरविण्याची जबाब-

दारी माझी नाहीं. मीं केलेल्या विधानांचें असें खंडन झाल्यास या इतिहासांत तशी सुधारणा घडून येईल व मीं वर म्हटल्याप्रमाणें तो अधिक निर्दुष्ट व सुपुष्ट होईल. तसा प्रयत्न झाल्यास सूक्तासूक्त ठरविणारे रसिक उचित निर्णय देतीलच व तसा प्रयत्न न झाला तर त्या निर्णायकांस एकतर्फीच निकाल द्यावा लागेल, हें उघड आहे. तेव्हां माझी रसिक विद्वद्वरांस अशी शेवटची विनवणी आहे कीं, त्यांनीं या इतिहासास मान्यता तरी द्यावी नाहींतर त्याचें खंडन तरी करावें. त्याविषयीं निष्फळ अवज्ञा बुद्धि धारण करूं नये. तशी झाल्यास मला भवभूतीच्या भाषेंत खेदपूर्वक म्हणणें भाग पडेल कीं,

ये नाम केचिदिह मे प्रथयंत्यवज्ञां
जानन्तु ते किमपि, तान्प्रति नैष यत्नः ।
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा
कालो ह्यहं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥

माझीं मतें मान्य असलेले कांहीं विद्वान् आज आहेत व पुढें होतील आणि आमचा हा महाभारतपूर्व राजकीय व सांस्कृतिक इतिहास सर्व दृष्टींनीं निर्दुष्ट बनून जगन्मान्य होईल याबद्दल मला स्वतःला तरी यत्किंचितहि संशय वाटत नाहीं.

झालें. माझा उपसंहार संपला. मीं जशी प्रस्तावना लांबविली नाहीं, तसा उपसंहारहि लांबवीत नाहीं. केवळ ज्या नरसिंहाच्या स्मृत्यर्थ हीं व्याख्यानें मीं दिलीं त्या कै. नरसिंह चिंतामण केळकरांचे आत्म्यास या व्याख्यानांनीं संतोष होवो, एवढी इच्छा प्रकट करून व ज्या पुणें विद्यापीठानें मला ती संधि दिली त्या विद्यापीठाचे मनःपूर्वक आभार मानून मी हा उपसंहार पुरा करितों.

इति विद्यातपोयोनिपुण्यपत्तनपंडिताः ।
वागिष्ट्या संतु सुप्रीता नृसिंहस्मृतिमालया ॥
स्मृत्यर्थं यस्य मालेऽयं मया भक्त्या सुगुंफिता ।
नृसिंहस्य स विश्वात्मा प्रीयतां मे जनार्दनः ॥

इति

विशेषनामांची वर्णानुक्रम सूची

टीप-- सूचींतील अंक सर्गाचे व छेदकांचे आहेत. पहिला सर्गाचा. पुढें आडवी रेघ देऊन प्रत्येक छेदकापुढें स्वल्पविराम दिला आहे व सर्ग संपला म्हणजे अर्धविराम दिला आहे.

ॐकारमांधाता (स्थान) २–१४

अ

अंशु (राजा) ५–१०
अंशुमान् (,,) ४–३
अक्रूर (पुरुष) ७–१७
अग्निवर्ण (राजा) ६–२४
अग्निवेश (ऋषि) ७–१४
अङ्ग (देश) ४–२; ५–१०, २२
अंगद (राजा) ६–२
अंगदीया (नगरी) ६–२
अंगार (राजा) २–१३, १५.
अंगिरस् (ऋषि) ३–२;
(कुल) ७–१४
अज (राजा) ५–९, १०
अजमीढ (”) ४–२१, २२; ५–४
अजीगर्त (ऋषि) ३–११
अणुह (राजा) ६–१९
अतिनार (”) २–१२.
अत्रि (ऋषि) २–५; (कुल) २–५, ६, १०, १३, २२, २६; ३–२, ९; ४–१६; ५–१०; ६–१९
अथर्वन् (ऋषि) ३–१५
अथर्वनिधि वसिष्ठ (ऋषि) ५–५
अदृश्यंती (स्त्री) ६–६
अनरण्य (राजा) २–१८, २३; ३–१६
अनसूया (स्त्री) २–२२
अनानत (ऋषि) ६–४
अनु (राजा) १–१४; २–२, ३
अंधक (”) ६–३; (कुल) ६–२२; ७–१०, १६
आम्लवान (ऋषि) १–१३
अभयद (राजा) २–८

अमहीयु (ऋषि) ४–१४
अमावसु (राजा) १–७
अंबरीष (") ४–१५, १९
अंबष्ठ (गण) २–१९
अंबा (स्त्री) ७–६
अंबालथा (") ७–६, ९
अंबिका (") ७–६, ९
अभिजित् (राजा) ६–२१
अभिमन्यु (पुरुष) ७–२०, २२
अमर्ष (राजा) ७–१०
अयुतायु (राजा) ४–१९
अयोध्या (नगरी) १–४; ३–१३; ४–१५, १९; ५–१७; ६–१, २; ७–१०
अरणी (स्त्री) ७–८
अर्चनानस् (ऋषि) ५–९, १०
अर्जुन कार्तवीर्य (राजा) २–२०, २१, २२, २५; ३–१, ५, १८; ६–४.
अर्जुन पार्थ (पुरुष) ७–११, १८, २०, २२
अर्बुद (पर्वत) ३–८; ६–३; ७–२२
अलर्क (राजा) ४–५
अवन्ती (नगरी) ३–१२; ६–३
अविक्षित् (राजा) ३–१३, १४, १५
अवीतरी (नगरी) २–१८; ३–१६
अश्मक (राजा) ४–२२
अश्वत्थामन् (पुरुष) ७–१४, २२
असित (ऋषि) ७–३
अहल्या (स्त्री) ५–१७
अहिच्छत्रा (नगरी) ४–२१; ५–४; ७–५

आ

आनर्त (देश) २–२६; ३–१२; ५–७, २२; ६–३; ७–२०
आनव (देश) २–१२, १७; ६–६; (वंश) २–१९; ३–२, १३, २१; ७–१०.
आपव वसिष्ठ १ (ऋषि) ३–५.
" " २ (") ३–१८, १९; ६–४
आभीर (जाति) ७–२२
आयु (राजा) १–७, ८
आवन्त (गण) ३–१२
आस्तिक (ऋषि) ७–१३

इ

इक्ष्वाकु (राजा) १–४, ५
" (वंश) ५–८
इन्दुमती (स्त्री) ५–९
इन्द्र (पदवी) १–१२, १३; ६–१०
इन्द्रप्रस्थ (नगर) ७–१८, २२
इन्द्रसेना (स्त्री) ६–८
इन्द्रोत (राजा) ५–६, ९
" (ऋषि) ६–१०
इल (पुरुष) १–५
इला (स्त्री) १–५
इलावर्त (देश) १–५

उ

उग्रसेन (राजा) ७–१०
उग्रायुध (”) ७–५
उचथ्य (ऋषि) ३–१५; ४–२
उत्कल (राजा) १–६
” (देश) १–६, १५
उत्तरा (स्त्री) ७–२०, २२
उदान (राजपुत्र) ६–२२
उरुक्षय (ऋषि) ४–१४
उर्मिला (स्त्री) ५–१७
उर्वशि (”) १–७
उशिज् (ऋषि) ३–१५
उशीनर (राजा) २–१९

ऋ

ऋक्ष (पर्वत) २–१४
ऋचीक (ऋषि) २–२१, २२, २३, २४; ५–२
ऋजिष्वन् (,,) ४–१५
ऋतुपर्ण (राजा) ४–१९, २२
ऋष्टिसेन (राजपुत्र) ६–२२
ऋष्यशृंग (ऋषि) ५–१०, ११

ए

एकलव्य (ऋषि) ७–१५
एकादशरथ (राजा) ४–२०

औ

और्व (ऋषि) २–२१, २३; ३–१७
और्वाग्नि (”) ४–६

क

ककुत्स्थ (राजा) १–८, ११; ५–८
कक्षीवान् (ऋषि) ४–२.
कच (पुरुष) १–१२
कण्व आंगिरस (ऋषि) ४–२१
कण्व काश्यप (”) ४–६
कपि (”) ४–१४
कंबलबर्हि (राजा) ३–१०
करंधम (राजा) ३–१२, १३, १५
कलिंग (देश) ४–२
कश्यप (ऋषि) २–२६; ३–१, २
कश्यप (कुल) ३–९; ४–६; ५–१०
कंस (राजा) ७–१०, १७
काण्डरीक (पुरुष) ६–२०
काण्व (कुल) ५–६
काण्वायन (”) ४–२१
कान्यकुब्ज (देश) १–७, १५; २–२, १२, १५, १७, २१, २३, २४, २५; ३–२, ५, ६, ७, ८, २१; ४–१०; ६–११
कापेय (कुल) ४–१४
कांपिल्य (नगर) ४–२१; ५–४; ७–५
कामेश्वर (पदवी) ५–३
कारूष (देश) २–३, २१; ४–४; ६–१४; ७–२०
कार्त (सामग) ६–१८
काली (स्त्री) ६–२३; ७–२, ३, ४, ५, ६, ८, ९

काशी (नगरी) १–१४, १५; २–२, १२, १७, १८, २०, २१; ३–१२, १३, १६, २१; ४–५, २३; ५–१०; ७–६, २०
किष्किन्धा (नगरी) ५–२०, २३
कीर्तिरथ (राजा) ४–७
कुत्स (ऋषि) ५–८
कुंति (देश) ७–९
कुंती (स्त्री) ७–९, ११
कुंभयोनि (ऋषि) ४–५, १३
कुरु (राजा) ६–७, ९, १७, २४
कुरुक्षेत्र (देश) ६–९
कुरुजांगल (,,) ६–९
कुवलाश्व (राजा) २– ७, ८
कुश १ (राजा) ६–१४
कुश २ (,,) ५–२१; ६–२
कुशस्थली (नगरी) ६–२
कृत (राजा) ६–१८, १९
कृतवीर्य (राजा) २–२०
कृमिला (नगरी) २–१९
कृशाश्व (राजा) २–२३
कृष्णगोपाल (पुरुष) ७–१६
कृष्णवासुदेव (राजा) ७–१०, १६, १७, १८, २०
कृष्णद्वीप (स्थान) ७–३, ७
कृष्ण द्वैपायन (ऋषि) ७–३, ७, ८, ९, १२
केतुमान् (राजा) ४–२३
केरल (देश) ५–२३
केशिनी (स्त्री) ३–१९
कैकयी (,,) ५–११, १८
कैशिकी (नदी) १–४
कोशल (देश) १–२, ४, ६, ८, १५; २–२, ७, ९, १२, १५, १८, १९, २१, २३, २४, २५; ३–२, ५, ७, ८, ९, १३, १७, १८, २१; ४–४, ५, ७, १३, १५ २१, २२; ५–५, ७, ८, १७, १८, २२; ६–१, २, ४, १७, १८, १९, २१, २४
कौरव (वंश) ६–९, २२; ७–५, १०, ११, १३, १४, १८, २०; ७–२२, २३
कौशाम्बी (नगरी) ४–५; ६–१४
कौशिक (कुल) ३–११
कौशिकी (नदी) ५–१०, १५, १७
कौसल्या (स्त्री) ५–११
क्रोष्टु (राजा) २–३
क्षत्रवृद्ध (,,) १–१४
क्षत्रोपेत द्विज (वर्ग) ४–९, १४, १५, २१, २४; ५–४, ६
क्षेमक (राक्षस) २– १८

ख

खट्वाङ्ग दिलीप २ (राजा) ५–५

खनित्र (राजा) ३–१०
खनीनेत्र (,,) ३–१०

ग

गंगा (नदी) २–१६, १७, १८, १९; ३–१६; ४–२, ५, १३; ६–२४.
गंगा (स्त्री) ६–२३; ७–२
गंगाद्वार (स्थान) ७–१४
गंधर्वदेश (देश) १–७
गय (राजा) १–७
गय (देश) १–६, १५
गर्ग (ऋषि) ४–१४
गाधि (राजा) २–२३; ३–५
गांधार (देश) २–१५, १९; ३-१३; ६–२; ७–९, १९
गांधारी (स्त्री) ७–९, ११, २२
गार्ग्य (गोत्र) ४–१४; ६–१०
गालव १ (पुरुष) ३–६
गालव २ (,,) ६–१०
गिरिव्रज (नगर) ६–१४
गृत्समद १ (ऋषि) ३–१६
गृत्समद २ (,,) ४–१४
गो १ (स्त्री) १–१३
गो २ (,,) ६–२०
गोमती (नदी) २–१८; ३–१६; ४–५
गौतम (ऋषि) ५–१७
गौतम (कुल) ४–२; ५–१७; ६–८
गौरिवीति (ऋषि) ४–१४
गौरी (स्त्री) २–१२

घ

घोर (ऋषि) ४–२१

च

चंद्र (राजा) ४–१३
,, (नाणें) ५–२, ४, ८
चंद्रकेतु (राजा) ६–२
चंद्रचक्रा (नगरी) ६–२
चित्रकूट (पर्वत) ५–१८
चित्ररथ (राजा) २–११; ४–२०
चित्रा (स्त्री) ६–२१
चित्रांगद (राजा) ७–४, ५
चेदि (देश) ६–११, १४; ७–१०, १७, २०.
चोल (देश) ५–२३
च्यवन १ (ऋषि) १–१३; ३–१२
च्यवन (राजा) ६–११
च्यवन २ (ऋषि) ६–५, ८

ज

जनक (राजा) ५–१०
जनकपुर (नगरी) ५–१७
जनमेजय १ (राजा) ६–१०
,, ,, २ (,,) ६–१०, ११
,, ,, ३ (राजा) ६–१०; ७–२३
जनमेजय (पुरुष) ७–५
जनस्थान (स्थळ) ५–१८, २०, २३
जन्तु (राजा) ६–९

जमदग्नि (ऋषि) २–२३, २४, २५; ४–२२
जयन्ती (स्त्री) १–१२
जरासंध (राजा) ७–१०, १७, १८
जह्नु (राजा) २–१५, १६, १७; ४–१३
जह्नु २ (राजा) ६–१०
जातूकर्ण (ऋषि) ७–२, ३, ७
जानकी (स्त्री) २–२५
जैगीषव्य (ऋषि) ६–१९
जैमिनि (,,) ७–८
ज्यामघ (राजा) ३–१६

त

तक्ष (राजा) ६–२
तक्षशिला (नगरी) ६–२;७–२३
तपती (स्त्री) ६–७
तंशु (राजा) २–१२
ताडका (राक्षसी) ५–१५
तापी (नदी) २–११, ३–१३
तापी (स्त्री) ६–७
तालजंघ (गण) ३–१२
तितिक्षु (राजा) २–१९
तुण्डिकेर (गण) ३–१२
तुर (ऋषि) ६–१०
तुर्वसु(राजा)१–१४, २–२,३–२१; ४–४; ६–६
तृणबिन्दु (राजा) ४–२३
त्रय्यारुण (,,) ३–५
त्रसदस्यु १ (राजा) २–१५, १८
त्रसदस्यु २ (राजा) ५–६, ९
त्रिधन्वन् (राजा) २–२३
त्रिशंकु (राजा) ३–७, ८, १०
त्रिशिरस् (दानव) १–१३
त्र्यंबक (धनु) ५–१६
त्वष्टा (ऋषि) १–१३

द

दण्डकारण्य (स्थान) २–१८; ३–१६, २२; ५–१८
दत्त (ऋषि) २–२२
दमघोष (राजा) ७–१०
दमयन्ती (स्त्री) ४–१७, १८, १९
दशपुर (नगर) ४–१४; ५–७
दशरथ १ (राजा) ४–२०
दशरथ २ (,,) ५–८, १०, ११, १५, १७, १८
दशानन (राक्षस) ५–१९
दशार्ण (देश) ४–१५; ६–३
दशार्णा (नदी) ४–१४; ५–७
दशार्ह (राजा) ४–१५
दस्यवेवृक (ऋषि) ५–६
दानव (जाति) १–८, १२, १३, १४
दाशार्ह (कुल) ४–१५, १६
दिलीप १ (राजा) ४–७, १३
दिलीप २ (,,) ५–५, ७
दिविरथ (,,) ४–२३
दिवोदास १ (,,) २–१७, १८

दिवोदास २ (राजा) ५–६, ९, १७; ६–४,८
दीर्घतमस् (ऋषि) ३–१५; ४–२,७; ६–८,१४
दीर्घबाहु (राजा) ५–७
दुर्गह (राजा) ५–६
दुर्दम (,,) २–१७, १८, २०
दुर्योधन (,,) ७–११, १८, १९, २०
दुर्वासस् (ऋषि) २–२२
दुःशासन (पुरुष) ७–११
दुष्यंत (राजा) ४–४,५,६,७,२०
देवकी (स्त्री) ७–१०,१६,१७
देवयानी (,,) १–१२, १३, १४
देवराज वसिष्ठ (ऋषि) ३–५,६,७, ८,९,१०
देवरात (ऋषि) ३–११.
देवव्रत भीष्म (पुरुष) ७–२, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, ११, १३, १४, २०, २१, २२
देवापि १ (ऋषि) ६–१०
देवापि २ (,,) ६–२२,२४
देववृध् (राजा) ६–३
द्रुपद (राजा) ७–१०, १४, १८
द्रुह्यु (राजा) १–१४
द्रुह्यु (कुल) २–२,३,४,५,६, १३, १५, १७, १९; ३–१३, १४, १८, २१; ६–६
द्रोण (ऋषि) ७–१३,१४,१५,१८
द्रौपदी (स्त्री) २–२५; ७–१८,१९
द्वारका (नगरी) ७–१७, २२
द्विमीढ (राजा) ४–२१, २२
द्विमीढ (कुल) ६–५,१८,१९,२२; ७–५,१०

ध

धर्म (राजा) ७–११,१८,१९,२०, २२
धर्मकेतु (राजा) ४–२३
धर्मरथ (,,) ४–२३
धंधु (जाति) २–८, ९, १७
धुंधु (राजा) २–८
धुंधुमार (राजा) २–८
धृतराष्ट्र (राजा) ७–९, ११,१९,२२
धृष्टकेतु (,,) ५–१०

न

नकुल (पुरुष) ७–११
नन्द (,,) ७–१७
नन्दिग्राम (स्थान) ५–१८
नर (ऋषि) ४–१४
नरिष्यंत (राजा) ३–२१
नर्मदा (नदी) २–११, १४, २१ २२; ३–१३, १८; ७–१०
नर्मदा (स्त्री) २–१४
नल (राजा) ४–१७, १८, १९; ७–१९
नवराष्ट्र (देश) २–१९
नहुष (राजा) १–८, ९, ११, १३

नाग (जाति) २–१४; ३–१६; ७–२३
निमि (राजा) १–४
निषध (देश) ४–१६, १९
नेदिष्ठ (राजा) १–४
नैध्रुव (ऋषि) ३–१२

प

पंचनद (देश) २–३, ६, ७, ८, १०, १२, १३, १९; ५–१०, २२; ६–६; ७–२०
पंचवटी (स्थान) ५–१९
पंचाल (देश) ५–४, ५, ६, १०; ६–३, ४, ५, ६, ८, ९, १९, २२; ७–५, १०, १४, १८, २०
पम्पा (सरोवर) ५–२०
परशुरामक्षेत्र (स्थळ) २–२६
परावृत् (राजा) ३–१६
पराशर १ (ऋषि) ६–६, २३
पराशर २ (”) ६–२३; ७–२
परीक्षित् १ (राजा) ६–१०; ७–२२
परीक्षित् २ (राजा) ६–१०; ७–२२, २३
परूच्छेप (”) ६–४
परूष्णी (नदी) ६–६
पर्णाशा (”) ६–३
पांडव (कुल) ७–११, १३, १८, १९, २०, २२, २३
पाण्डु (राजा) ७–९, ११
पाण्ड्य (देश) ५–२३
पायु (ऋषि) ५–९
पारियात्र (पर्वत) ३–९
पुण्ड्र (देश) ४–२
पुनर्वसु (राजा) ६–२१
पुरिका (नगरी) २–१४
पुरुकुत्स १ (राजा) २–१४
पुरुकुत्स २ (”) ५–६
पुरूरवा (राजा) १–६, ७, १५
पुष्कर (स्थळ) ३–८
पुष्कर (राजा) ६–२
पुष्कर (सरोवर) ३–९
पुष्करावती (नगरी) ६–२
पुष्य (राजा) ६–२१
पूतक्रतु (ऋषि) ५–६
पूरु (राजा) १–१४; २–२, ८, २७
पृथु (”) १–९, १०, ११
पृथुश्रेण (राजा) ५–१०
पृषत (राजा) ६–९; ७–५, १०
पैल (ऋषि) ७–८
पौरव (वंश) १–१४; २–८, ९, १०, १२, १७; ४–४, २०, २१; ५–५; ६–७, ९
पौरस्त्य (राज्य) २–१९; ३–२, २१; ४–१, २३; ५–१०
प्रगाथ (ऋषि) ४–२१; ५–६
प्रतर्दन १ (राजा) ३–१६, २१; ४–५

प्रतर्दन २ (राजा) ६–४
प्रतिष्ठान (नगर) १–६, ७, ११, १२, १५; २–२, ८; ४–४, ५, ७, २०
प्रतींधक (राजा) ३–२१
प्रतीप (राजा) ६–२२, २३, २४
प्रत्यग्रह (,,) ६–१४
प्रभाकर आत्रेय (ऋषि) २–१०
प्रमति (राजा) ५–८, १०
प्रसेनजित् (,,) २–१२
प्रस्तोक (ऋषि) ५–६
प्रस्रवण (पर्वत) ५–२०

ब

बलि (राजा) ३–२१; ४–१,२
बहुलाश्व (,,) ७–१०
बाहु (राजा) ३–१३ ,१७; ४–५
बिभीषण (पुरुष) ५–२१
बुध (पुरुष) १–५
बृहत्क्षत्र (राजा) ४–१४, २०
बृहदश्व (,,) २–७
बृहदुक्थ (ऋषि) ६–१२
बृहद्रथ (राजा) ६–१४
बृहस्पति १ (ऋषि) १–१२
,, २ (,,) ३–१५
ब्रह्मकमंडलु (सरोवर) ४–१३
ब्रह्मदत्त (राजा) ६–१९, २०, २२, २४; ७–७

भ

भगीरथ (राजा) ४–१३
भजमान (राजा) ६–३, ५
भद्रश्रेण्य (,,) २–१७
भरत (,,) ५–११,१८,२१,२२
भरद्वाज (ऋषि) ३–१५; ४–२, ८; ७–१४
भागीरथी (नदी) ४–१३
भारद्वाज (वंश) ४–२, ८, १५; ७–१४
भार्गव वाल्मीकि (ऋषि) ५–१०, १३, २१
भीम (राजा) ६–३
भीम (पुरुष) ७–११, १८
भीमक (राजा) ७–१०, १७
भीमरथ (,,) ४–१७, २०
भीष्म (पुरुष) ७-१४,२०,२१,२२
भुज्यु (ऋषि) ६–१०
भूमन्यु (,,) ४–१४
भृगु (ऋषि)१–५,६,१०,१३,१५
,, (वर्ग) २–१,५,६,१३,२०, २१, २२, २३, २४, २५, २६; ३-२,९,११,१६,१९
भृग्वंगिरस (ऋषिकुल) १–१२; ३–२
भृम्यश्व (राजा) ५–४
भोज (गण) ३–१२; ६–३

म

मगध (देश) ६–११, १४, २२; ७–८,१०,१७,१८,२०

मत्स्य (देश) ६–११, १४; ७–२०
मथुरा (नगरी) ७–१७
मदयन्ती (स्त्री) ४–२२
मद्र (देश) ६–२; ७–९
मधु (राजा) ५–७, ८, १०
मधुरा (नगरी) ५–७, २२; ६–२, ३; ७–१७
मनु (राजा) १–३
मंथरा (स्त्री) ५–१८
ममता (,,) ३–१५; ४–२; ६–८
मरुत् (जाति) ३–१४; ५–३
मरुत्त (राजा) ३–१४, १५, २१
मर्क (ऋषि) १–१३
महामनस् (राजा) २–१९
महावीर्य (,,) २–१५
महाशाल (,,) २–१९
महिष्मन्त (,,) २–१५, १७
महेंद्र (पर्वत) ४–२
मागध (गण) ६–१४; ७–२०
माण्डवी (स्त्री) ५–१७
माद्री (स्त्री) ७–९, ११
माधव (वंश) ५–७
मान्धाता (राजा) २–१२, १३, १४, १५, १७; ४–४
मारीच (राक्षस) ५–१५
मारुत (राजा) ६–१४
मालव (देश) २–३, ६, ७, ८, १०, १३, १७
माहिष्मती (नगरी) २–१५, १७, २२; ३–१२; ६–३
मित्रसह (राजा) ४–२२
मित्रयु (राजा) ५–९, १०
मिथिला (नगरी) ५–१७
मुचकुन्द (राजा) २–१४, १५
मुद्गल (ऋषि) ५–४; ६–८
मेधातिथि (ऋषि) ४–२१
मेनका (स्त्री) ४–६
मैत्रेय (वंश) ५–९; ६–४
मौद्गल (,,) ५–४
म्लेच्छ (जाति) २–१९; ३–१३, १८, २१; ४–५
म्लेच्छ (देश) २–१९

य

यति (पुरुष) १–११; ४–१०
यदु (राजा) १–१४; २–२, ३
यमुना (नदी) २–१९; ३–२, १२; ४–४, ५, २०; ५–७, १०; ६–२३, २४; ७–२, ३
ययाति (राजा) १–११, १२, १३, १४, १७; २–१, २, ९; ७–४
यशोदा (स्त्री) ७–१७
याज्ञवल्क्य (ऋषि) ६–१०
यादव (वंश) २–९, ११; ३–२, १३; ५–७, १०, २२; ६–२, ३, ६, २१; ७–१०, १६, १७, २०, २३

यादव (देश) ३–१०, १६, १९; ४–१७
युवनाश्व १ (राजा) २–७
,, २ (,,) २–१२
,, ३ (,,) ४–१५
यौधेय (गण) २–१९

र

रघु (राजा) ५–७, ९
रत्नपुर (नगर) ६–२
रथवर (राजा) ४–२०
रंतिदेव (,,) ४–१४; ५–७
राक्षस (जाति) २–१८; ३–१६, २१; ४–५, २२; ५–१५, १७, १८, १९, २०, २१, २३
राघव (वंश) ५–८; ६–१७
राजाधिराज (पदवी) ५–३
राधा (स्त्री) ६–२१; ७–१७
राम दाशरथि (राजा) २–२५; ५–१, १०, ११, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २२, २३; ६–१, २, ३, ४, १७, २४; ७–१६
राम भार्गव (ऋषि) २–२४, २५, २६, २७; ३-१, ३, ५; ४-६
रावण (पदवी) २–१८, २२; ३–१६; ५–१९, २०, २१
राष्ट्रवर्धन (राजा) ४–७
रुक्मकवच (,,) ३–१०
रुक्मिणी (स्त्री) ७–१०, १७
रुशद्गु (राजा) २–९
रेणुका (स्त्री) २–२४, २५
रेभ (ऋषि) ५–१०
रेवती (स्त्री) ६–२१
रोहिणी १ (स्त्री) ६–२१
,, २ (,,) ६–२१
रोहित (राजा) ३–११
रौद्राश्व (,,) २–९, १०, १२

ल

लक्ष्मण (पुरुष) ५–११, १५, १६, १८, १९, २०, २२
लङ्का (वेट) ५–१९, २०, २१
ललित (राजा) ६–१४
लव (,,) ५–२१; ६–२
लवण (,,) ५–२२; ६–३
लिखित (पुरुष) ६–१९
लोपामुद्रा (स्त्री) ४–५
लोमपाद (राजा) ५–१०, ११
लोमहर्षण (ऋषि) ७–८

व

वङ्ग (देश) ४–२
वत्स (राजा) ४–५, ७
वत्स (देश) ४–५
वध्र्यश्व (राजा) ५–६, १७; ६-४, ८.
वरतंतु (ऋषि) ५–८
वसिष्ठ (कुल) १–२, १५; २–१, ५, ७, २१, २२, २३, २४,

२५;३–२,५,६, ७, ८,९, १०, १८, १९;४–५, १०, २२;५–५, ११,१५;६-४, ५, ६
वसु (राजा) ६–११,१४,१७,२२, २४
वसुदेव (राजा) ७–१०, १६, १७
वानर (जाति) ५–२०,२३
वामदेव (ऋषि) ६–८
वालि (वानर) ५–२०
वाल्मीकि (ऋषि) ३–९
वासव (कुल) ६–१४
विचित्ररथ (राजा) ४–२३
विचित्रवीर्य (,,) ७–४,५,६
वितथ (राजा) ४–९,१४
वितस्ता (नदी) २–१९
विदर्थिन् (ऋषि) ४–८,९, १२
विदर्भ (देश) ३–१३, १६, १९; ४–५,१६,१७;५-९, १०; ७–१०, १७
विदिशा (नगरी) ४–१६
विदेह (देश) १–४,६,१५;२–२, १५,१९;३--२, १२, २१; ४–७; ५–५, १०, १७; ६–२;७–१०
विनताश्व (राजा) १–६;२–७
विंध्य (पर्वत) २–१४; ४–५, ७; ५–१०; ६–२
विंध्य (वन) २–२३,२५;३–१७, १८; ४–५
विपाशा (नदी) २–१९; ६–६
विभ्राज् (राजा) ६–१९
विराजा (स्त्री) १–११
विराट् (राजा) ७–१९,२०, २२
विवस्वान् (राजा) १–२
विशाल (,,) ४–२३; ५–२
विशाला (नगरी) ४--२३;५–२
विश्रवस् (राजा) ५--३
विश्वकर्मन् (पुरुष) १--१३
विश्वजित् (राजा) ७--१०
विश्वरूप (पुरुष) १--१३
विश्वामित्र (ऋषि) ३--५, ६,७, ८, ९, १०, ११, २१
विश्वामित्र (कुल) ३–९; ४–६; ५–५,१०, १५, १६,१७; ६–५, ६
विष्टराश्व (राजा) २–७
विष्णुपद (गिरि) ४–१३
विष्णुवृद्ध (गोत्र) ५–६
वीतहव्य (राजा) ३–१६
वीतिहोत्र (गण) ३–१२, १६
वृषपर्वन् (राजा) १–१२
वृष्णि (राजा) ६–३
वृष्णि (वंश) ६–२२;७–१०,१६
वेत्रवती (नदी) २–२; ३–१२
वेन (राजा) १–९
वैवस्वत मनु (राजा) १–१५,१७;

२–१, ११, २७; ३–२०; ५–१; ६–२४
वैशम्पायन (ऋषि) ७–८
वैशालि (देश) १–४, ६, १४, १५; २–२, १९; ३–२, १२, १३, १४, १५, १६, १८, २१; ४–७, २३; ५–२, ३, ८, १०, १५
वैश्रवण (पदवी) ५–३, ८
व्यास (ऋषि) ५–१३; ७–७, ८

श

शकुनि (पुरुष) ७–१९
शकुन्तला (स्त्री) ४–६
शक्ति (ऋषि) ६–५, ६, २३
शण्ड (,,) १–१३
शतद्रु (नदी) २–१९; ६–६
शत्रुघ्न (पुरुष) ५–११, १८, २२; ६–३
शंतनु (राजा) ६–२२, २३, २४; ७–२, ३, ४, ५, ९
शंयु (ऋषि) ४–८
,, (अग्नि) ४–८
शर्मिष्ठा (स्त्री) १–१२, १४
शर्याति (राजा) ३–१२
शशबिन्दु (,,) २–११
शशाद (,,) १–४, ८
शाण्डिल्य (ऋषि) ५–५
शान्ता (स्त्री) ५–११
शाल्व (देश) ६–३; ७–६, २२, २३
शिबि (देश) २–१९; ६–६
शिबि (राजा) २–१९, २२; ३–१३
शिबिपुर (नगर) २–१९
शिशुपाल (राजा) ७–१०, १७, १८
शुक (ऋषि) ७–८
शुक (पुरुष) ६–१९
शुक्र भार्गव (ऋषि) १–१२
शुनःशेप (,,) ३–११; ५–२
शुनहोत्र (,,) ४–१४
शूर १ (,,) ६–२
,, २ (,,) ६–७
,, ३ (,,) ७–१०
शूरसेन (देश) २–३; ४–१६; ६–४
शोण (नदी) २–२, ३
शौनक (ऋषि) ४–१४
,, (कुल) ६–१०
श्यावाश्व (राजा) ५–९, १०
श्रावस्त (,,) २–७
श्रावस्ती (नगरी) २–७; ६–२
श्रुत (राजा) ४–१५
श्रुतकीर्ति (,,) ५–१७
श्रेष्ठभाज् वसिष्ठ (ऋषि) ४–२२

स

सगर (राजा) ३–१७, १८, १९, २०, २१; ४–१, २, ४, ५, ७, ९, १३

सगर (ऋषि) ६–२३
संकृति (”) ४–१४
संख्य (”) ६–१९, २०
सत्यकेतु (राजा) ४–२३
सत्यरथ (”) ४–२३
सत्यवती (स्त्री) २–२३; ५–२
सत्यव्रत (राजा) ३–५, ६, ७, ८, १०
सत्या (स्त्री) ४–८
सत्वत् (राजा) ५–२२; ६–३
संनति (स्त्री) ६–२०
सरस्वती (नदी) २–१९; ४–७; ७–२२, २३
सर्वदमन भरत (राजा) ४–६, ७, ९, ११, १२, १३, १४; ५–२३
संवरण (राजा) ६–६; ७
संवर्त (ऋषि) ३–१५
सहदेव (पुरुष) ७–११
सहदेव (राजा) ६–६, ७, ८
सहस्रजित् (राजा) २–३, ६, ९
सहस्रबाहु (राजा) २–२२
सह्य (पर्वत) २–२६; ३–१
साम्ब (पुरुष) ७–२२
साहंजी (नगरी) २–१५
सिंधु (नदी) २–१९; ६–६
सिंधु (राज्य) ५–१०, २२; ६–२, ७
सिंधुद्वीप (ऋषि) ४–१५, १९
सीता (स्त्री) ५–१०, १६, १८, २०, २१
सीरध्वज (राजा) ५–१०, १६, १७
सुकेतु (राजा) ४–२३
सुग्रीव (वानर) ५–२०
सुचंद्र (राजा) ५–२
सुदास (”) ६–५, ६, ८
सुदेव (”) ३–१३, १६
सुधन्वन् (”) ६–१०, ११
सुबाहु (”) ६–२
,, (राक्षस) ५–१५
सुमन्तु (ऋषि) ७–८
सुमित्र (,,) ६–४
सुमित्रा (स्त्री) ५–११
सुवीर (देश) ५–१०, २२
सुरथ (राजा) ६–१०, ११
सुवर्चस् वसिष्ठ (ऋषि) ६–६, ७, ९, २३
सुवीर (राजा) ७–१०
सुह्य (देश) ४–२
सूत (गण) १–१०
सृंजय (राजा) ६–३, ५, ८; ५–६
सोभरि (ऋषि) ५–६, ९
सोम (,,) २–२२
सोमक (राजा) ६–८, ९
स्वस्त्यात्रेय (वर्ग) २–१०

ह

हनुमान् (वानर) ५–२०

हरित (राजा) ४–१५
हरिश्चंद्र (,,) ३–११; ५–२
हर्यश्व (,,) ३–१२, १३
हस्तिन् (राजा) ४–२०, २१
हस्तिनापुर (नगर) ४–२०, २१; ५–४; ६–६, ७, ९, १०; ७–१०, १४, २०, २२, २३
हारीत (वर्ग) ४–१५
हिमाचल (पर्वत) १–१; ४–७
हिरण्यनाभ (राजा) ६–१७, १८
हेमचंद्र (राजा) ५–२
हैहय (गण) २–९, ११, १४, १५, १७, १८, २०, २२, २३, २४, २५, २६; ३–२, ४, ५, १२, १३, १४, १८, १९, २१; ६–३.

राजा राव महाराज, वाण. स्वयं
नं. ८५६५१ दि. निर्लेंद्र
दि. २१०३ सं. २०१३।७७

92328

REFBK-0012324